# अर्थसंवाद

खंड 12 : अंक 1, एप्रिल–जून 1988

■ भारताचा विकासाचा अनुभव–एक मार्क्स-प्रणित विश्लेषण
कांता रणदिवे

■ आंतरराष्ट्रीय नाणे निधी : स्वरूप व कार्य
भ. ग. बापट

■ मराठवाडा अर्थशास्त्र परिषद : सहाव्या वार्षिक (1988) अधिवेशनाचा वृत्तांत
उत्तम दे. वाकोडकर

■ महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या उत्पादन क्षमतेचा वापर
सु. दा. तुपे

मराठी अर्थशास्त्र परिषद

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

एप्रिल–जून 1988
खंड 12, अंक 1

**प्रमुख संपादक** : भ. ग. बापट
**सहाय्यक संपादक** : प्रदीप आपटे

**सल्लागार मंडळ :**
आनंद नाडकर्णी, श्री. वि. खांदेवाले,
गि. सो. कल्याणकर, ज. फा. पाटील

**संपादकीय पत्रव्यवहार**
भ. ग. बापट
गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे – 411 004

**व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**
( वर्गणी पाठवणे, अंक मिळणे, न
मिळणे याबाबत चौकशी इ. साठी )

व्यं. सु. पाटणकर
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संपदा',
प्राध्यापक वसाहत,
देवपूर, धुळे – 424 002

**वर्गणीचे दर :**
अ) परिषदेचे सभासद :
आजीव : रु. 400 (एक रकमी)
साधारण : रु. 60 ( वार्षिक )
संस्था सभासद :
शैक्षणिक : रु. 60 ( वार्षिक )
व्यावसायिक : रु. 150 (वार्षिक)
(परिषदेच्या सभासदांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिले जाते. )
ब) अर्थसंवाद वर्गणीदार :
ग्रंथालये : रु. 60 ( वार्षिक )
वर्षगणना : 1 एप्रिल ते 31 मार्च

**आभार :**
म. राज्य, साहित्य संस्कृती मंडळ व
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान
परिषद, प. विभागीय केंद्र, यांनी
अर्थसंवादसाठी दिलेल्या अनुदानाबाबत

# अनुक्रमणिका

खंड 12, अंक 1


- भारताचा विकासाचा अनुभव – एक मार्क्सप्रणित विश्लेषण
  कांता रणदिवे
  पृष्ठ 1

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी – स्वरूप व कार्य
  भ. ग. बापट
  पृष्ठ 21

- महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या उत्पादन क्षमतेचा वापर
  सु. दा. तुपे
  पृष्ठ 46

- मराठवाडा अर्थशास्त्र परिषद : सहाव्या वार्षिक (1988) अधिवेशनाचा वृत्तांत
  उत्तम दे. वाकोडकर
  पृष्ठ 59

- मुखपृष्ठ व मांडणी
  अनिल अवचट

# भारताचा विकासाचा अनुभव एक मार्क्सप्रणित विश्लेषण*

कांता रणदिवे**

[ सुप्रसिद्ध पत्रकार पां. वा. गाडगीळ यांचे गेल्या वर्षी 18 एप्रिल रोजी निधन झाले. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ते आजीव सदस्य होते. परिषदेच्या प्रारंभीच्या काळापासून ते परिषदेच्या कार्यात रस घेत असत. कै. गाडगीळांनी अर्थशास्त्रीय विषयांवर विपुल, विचार व प्रवर्तक लेखन सातत्याने केले, अभ्यासवर्ग घेतले आणि ठिकठिकाणी व्याख्याने दिली.

पां. वा. गाडगीळ स्मृतिनिधी (संकल्पित) आणि मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी अर्थशास्त्रीय विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात यावयाची आहेत. त्या योजनेतील पहिले व्याख्यान शनिवार दिनांक 16 एप्रिल 1988 रोजी रा. आ. पोदार महाविद्यालय, माटुंगा, मुंबई येथे झाले.

हे पहिले व्याख्यान सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. कांता रणदिवे यांनी दिले. व्याख्यानाचा विषय होता **'भारताचा विकासाचा अनुभव-एक मार्क्सप्रणित विश्लेषण'**. प्रा. रणदिवे यांचा या विषयावरील साक्षेपी व्यासंग सर्वमान्य आहे. त्यांच्या चिंतनाचा लाभ जिज्ञासूंना सहज घेता यावा म्हणून त्यांचे संपूर्ण व्याख्यान आम्ही प्रसिद्ध करीत आहोत—**संपादक** ]

शिष्यगण हे स्वमताचा पूर्णपणे परित्याग केलेले वा (गुरूची) अंकितता स्वीकारलेले नसतात तर मार्गदर्शन पूर्ण होईपर्यंत तात्पुरता विश्वास आणि स्वतःच्या निर्णयशक्तीवर अंकुश एवढेच गुरूचे देणे लागतात.... तेव्हा महान लेखकांना त्यांचे देणे मिळू द्या, पण लेखकांचा लेखक असलेल्या काळाचे देणे, म्हणजे सत्याचा शोध घेत पुढे जाणे, टाळू नका.

**फ्रान्सिस बेकन**

* मूळ इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद केल्याबद्दल मी रमेश पाध्ये यांची आभारी आहे. अनुवाद वाचून मी त्यात फेरबदल केले. ज्या काही त्रुटी राहिल्या असतील त्यांची जबाबदारी पूर्णपणे माझी आहे.— का. र.

** निवृत्त प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ

समकालीन जग समजून घेण्यासाठी कार्ल मार्क्स यांच्या विचारांची प्रस्तुतता हा एक वादाचा विषय आहे. या दृष्टीने प्रस्तुत लेख या विवाद्य विषयावरील एक प्रतिक्रिया होय, असे मानण्यास हरकत नाही. गेल्या 39 वर्षातील भारताच्या विकासाच्या अनुभवाचा मार्क्सवादी पद्धतीने अर्थ लावण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. हा लेख तीन भागात विभागलेला आहे. यातील पहिल्या भागात मार्क्स यांच्या विचारांमधील मूलभूत खुलेपणावर भर दिला आहे. मार्क्सवादी चौकटीतील चिरकालीन संकल्पनांना उजाळा मिळण्यास मदत व्हावी म्हणून मार्क्स यांच्या दूरदृष्टीचा महत्त्वाचा घटक असणाऱ्या विकासाच्या गृहीत कल्पनेचा येथे वापर केला आहे. दुसऱ्या भागात समकालीन भारतीय वास्तव समजण्यासाठी मार्क्सवादी चिरकालीन संकल्पनांशी सुसंगत असणारी आणि त्याच वेळी त्यांमध्ये भारतीय परिस्थितीमधील वैशिष्टचे आणि वर्तमान ऐतिहासिक घडीची महत्त्वाची अंगे यांचा अंतर्भाव केलेली संरचना तयार केली आहे. शेवटच्या भागात या संरचनेचा वापर भारतीय 'अर्थव्यवस्थे'च्या गतिमानतेचे विश्लेषण करण्यासाठी केला आहे. या प्रक्रियेमध्ये उत्पादकशक्तींच्या विकासाला खीळ घालणारे आणि सामाजिक स्थित्यंतराला प्रतिबंध करणारे अंतर्विरोध उघड करण्यात आले आहेत.

## (1)

## मार्क्स यांचा 'इतिहासवाद'

कार्ल मार्क्स यांच्या विचारांची समकालीन जग समजून घेण्यासाठी प्रस्तुतता हा मार्क्स यांच्या निधनाच्या शताब्दीच्या वर्षामध्ये चर्चेसाठी महत्त्वाचा विषय झाला होता. अशा चर्चांचा निर्णय अपेक्षेप्रमाणे एकमताचा नव्हता आणि मूल्यमापनात अपेक्षेनुसार खुशामत व दांभिक भक्तीपासून प्रस्तुतता पूर्णपणे नाकारण्यापर्यंत सर्व प्रकार दिसून आले होते. यातील पहिला प्रकार म्हणजे मार्क्स यांचे शिष्य म्हणवू घेणाऱ्या अनेकांच्या कडूनच पुष्कळवेळा मार्क्स यांच्या विचाराला कशी हानी पोहोचते याचे एक उदाहरण म्हणता येईल. दुसरा प्रकार हा गेली शंभर वर्षे मार्क्स यांच्या विचारावर जो निरंतन हल्ला सुरू आहे या घटनेशी सुसंगत आहे. त्यांच्या टीकाकारांना शताब्दि वर्षाचा सुमुहूर्त पुन्हा हल्ला सुरू करण्यासाठी गवसला यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. समाजशास्त्रज्ञांच्या प्रत्येक नव्या पिढीला पुन्हा एकदा मार्क्स यांचे विचार खोडून काढण्याची तीव्र गरज भासावी ही घटनाच मार्क्स यांच्या विचारांचा गाढा प्रभाव सूचित करणारी आहे, आणि शताब्दी वर्षामध्ये झालेल्या त्यांच्या विचारांच्या खंडणामुळे तो प्रभाव नाहीसा होणार नाही.

मार्क्स यांच्या निधनानंतर शंभर वर्षांनी मार्क्सवाद हा विचारप्रक्रियेची जागा घेऊ शकत नाही याची, कितीही औपरोधिक वाटले तरी, स्वत:ला आठवण करून देणे अगत्याचे ठरते. मार्क्सवाद म्हणजे 'पोथी नव्हे तर कृतीसाठी मार्गदर्शक आहे.' आपण समकालीन प्रश्नांच्या सैद्धांतिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही प्रकारच्या उत्तरांसाठी 'प्राचीन' लोकांकडे (मार्गदर्शनासाठी) पाहू शकत नाही हे साधारणपणे सर्वमान्य वचन असले, तर मार्क्स यांच्या संदर्भात ते अधिकच खरे आहे. परंतु समकालीन प्रश्नांच्या संदर्भातील उत्तरासाठी मार्क्स यांच्या लेखनाकडे वळणे भाबडेपणाचे असले तर आजचे जग आणि मार्क्स यांनी ज्या जगाविषयी लिहिले ते जग, यांच्यातील तफावतीच्या आधारे मार्क्स यांच्या विचारांचा प्रश्न निकालात काढणे चुकीचे आहे. मार्क्स यांनी जेव्हा लेखन केले, तेव्हा युरोप जगाचे केंद्र होते आणि मार्क्स यांनी म्हटल्याप्रमाणे भांडवली जगाचे दैवत असणारे इंग्लंड हे युरोपचा केंद्रबिंदू होते. गेल्या शंभर वर्षाच्या इतिहासातून आजच्या समाजापुढे उभ्या केलेल्या अनेक समस्यांच्या संदर्भात उदाहरणार्थ, राष्ट्रवादाचे प्रश्न, आधुनिक शासनसंस्थेचे स्वरूप आणि विशेषत: तिचे आर्थिक व्यवस्थापनामधील कार्य, स्त्रियांचे समाजामधील स्थान, निर्माण न करता येणारी व म्हणून संपत जाणारी साधनसंपत्ती इत्यादी—मार्क्स यांना खास मत नव्हते, ही गोष्ट नाकारता येणार नाही. एवढेच नव्हे तर भांडवलाचे संकेंद्रण आणि केंद्रीकरण या विषयीची मार्क्स यांची गृहीतकल्पना देखील पॉल स्वीझी यांनी 1971 सालच्या केंब्रिजमधील मार्शल व्याख्यानात समर्थपणे सिद्ध केल्याप्रमाणे आजची मक्तेदारी भांडवलशाही समजून घेण्यासाठी पुरेसा आधार पुरवीत नाही.[1]

अर्थात प्रत्यक्षात झालेल्या स्थित्यंतरामुळे मार्क्स यांचा विचार अप्रस्तुत ठरत नाही. खरे तर स्वत: मार्क्स यांनी कधीही न वापरलेल्या 'ऐतिहासिक भौतिकवाद' या संज्ञेमध्ये सामाजिक विकास आणि स्थित्यंतर ही प्रक्रिया गर्भित आहे. मार्क्स यांनी ऐतिहासिक प्रक्रियेवर भर दिल्यामुळे ते इतिहासवादी म्हणून ओळखले जाऊ लागले. 'इतिहासवाद' ही संज्ञा अनेक अर्थांनी वापरली जाते आणि मार्क्स हे जर 'इतिहासवादी' असले तर ते मॉरिस मँडलबॉम यांच्या व्याख्येला अनुसरूनच इतिहासवादी ठरतील. मँडलबॉम यांच्या व्याख्येप्रमाणे 'इतिहासवादी' म्हणजे स्थित्यंतराची वस्तुस्थिती अत्यंत गंभीरपणे (तत्त्वज्ञानी पद्धतीने) विचारात घेण्याचा यत्न करणे होय. प्रत्येक विवक्षित घटनेमागे शेवटी एक स्थित्यंतराची घटना असते. प्रत्येक विवक्षित घटना ही ज्या स्थित्यंतराच्या प्रक्रियेतून ती निर्माण होते त्याच्या संदर्भातच विचारात घेतली जाते आणि ही प्रक्रिया अशा

घटनेमध्येच अंतर्भूत असते असे या व्याख्येत अभिप्रेत आहे[2]. मार्क्स यांच्या निधनानंतरचे एक शतक मानवाच्या इतिहासात कधी नव्हे अशा प्रक्षोभांचे साक्षीदार बनले आहे पण ही घटना मार्क्स यांचा विचार कालबाह्य ठरवीत नाही तर उलट मार्क्सवादी म्हणवून घेणाऱ्यांना विभिन्न समस्यांच्या विश्लेषणासाठी मार्क्सवादाची विचारधारा किती संपन्न आहे हे स्पष्ट करण्याचे आव्हानच देते. अर्थात यासाठी विशिष्ट समस्येच्या संदर्भात समर्पक अशा वेगवेगळ्या पण मार्क्सवादी चिरकालीन संकल्पनांशी सुसंगत असणाऱ्या संरचना तयार करणे जरूरीचे आहे.

## मार्क्स यांच्या विचारांच्या संरचनेचा 'खुलेपणा'

अर्थात समकालीन जगाच्या संदर्भात मार्क्स यांच्या विचारांची प्रस्तुतता नाकारणारे सर्वचजण स्थित्यंतर या घटनेच्या आधारे आपला युक्तिवाद करत नाहीत, तर त्यांच्या स्वतःच्या समजुतीप्रमाणे मार्क्स यांचे स्थित्यंतराविषयीचे भविष्यकथन आणि प्रत्यक्ष स्थित्यंतर यामधील तफावती या घटनेच्या आधारे आपला युक्तिवाद करतात. पश्चिम युरोप-मध्ये रचना आणि प्रगती यांच्या संदर्भात सार्वत्रिकता आढळली असा दावा करण्याचे मार्क्स यांनी टाळले होते, याचे आजही आवर्जून प्रतिपादन करणे आवश्यक आहे. मार्क्स यांची या विषयीची भूमिका स्पष्ट असूनही त्यांचे विरोधक आणि सनातनी मार्क्सवादी म्हणवून घेणारे अनुयायी असे दोन्ही पक्ष ऐतिहासिक विकासाविषयीचे त्यांचे विचार एका ठराविक मुशीत ओतत असतील, तर ते स्वतःच्या हेतूला पूरक म्हणूनच होय.

उदाहरणार्थ कार्ल पॉपर यासारख्या टीकाकाराने '**थ पव्हर्टी ऑफ हिस्टॉरिसिझम**' आणि '**थ ओपन सोसायटी अँड इटस् एनिमिज**' या दोन पुस्तकांमधे 'इतिहासवादाच्या' स्वतःच्या व्याख्येला अनुसरून मार्क्स यांच्या लेखनाचे खंडण करण्याचा प्रयत्न केला आहे. ते इतिहासवादाची व्याख्या 'ऐतिहासिक भविष्यकथन हे मुख्य उद्दिष्ट गृहीत धरणारा समाजशास्त्र-विषयीचा एक दृष्टिकोन जो इतिहासाच्या उत्क्रांतीमागे असणारे 'ताल' किंवा 'प्रकार', 'सिद्धांत' किंवा 'कल' यांचा शोध घेऊन साध्य करता येऊ शकतो,' असे मानतात. पण मार्क्स यांचे 'गतिविषयक सिद्धांत' हे इतिहासामध्ये दडलेल्या उत्क्रांतीचे भविष्यकथन करीत नाहीत. या अर्थाने मार्क्स हे पॉपर मानतात तसे 'इतिहासवादी' **नाहीत** आणि यामुळेच पॉपर यांच्या विरोधात मार्क्स यांचे समर्थन करण्याचे चाललेले प्रयत्न हे या महत्वाच्या वस्तुस्थितीमुळेच अनावश्यक ठरतात.[3]

दुसऱ्या बाजूला विकासाचे स्थिर सिद्धांत मार्क्स यांच्या अनुयायांना वेगळ्या कारणासाठी सोयीस्कर वाटले होते. दुसऱ्या इंटरनॅशनलच्या काळात समाजवादी पक्षांनी या सिद्धांताच्या वापराची वस्तुनिष्ठ आवश्यकता विशद करून कल्पना प्रणालीच्या आधारासाठी त्यांचा वापर केला, यामुळे जनता पुढे वर्गीय जाणिवा आत्मसात करील या कारणास्तव तूर्त जनतेच्या ऐवजी समाजवादी जाणिवांचा विश्वासार्ह प्रतिनिधी म्हणून पक्षाची नियुक्ती करण्याचे समर्थन त्यांना करता आले 1914 साली दुसऱ्या इंटरनॅशनलच्या पाडावा-नंतर, 1917 च्या रशियामधील क्रांतीच्या विजयानंतर आणि पहिल्या महायुद्धानंतर मध्य युरोपात क्रांतीची लाट पसर-विण्यात अपयश आल्यानंतर आंतरराष्ट्रीय समाजवादी चळवळ स्वतःच दुभंगली. सोव्हिएट रशियामध्ये मार्क्सवाद ही राजकीय कारकीर्दीची कल्पना प्रणाली बनली आणि कालांतराने मार्क्स-वादाचे एका साचेबंद पोथीमध्ये रूपांतर करण्याचे काम स्टॅलिन यांच्या अमदानीत पूर्ण झाले.[4]

अनेक ठिकाणी मार्क्स यांचे स्वतःचे लिखाण अशा साचेबंद विवेचनाचा आधार होऊ शकते हे नाकारता येणार नाही. उदाहरणार्थ 'ए कॉंट्रिब्यूशन टू थ क्रिटिक ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी'च्या प्रस्तावनेत 'आशियायी, पुरातन, सरंजामी आणि आधुनिक भांडवली उत्पादन व्यवस्था, हे समाजाच्या आर्थिक विकासक्रमातील प्रगतीचे टप्पे मानता येतील, हे मार्क्स यांचे विधान मानवाचा इतिहास म्हणजे एकाच दिशेने प्रगती या संकल्पनीकरणाला आधार पुरविण्यात अग्रगण्य मानता येईल. तरीही समाजाची उत्क्रांती आणि प्रगती यांच्यासाठी सर्वव्यापी रूपरेखा ठरविणे किंवा विकासाच्या एका टप्प्यापासून दुसऱ्यापर्यंतच्या संक्रमणाचा एक विशिष्ट मार्ग शोधणे, हा मार्क्स यांच्या लेखनाचा हेतु नव्हता.

विशिष्ट स्थानिक, भौगोलिक, प्राथमिक समाजांचे मानव-वंशशास्त्र आणि ऐतिहासिक परिस्थिती यांच्या प्रभावामुळे मानवी इतिहासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात बहुविध उत्पादन-व्यवस्था अस्तित्वात असाव्यात, असे मार्क्स यांचे अवलोकन होते या मताला पुष्टी देणाऱ्या कल्पना त्यांच्या 'ग्रुंडरिज' या ग्रंथात आहेत.[5] मूळ समाज (रक्ताच्या नात्यावर आधारलेला जमिनीच्या मालमत्तेचा सुरुवातीचा प्रकार) हा आशियायी, अभिजात, जर्मन आणि स्लाव्ह, अशा तीन किंवा चार पर्यायी रूपांमध्ये विकसित झाला असे त्यांनी दाखविले आहे. मार्क्स यांनी या भांडवलपूर्व समाजव्यवस्थांमध्ये असणाऱ्या मूलभूत सातत्याच्या अभावावरच केवळ भर दिलेला नाही, तर सैद्धांतिकदृष्ट्या प्रत्येक रूपाचे स्वतंत्र अस्तित्व मानून त्यांचे विश्लेषण त्यांच्या स्वतःच्या कोटीच्या आधारेच आणि त्यांच्या गती नियमांना धरूनच करण्याची गरजही त्यांनी प्रतिपादिली आहे.[6]

मोडतोड झालेल्या प्राचीन समाजामधून युरोपमधील

सरंजामशाहीचा उदय ही गोष्ट जशी त्यांनी तार्किक गरज म्हणून मानली नव्हती, तसेच भांडवलशाहीच्या उदयाच्या कारणीभूत होणाऱ्या विशिष्ट ऐतिहासिक पूर्व अटीही त्यांनी काळजीपूर्वक स्पष्ट केल्या होत्या. या संदर्भात रशियामधील समालोचकाला मार्क्स यांनी रागावून दिलेले प्रत्युत्तर स्मरण करण्याजोगे आहे. 'आपल्या पश्चिम युरोपमधील भांडवलशाहीच्या उत्पत्तीच्या ऐतिहासिक आराखड्याचे रूपांतर कोणत्याही ऐतिहासिक अवस्थेतील प्रत्येक जनसमूहाच्या कपाळी या विशिष्ट मार्गावरूनच वाट चालण्याचा भोग असतो. अशा ऐतिहासिक सिद्धांतात करणे हे आपला वारेमाप सन्मान करणारे व त्याचबरोबर आपणास अतीव लज्जाप्रद आहे' हे त्यांनी स्पष्ट केले होते.[7] मार्क्स हे निश्चितच पाश्चिमात्य तत्त्वज्ञान व समाजशास्त्रे यांच्या वैचारिक परंपरांची निर्मिती होते. ज्या पुनरुत्थानाने आधुनिक जग आणि त्याचबरोबर प्रगतशील मानववंश ही संकल्पना उदयाला आणली, त्याच्याशी निगडित असलेल्या प्रगतीच्या कल्पनेने त्यांच्यावर परिणाम केला होता. तरीही मार्क्स हे 'हेगेल यांच्याप्रमाणे इतिहास म्हणजे तत्त्वज्ञानातील कल्पनेचे प्रकटीकरण असे मानीत नाहीत आणि कॉम्ट यांच्याप्रमाणे सर्व दरवाजे उघडणारी गुरुकिल्ली हाती आहे असा दावाही करीत नाही..."संस्कृतीचा सदैव पुढे जाणारा ओघ" हे मार्क्स यांचे नव्हते तर कॉम्ट यांचे गृहीततत्त्व आहे.'[8]

मार्क्स यांच्या विचार-संरचनेच्या 'खुलेपणा'शी असणाऱ्या सहमतानुसार त्यांच्या जडवादी रूपातील द्वंद्वात्मक पद्धतीत 'आधी अस्तित्वात असणाऱ्या शाश्वत कल्पना' या संकल्पनेला बिलकूल स्थान नाही. 'माणसे त्यांच्या भौतिक उत्पादनानुसार सामाजिक संबंध निर्माण करतात आणि त्याचबरोबर **कल्पना, कोटी** .. म्हणजे त्या सामाजिक संबंधांचे अमूर्त काल्पनिक रूपही निर्माण करतात' हे लक्षात न घेतल्याबद्दल मार्क्स यांनी प्रुधाँ यांच्यावर केलेल्या टीकेवरून ही गोष्ट स्पष्ट होते. 'अशा रीतीने व्यक्त केल्या जाणाऱ्या संबंधांपेक्षा कोटी शाश्वत नसतात. त्या ऐतिहासिक आणि अस्थायी असतात[9].' सुमारे वीस वर्षांनंतर त्यांनी या मताचा पुनरुच्चार केला आहे. 'भौतिक उत्पादनामधील विकासाच्या एका विशिष्ट टप्प्याला अनुसरून या ऐतिहासिक उत्पादन संबंधांचे सैद्धांतिक प्रकटीकरण म्हणून आर्थिक कोटी समजून न घेता (प्रुधाँ) त्या आधी अस्तित्वात असणाऱ्या **शाश्वत कल्पना** म्हणून निवडतात...'[10]

## मार्क्सवादी विचार चौकटीतील चिरकालीन संकल्पना

सामाजिक विविधता आणि ऐतिहासिक प्रवाह हे अर्थपूर्ण विश्लेषण शक्य होण्यासाठी सुयोग्य संकल्पनांच्या निर्मितीचे कष्टप्रद काम आवश्यक करीत असतात. शिवाय आपण जर मार्क्सवादी स्पष्टीकरण शोधू पाहात असलो तर अशा संकल्पना मार्क्सवादी विचार चौकटीतील चिरकालीन संकल्पनांशी सुसंगतही असल्या पाहिजेत. मार्क्स यांच्या इतिहासाविषयीच्या जडवादी संकल्पनेमध्ये मानवी समाजाचा विकास आणि घडण याविषयीच्या समाजशास्त्रीय संकल्पना अध्याहृत आहेत. मार्क्स यांच्या मते एकूण इतिहासाच्या पहिल्या पूर्वपक्षानुसार 'इतिहास घडविण्यापूर्वी' माणसांना जगणे शक्य व्हावे लागते. त्यांनी '**द जर्मन आयडिऑलॉजी**' या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे, 'माणसांना इतिहास असतो कारण त्यांना जीवनाची निर्मिती करायची असते.' त्यामुळे श्रमप्रक्रियेद्वारे इतरांची अशा रीतीने जीवनाची पुनर्निर्मिती ही माणसाची पहिली कृती असते. अशा रीतीने 'गरजांच्या सामग्रीचे उत्पादन ही पहिली ऐतिहासिक कृती' होय. त्याचबरोबर 'एक गरज तृप्त होण्याच्या क्रियेतून...नव्या गरजा निर्माण होतात' यावरही मार्क्स यांनी भर दिला आहे.

'विकास' गृहीतसिद्धांत हा मार्क्स यांच्या दूरदृष्टीचा एक महत्त्वाचा भाग आहे. जेथे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीसाठी नव्हे तर विशाल समाजासाठी राबत असे अशा निसर्ग-सान्निध्य वास्तव्याच्या या प्राथमिक अवस्थेपासून वर्तमान काळापर्यंत समाजाच्या विकासाचे वर्णन उत्पादक शक्तींची वाढ म्हणून करता येईल. पण उत्पादक शक्तींचा सदैव विकास झाला, असे या विकास गृहीत सिद्धांतामध्ये गर्भित नाही, तर विकास पावण्याकडे त्यांचा कल असतो हे त्यामध्ये अनुस्यूत आहे. या गृहीत सिद्धांताचा आधार पुढील (घटनांमध्ये) आहे : (1) टंचाईची ऐतिहासिक स्थिती (2) माणसांची विवेकबुद्धी आणि (3) त्यांची परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्याची कुवत (अर्थात उत्पादक शक्ती नेहमीच विकास पावतात असा याचा अर्थ नव्हे. कधीमधी त्यांच्या परागतीची शक्यताही नाकारलेली नाही).[11] विविध पद्धतींच्या समाजांची एका उतरंडीमध्ये श्रेणीबद्ध नोंदणी करण्याच्या शक्यतेबद्दल वाद घालता येईल. एखाद्या सामाजिक गटाला त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न सोडविल्याशिवाय जगता येत नाही आणि ही जगण्याची कुवत त्यांच्या कार्यक्षमतेची कसोटी म्हणून लावता येते. तरीसुद्धा बाहेरील निसर्गावर ताबा मिळविण्याच्या संदर्भात विविध समाजांच्या कुवतीमध्ये तफावत असते. माणसाच्या निसर्गावरील ताब्याच्या दृष्टीने पुढील समाज हा मागील समाजापेक्षा अधिक प्रगत असतो. अशा रीतीने समाजांमध्ये एका दिशेने बदल किंवा 'विकास' आणि एक प्रकारची 'उत्क्रांती' अभिप्रेत असते. अर्थात या 'उत्क्रांती'ची जीवशास्त्राच्या उत्क्रांतीशी बरोबरी करता येत नाही.[12]

**प्रगतीच्या संदर्भात** इतिहासाचा **आशय** पाहणे या मार्क्स यांच्या मांडणीशी त्यांचा 'विकासाचा' गृहीतसिद्धांत सुसंगत आहे माणसाच्या मुक्तीसाठी केलेली एक नैतिक मागणी असे मार्क्स यांच्या विचारांचे स्पष्टीकरण करता येत नाही. 'प्रगती' या संकल्पनेत मार्क्स यांना काहीतरी वस्तुनिष्ठ रीतीने व्याख्या करण्याजोगे अध्याहृत होते. आणि त्याच वेळी काय ऐच्छिक आहे हे देखील दर्शविणारे होते. माणसाला त्याच्याकडे असणाऱ्या पूर्ण कुवतीची पातळी गाठायची असेल, तर माणसाच्या अस्तित्वाच्या भौतिक स्थितींमध्ये बदल झाला पाहिजे, एवढेच नव्हे तर तो करता येतो. माणसाचा इतिहास म्हणजे भौतिक वातावरणाशी सतत सुरू असणारा संघर्ष असतो आणि त्याच संघर्षामध्ये माणसांच्या 'स्वभावा'ची सतत जडणघडण सुरू असते. मानवापलिकडील नैसर्गिक वातावरणाला वश करण्याच्या प्रयत्नामध्ये इतर माणसांशी त्याच्यासंबंधी सामाजिक विचारविनिमय केला जातो, आणि या प्रक्रियेत माणसांना स्वत:संबंधी जाणीव होते, कारण जाणीव ही सामाजिक जीवनाचा परिणाम आहे. अशा रीतीने सर्व माणसांनी मुक्त विकासाचा मार्ग आत्मसात करण्याची शक्यता हा मार्क्स यांचा विश्वास अशा शक्तीवर नव्हे. तर माणसांना ऐतिहासिक विकास कोठे घेऊन जाईल, याविषयीच्या त्यांच्या समजावर आधारलेला होता.

तथापी कोहेन यांनी त्यांच्या अलिकडील लिखाणात 'ए कॉन्ट्रिब्यूशन टू द क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी 'च्या प्रस्तावनेच्या आधारे प्रतिपादन केल्याप्रमाणे 'विकासा'च्या गृहीत सिद्धांतामध्ये उत्पादक शक्तीचे प्रमुख स्थान अध्याहृत नाही[13] ही गोष्ट मार्क्स यांच्या समग्र आणि परस्परसंबंधी दृष्टिकोनाशी विसंगत होईल. उत्पादक शक्तीचे प्रमुख स्थान म्हणजे तांत्रिक हेतूमूलकता—किंवा उत्पादन संबंधाचे प्रमुख स्थान म्हणजे आर्थिक वा वर्गीय हेतुमूलकता—यापैकी कोणतेही प्रतिपादन योग्य ठरणार नाही. कारण उत्पादक शक्ती उत्पादनसंबंध यांच्यामध्ये द्वंद्वात्मक अवलंबित्वाचे संबंध आहेत.

मार्क्स यांची सामाजिक संरचना किंवा सामाजिक व्यवस्था यासंबंधीची संकल्पना उघड नाही. त्यांच्या या विषयावरील फुटकळ लेखनामधून आणि विशेषत: सुपरिचित प्रस्तावनेतील विधानावरून मार्क्स यांच्या विचारात आणि भांडवली शास्त्रातील समाजाच्या विवरणामध्ये असणारा निर्णायक भेद म्हणजे आर्थिक उद्दिष्टांचे वर्चस्व हा नव्हे, तर समाज व्यवस्था म्हणजे एक व्यामिश्र एकात्मता हा त्यांचा दृष्टिकोन हा होय असा निष्कर्ष काढता येतो. मार्क्स यांची सामाजिक व्यवस्थेमध्ये राजकीय आणि आर्थिक विचारप्रणाली यांच्या एकत्रित संबंधाला घेरणारी जैव एकात्मतेची—म्हणजे हे असे संबंध अलग नव्हे, तर एकमेकात गुंतलेले असतात—ही संकल्पना एक अचल एकात्मता नव्हे, तर व्यवच्छेदक गतिमानता दर्शविते[14]. परिणामी त्यांच्या एकात्मतेच्या संकल्पनेत पूर्णत्वाचे त्याच्या विभागांवर प्रभुत्व असणे अध्याहृत आहे. तसेच त्यांची ही संकल्पना सामाजिक संबंधांच्या आसाभोवती (ज्यामध्ये मालमत्तेच्या मालकीचे कायदेशीर संबंध अनुस्यूत आहेत) बांधलेली आहे आणि ती मूलत: 'सामाजिक-ऐतिहासिक प्रक्रिया' म्हणून साकार होते. 'द जर्मन आयडिऑलॉजी' या ग्रंथात मार्क्स लिहितात. 'इतिहास म्हणजे दुसरे काही नाही तर वेगवेगळ्या पिढ्यांचा वंशानुक्रम होय, ज्यामध्ये प्रत्येक पिढी त्यांच्या आधीच्या पिढ्यांकडून त्यांना मिळालेली सामग्री, भांडवल आणि उत्पादक शक्ती यांचा वापर करते आणि अशा रीतीने एका बाजूला पारंपरिक उद्योग अत्यंत वेगळ्या परिस्थितीत सुरू करते आणि दुसऱ्या बाजूला अगदी वेगळ्या उद्योगाद्वारे जुन्या परिस्थितीत बदल घडवून आणते.[*] तसेच, पश्चिम युरोपखंडामधील भांडवलदारी उत्पादन विकासाच्या अपुरेपणाच्या संदर्भात 'कॅपिटल' ग्रंथाच्या पहिल्या भागाच्या जर्मन भाषेतील पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मार्क्स लिहितात की, '(पश्चिम युरोप)' चालू आणि जुन्या अशा दोन्ही अपप्रवृत्तीने ग्रासला आहे. आधुनिक अपप्रवृत्तींच्या जोडीने वारसा म्हणून आलेल्या पुरातन उत्पादन व्यवसायाच्या भग्न अवशेषातून निर्माण झालेल्या अपप्रवृत्तींची संपूर्ण मालिका त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कालविपर्यस्त घटनांच्या अटळ मालिकेद्वारे आपल्यावर दडपण आणते.

सामाजिक-ऐतिहासिक प्रक्रियेच्या संकल्पनेचे एकत्रीकरण करणारे मूलतत्त्व म्हणजे श्रम आणि सहेतुक मानवी श्रमाने वस्तूंचे रूप बदलण्याची प्रक्रिया म्हणजे श्रमप्रक्रिया ही संकल्पना होय. श्रमप्रक्रिया ही माणसाच्या जीवनाची गरज असून ती माणसाच्या इतिहासाची गुरुकिल्ली आहे. श्रम आणि श्रमप्रक्रिया ही संकल्पना मार्क्स यांच्या 'उत्पादकशक्ती' आणि 'उत्पादन संबंध' यांच्यामधील भेदाला आधार पुरविते. उत्पादक शक्ती आणि उत्पादन संबंध यांच्यातील परस्परसंबंध सामाजिक-ऐतिहासिक प्रक्रियेच्या संदर्भात महत्त्वाचे आहेत. कारण सातत्य व प्रगती आणि रूपांतर या दोहोंची निश्चिती त्यांच्यातून होते. उत्पादन संबंध भौतिक उत्पादनास मदत करीत असले, तर सातत्य किंवा प्रगती होते, प्रतिबंध करीत असले, तर रूपांतर होते. त्याचप्रमाणे श्रम आणि श्रमप्रक्रिया ही संकल्पना सर्व सामाजिक व्यवस्थांचे त्यांच्या अस्तित्वाबरोबरच पुनरुत्पादन होण्यासाठी जरूर असणारे 'आवश्यक श्रम' आणि 'अतिरिक्त श्रम' यांच्यामधील भेदाचे महत्त्व सुस्पष्ट करण्यास मदत करते. सर्व समाज व्यवस्थांमध्ये जसे 'अतिरिक्त श्रम'

आवश्यक असतात तसेच कोणतीही समाज व्यवस्था प्रत्यक्ष उत्पादकाच्या पुनरुत्पादनाशिवाय स्वतःचे पुनरुत्पादन करू शकत नाही.

यावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात. (1) ज्यामध्ये प्रत्यक्ष उत्पादकांकडून मोबदला न दिलेले श्रम काढून घेतले जातात त्या वर्गीय समाजाचे वैशिष्ठ्य 'अतिरिक्त श्रम' हे नव्हे तर अतिरिक्त श्रम काढून घेणारे संबंध हे होय. अंतिम विश्लेषणास हे संबंध अनैच्छिक असतात आणि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बळावरच त्यांची हमी राखली जाते, (2) 'अतिरिक्त श्रम' ही शोषणाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी **आवश्यक** असली तरी **पुरेशी** शर्त नाही आणि (3) मालमत्तेच्या संबंधांमध्ये केवळ बदल केल्यामुळे श्रमप्रक्रिया आणि श्रमापासून उत्पादित वस्तु यांच्या संदर्भातील माणसाचा परात्मभाव आपोआप संपुष्टात येत नाही.

अशा रीतीने मार्क्स यांच्या 'इतिहास म्हणजे 'द्वंद्वात्मक प्रक्रिया' की ज्यामुळे आधीच्या संरचनेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या परिस्थितीतूनच नवीन संरचना निर्माण होतात, या विचारातील दोन प्रधान कल्पना म्हणजे अंतर्विरोध आणि सामाजिक कृती या होत. मार्क्स यांच्या दृष्टीने (1) जे वर्गकलह आणि वर्गलढा यांच्यासाठी भूमी तयार करतात, असे शोषणाचे संबंध (अतिरिक्त श्रम काढून घेणारे संबंध) आणि (2) उत्पादक शक्ती आणि उत्पादन संबंध यांच्यामधील अंतर्विरोध क्रांतिकारक वर्गाच्या कृतीद्वारे मिटणे यामध्ये इतिहासामधील घटनांना त्यांचा अर्थ प्राप्त होतो. हे प्रक्रियेची दैवगती (आधी निश्चितीकरण) ही संकल्पना त्याज्य ठरविते आणि आल्थुसे यांच्या 'इतिहास ही विषय नसलेली प्रक्रिया आहे' या पुनःप्रतिपादनाच्या विरुद्ध इ. पी. थॉम्पसन यांनी केलेली खोचक टीका सार्थ ठरविते. जर इतिहासाचे फलित हे अंतर्विरोधी वर्गसंबंध आणि शक्ती यांच्या टक्करीचा एक परिणाम म्हणून पाहिले तर 'आपण आपला इतिहास घडवितो' आणि 'इतिहास स्वतःच घडत असतो' या दोन वरवरच्या अंतर्विरोधी विधानामध्ये मेळ घालणे शक्य होते.

'उत्पादनाबरोबर उत्पादनाच्या परिस्थितीची पुनर्निर्मिती करू शकत नाही अशी सामाजिक व्यवस्था एक वर्षभरही अस्तित्वात राहू शकणार नाही' हे मार्क्स यांचे विधान 'उत्पादन संबंधांच्या पुनरुत्पादनाची निश्चिती कशी होते' हा प्रश्न उपस्थित करते. कोणत्याही समाजव्यवस्थेच्या पुनरुत्पादनाची क्रिया ही मूलतः आर्थिक, राजकीय आणि विचारप्रणाली, या शक्तींच्या एकत्रित कार्यरत होण्यामधून निश्चित केली जाते, असे याचे स्वाभाविक उत्तर द्यावे लागेल तरीही थॉम्पसन यांच्याकडून **एकात्म सामाजिक ज्ञान** याचे होणारे समर्थन आणि त्या प्रक्रियेत सिद्धांताच्या दारिद्र्यावर केला जाणारा हल्ला, या गोष्टी स्वीकारणे योग्य होणार नाही. ऐतिहासिक भौतिकवादाचे खरे उद्दिष्ट म्हणजे 'समाजाविषयीचे एकात्म ज्ञान' आणि मार्क्स यांनी त्यांच्या नंतरच्या लिखाणात स्थिर, अ-ऐतिहासिक संरचना निर्माण केल्या, कारण ते 'राजकीय अर्थशास्त्राच्या सापळ्यात' फसले होते हे थॉम्पसन यांचे विधान या दोन्ही गोष्टी अनेक महत्त्वाचे पद्धती–शास्त्रीय प्रश्न निर्माण करतात. समाजाविषयीच्या एकात्म ज्ञानाचा' मार्ग सहजगत्या रिक्त सार्वत्रिकीकरणाकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि एंगल्स यांनी डुरिंग यांच्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे 'अवकाशाखालील सर्व गोष्टी आणि अधिक काही गोष्टी' यांच्याशी व्यवहार करण्याच्या प्रयत्नातून कोणताही अचूक समज प्राप्त होण्याची शक्यता गृहीत धरता येणार नाही.

भांडवली समाजशास्त्रांच्या पंगू स्थितीमागचे कारण ती केवळ 'एक स्वायत्त व्यवस्था' म्हणून कार्यरत असतात हे नव्हे. तर त्यांच्याकडे सुयोग्य अशा पूर्णत्वाच्या संकल्पनेचा अभाव असतो, असेच म्हणावे लागेल. उदाहरणार्थ उत्पादन-संबंध आणि तणाव, बळ आणि दबाव यांची आर्थिक प्रक्रियेतील कामगिरी लक्षात न घेता करायची तांत्रिक कसरत हे अर्थशास्त्राचे स्वरूप झाले आहे, तर राजकीय सिद्धान्त आर्थिक शक्ती नजरेआड करतात. अशा कप्पीकरणामध्ये गुंतलेले तुटक फुटक अन्वेषण समाज व्यवस्थेच्या पृष्ठभागाखालील निर्णायक गुण दृष्टिपथात आणण्यास प्रतिबंध करते, यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

जरी कप्पीकरण हे स्वतः ऐतिहासिक भौतिकवादाशी विसंगत ठरण्याचे कारण नसले, तरी सामाजिक ऐतिहासिक प्रक्रिया म्हणून मूर्तीकरण होणारी समाजव्यवस्था संकल्पनात्मक 'सिद्धांता' शिवाय समजून घेता येणार नाही. खरे तर, शास्त्रीय विश्लेषणासाठी सैद्धांतिक अपूर्वत्वाची अटळ आणि नितांत गरज असते. वर्तमान काळ हा इतिहास म्हणून समजणे याचा एक अर्थ सैद्धांतिक कोटी आणि संकल्पनात्मक संरचना त्रिकालबाधित नसतात तर काळ जसा पुढे सरकतो तशा त्या सुत्ररूपाने मांडाव्या लागतात असा आहे.

## (2)

## विकासाचे राजकीय अर्थशास्त्र : भारताच्या संदर्भात एक संकल्पनात्मक संरचना

देशांतर्गत आणि विविध देशांमध्ये अशा दोन्ही पातळ्यांवर असमान विकास ही गोष्ट भांडवलदारी व्यवस्थेच्या आणि तिच्या पुढे जाण्याच्या विसंगत क्रियेमध्ये अंगभूत असते. मार्क्स

यांनी म्हटल्याप्रमाणे भांडवलशाही संबंधाच्या सतत वाढत्या प्रमाणावरील पुनरुत्पादनाला गंभीर धोका निर्माण होईल म्हणून कामगारांच्या शोषणातील प्रत्येक घट वा कामगारांच्या मजुरीतील प्रत्येक वाढ या क्रिया संचयाच्या मुलभूत स्वरूपाशी सुसंगत नसतात'.[16] ऐश्वर्य आणि दारिद्रय यांच्या ध्रुवीकरणाविषयीचा मार्क्स यांचा गृहीतसिद्धांत म्हणजे भांडवलदारी व्यवस्थेतील या अंतर्विरोधाचे परावर्तित रूप आहे. अर्थात, दारिद्र्यावर भाष्य करताना भौतिक निर्धनावस्था आणि सामाजिक भिकारीपणा या दोन्ही अवस्था त्यांच्या मनात होत्या. पुढे लेनिन यांनी साम्राज्यवादावर चर्चा करताना 'भांडवलशाही ही वसाहतिक पिळवणुकीची आणि जगातील बहुसंख्य लोकांची. . .सधन आणि प्रबळ शासनांच्या मुठभर "पुढारलेल्या" देशांकडून आर्थिक गळचेपी करणारी एक जागतिक व्यवस्था म्हणून वाढत आहे' असे म्हणून एक प्रकारे मार्क्स यांच्या ध्रुवीकरणाच्या गृहीतसिद्धांताचा विस्तार केला आहे.[17]

अर्थात मार्क्स यांनी त्यांच्या काही लिखाणात आणि लेनिन यांनीसुद्धा भांडवलशाही सर्व जगभर औद्योगिक विकासाला चालना देईल अशी आशा बाळगली होती. मार्क्स यांनी नोंदविल्याप्रमाणे 'औद्योगिकदृष्ट्या प्रगत देश मागासलेल्या देशांना त्यांचे भविष्यातील रूप दाखवीत असतात'.[18] लेनिन यांनीही भांडवलाची निर्यात 'निर्यात होणाऱ्या देशांमध्ये भांडवलशाहीच्या विकासाला चालना देईल' आणि अशा रीतीने 'जगभर भांडवलशाहीच्या भावी विकासाची व्याप्ती व खोली वाढेल' अशी आशा बाळगली होती. भांडवलशाही ही स्पर्श केलेल्या सर्व देशात केवळ विकासाला चालना देण्याऐवजी न्यूनविकासालाही हातभार लावू शकते याची उघड वाच्यता सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीच्या सहाव्या अधिवेशनात, 1928 साली करण्यात आली.[19]

भांडवलशाहीने आर्थिक स्थित्यंतराला चालना देणाऱ्या ऐतिहासिक शर्तींची पूर्ती करून सर्वत्र पुरोगामी भूमिका बजावली, हे नाकारता येत नाही. पण अठराव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या तिच्या विजयाने जगाची दोन भागात वाटणी झाली. एक 'विकसित,' तर दुसरा 'अविकसित'. ज्या प्रक्रियेतून भांडवलशाहीचा विकास झाला आणि तिच्या युरोपमधील व विदेशी शाखा यांचे औद्योगीकरण झाले, त्याच प्रक्रियेतून आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका, येथे न्यून-विकास झाला. **न्यूनविकास हा एक इतिहासाचा परिणाम आहे.**

ज्या प्रकारे वेगवेगळे देश भांडवलदारी व्यवस्थेला जोडले गेले, त्यांत त्यांच्या सुरुवातीच्या परिस्थितीतील भेदामुळे निश्चितच विविधता होती. तरीही वासाहतिक विळख्यामधून बाहेर पडलेल्या देशांसाठी सामायिक लक्षण म्हणजे 'शहर' आणि 'खेडेगाव' यांच्यातील फूट हे होय, जी मार्क्स यांनी म्हटल्याप्रमाणे 'सर्व विकसित श्रम विभागणीचा 'पाया' असते. याचे कारण ते स्वतःच आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याच फुटीच्या विकासाचे फळ होते.[20] भांडवलशाहीच्या जगभर झालेल्या विस्ताराने जगाची औद्योगिक देश म्हणजे 'शहरे' आणि शेतीप्रधान देश म्हणजे 'खेडेगाव' अशी विभागणी केली गेली आणि त्याचबरोबर प्रथम भांडवलशाही उदयाला आलेल्या देशात अस्तित्वात असणारी फूट नंतरच्या शेतीप्रधान देशातही निर्माण झाली. मार्क्स यांची वाढीव पुनरुत्पादनाची रूपरेखा, सापेक्षतेने कमी वापरल्या जाणाऱ्या 'भांडवल' ग्रंथाच्या दुसऱ्या खंडातील भांडवलाच्या परिभ्रमणाची संकल्पना आणि त्यांच्या बरोबरीने 'शहरे' आणि 'खेडेगाव' ह्यांच्यातील फूट ही आधुनिक भारताची आर्थिक बाजू समजून घेण्यासाठी आवश्यक आधार पुरवू शकते.

भारतामधील अवरुद्ध आणि खंडित होणारा विकास हा प्रश्न समजून घेण्यासाठी अर्थव्यवस्थेचे 'स्थलभूत' आणि 'क्रियाभूत' अशा दोन प्रकारे विभाजन कल्पिणारी संकल्पनात्मक संरचना उपयोगी ठरेल. जर 'स्थलभूत' विभाजन भूतकालाचे पुनर्चिंतन करीत असेल, तर 'क्रियाभूत' विभाजन भविष्यकाळाकडे पाहण्याचे परिमाण आहे. 'शहर' आणि ग्रामीण परिसर' अशा विभाजनाची उपपत्ती आपणास वासाहतिक वारशामधून मिळालेल्या समाजव्यवस्थेमध्ये मिळते. मार्क्स यांच्याप्रमाणे अर्थव्यवस्थेचे तीन विभागात 'क्रियाभूत' विभाजन – (1) श्रमिकांच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे 'मूलभूत' विभाग (2) भांडवल-दार आणि जमीनदार वापरतात अशा (चैनीच्या) वस्तूंचे उत्पादन करणारा 'अमूलभूत' विभाग आणि (3) भांडवली वस्तूंचे उत्पादन (ज्या तीनही विभागातील वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरल्या जाऊ शकतात.) उत्पादन करणारा विभाग-आपल्यास एका बाजूला घोषित किंवा सामाजिकदृष्ट्या स्वीकारलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अर्थव्यवस्था कोणत्या दिशेने हाकली पाहिजे आणि दुसऱ्या बाजूला असा हस्तक्षेप करण्यात कोणत्या अडचणी आहेत, हे दाखविण्यासाठी मदत करते.

असे दोन प्रकारे विभाजन आणि त्याचबरोबर आजच्या ऐतिहासिक घडीची काही लक्षणे .– (1) भारतामध्ये प्राथमिक भांडवलसंचयाची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी, औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर बाजारपेठेच्या संरचनेचे झालेले एकत्रीकरण (2) प्रगत भांडवलशाहीमध्ये नफ्याच्या ओढीने होणाऱ्या वाढीचे उत्पादित वस्तूंच्या मिश्रणावर होणारे परिणाम (3) सामाजिक-राजकीय

प्रक्रिया दारिद्र्य आणि बेरोजगारी या विचारात घ्यायच्या मूलभूत समस्या असे ठरवीत असल्या तरी प्राथमिक संचयाची आर्थिक सक्ती विरुद्ध दिशेने ओढत असते—यांना उघड मान्यता देऊन 'शहर' आणि 'ग्रामीण परिसर' यांमध्ये आणि यांच्यामध्ये श्रमशक्ती, क्रयवस्तू आणि चलने यांची बाजारपेठेच्या संदर्भात सुरू असणारी प्रक्रिया समजून घेणे शक्य आहे.

आजच्या भारतीय 'समाजाच्या' गतिमानतेच्या विश्लेषणासाठी सुचविलेल्या संकल्पनात्मक संरचनेचा उद्देश 'पृष्ठभागावरील घटनांच्या गढूळपणाला भेदून खाली असलेल्या साध्या मूलतत्त्वांचा वेध घेणे' हा असला, तरी अशी संरचना खास वैशिष्ट्ये लक्षात घेण्यास मदत करील एवढी पुरेशी लवचिक असली पाहिजे. हिचा विशिष्ट परिस्थितीत प्रत्यक्ष वापर करताना ऐतिहासिक परिस्थिती म्हणजे विशिष्ट समाज व्यवस्थेची ऐतिहासिक उत्क्रांती आणि विशिष्ट ऐतिहासिक घडीमधील त्या व्यवस्थेची गतिमानता या दोन्ही गोष्टींना उघड मान्यता देण्याची गरज आहे. भारताच्या संदर्भात 'शहरे' आणि 'ग्रामीण परिसर' या विभाजनाचे समर्थन करण्याची गरज नाही. जरी भांडवलदारी व्यवस्थेच्या वाटचालीमध्ये असमान विकास अंगभूत असला, तरी भारतामध्ये त्याने विशिष्ट रूप धारण केले आहे. कारण येथे भांडवलशाहीची वाढ एतद्देशीय स्वरूपाची नव्हती. ग्रामीण परिसरात भांडवलीपूर्व संबंध तसेच राखून काही शहरी विभागात भांडवलदारी कारखान्यांचा येथे विकास झाला. खरेतर येथील पारंपरिक उद्योग उद्ध्वस्त झाल्यामुळे शेतीक्षेत्रावर लोकसंख्येचा भार वाढला आणि त्याने ग्रामीण भागात भांडवलीपूर्व संबंधांना बळकटी आणली. परिणामी छोट्या शेतकऱ्यांचे निम-कामगारांत रूपांतर झाले.

अवरुद्ध आणि खंडित विकासाचा प्रश्न आणि विदीर्ण होणाऱ्या शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेवर उभारलेले अपूर्ण औद्योगिकीकरण, जे अर्थव्यवस्थेचे पुरेशा गतीने एकत्रीकरण करू शकत नाही, याचा अर्थ भारताने अजून 'प्राथमिक संचयाचा' टप्पा ओलांडलेला नाही, असा होतो. येथील उत्पादक शक्तींच्या विकासाची कनिष्ठ पातळी लक्षात घेता अगदी अ-भांडवली विकासाचा मार्गसुद्धा येथे संचयाची कटू गरज टाळू शकत नाही. जरी ही गोष्ट 'वाढावा' निर्माण करण्यासाठी पाया विस्तृत करण्याची आणि वाढाव्याची तिसऱ्या विभागात गुंतवणूक करण्याची गरज व्यक्त करीत असली तरी त्या मार्गात अडचणी निर्माण करणाऱ्या अनेक शक्ती येथे कार्यरत आहेत.

भांडवलदारी उत्पादनाने जमिनीच्या मालकीमध्ये पूर्ण बदल घडवून आणले नाहीत त्यामुळे 'खंड' हा स्वयं हक्काचा वाढावा ठरतो. वासाहतिक कालखंडात औद्योगिक भांडवलाचा दलाल म्हणून व्यापारी भांडवलाने उत्पादक शक्तींचा विकास खच्ची केला असला, तरी स्वातंत्र्योत्तर काळात शहरात व्यापारी भांडवलाचे मक्तेदारी भांडवलात रूपांतर झाले आहे. याउलट ग्रामीण भागात व्यापारी आणि सावकार यांच्या भांडवलाच्या माध्यमातून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यापारी शोषणावरून उघड होते की मार्क्स यांनी ज्याचा ऐतिहासिकदृष्ट्या प्रतिगामी असा उल्लेख केला आहे तो 'दुसरा मार्ग' व्यापारी भांडवलाने ग्रामीण भागात अनुसरला आहे.

सध्याच्या ऐतिहासिक परिस्थितीत विकासाची अवरुद्ध आणि खंडित प्रक्रिया चालू ठेवण्यात विभाग क्रमांक दोन महत्त्वाची भूमिका बजावतो जेथे तांत्रिक प्रगतीचा अटळ परिणाम चैनीच्या वस्तूंच्या (म्हणजे अमूलभूत क्रयवस्तूंच्या) उत्पादनात होतो आणि ज्या अंतःप्रेरणेने भांडवल संचय होतो त्यामुळेच वाढत्या उपभोगालाही चालना मिळते. अशा कालखंडात आज आपण आहोत. 'अभिजात भांडवलदार वैयक्तिक उपभोग आपल्या कर्तव्याविरुद्ध केलेले पाप मानत आणि उपयोग म्हणजे संचय "टाळणे" असे मानत तर आधुनिक भांडवलदार संचय म्हणजे सुख "टाळणे" असे मानायलाही कमी करणार नाहीत या मार्क्स यांच्या अवलोकनाचे पुनःस्मरण केले पाहिजे.

अविकसित देशाचा प्रश्न त्यांच्या औद्योगिकीकरणाच्या भवितव्याच्या दृष्टीने समजून घेताना भांडवलदारी व्यवस्थेच्या उतरंडीच्या संरचनेशी ते बांधलेले आहेत हे जसे आपण लक्षात घेतो तसेच समाजवादी देशाच्या 'दुसऱ्या' जगाचे अस्तित्वही लक्षात घेणे आवश्यक आहे. भांडवलदारी उत्पादन संबंधाशी निगडित असणाऱ्या त्या उत्पादक शक्तींच्या वाढीने असमान विकास ही लक्षण असणारी भांडवलशाहीची जागतिक व्यवस्था विकसित करण्यास मदत केली असली, तरी भांडवलदारी व्यवस्थेच्या भौतिक पायाला अनुरूप अशा कल्पना, कायदे आणि राजकीय संस्था यांनी भांडवलशाहीने पादाक्रांत देशातही पुरोगामी भूमिका बजावली होती. 'स्थलांतरित' विचारांच्या संकल्पनेशिवाय सामाजिक संरचना मुळापासून बदलणाऱ्या क्रांतिकारक चळवळीचे किंवा वसाहती मधील राष्ट्रीय चळवळीचे स्पष्टीकरण करता येणार नाही. आज अविकसित देश 'औद्योगिकदृष्ट्या अधिक विकसित देशांकडे' केवळ स्वतःची भविष्यातील प्रतिमा' म्हणून पाहात नाहीत, 'दुसऱ्या' जगाचा उदय त्यांना त्या स्थितीला पोहचविणाऱ्या दोन पर्यायी सामाजिक-आर्थिक व्यवस्था-दोन पर्यायी वाटा-सुचवीत असतो.

'पहिले' आणि 'दुसरे' जग यांच्यातील वैचारिक वादंगाचे

एक महत्त्वाचे अंग म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या अंतापासून राष्ट्रांचा न्यूनविकास व त्यांचे दारिद्र्य या प्रश्नांविषयी वाढणारी आस्था हे होय. विकासाची समस्या जगाच्या उत्तर-दक्षिण व पूर्व-पश्चिम अशा दोन्ही विभाजनाला छेद देते. पण दारिद्र्याचा उत्पन्नाच्या वाटपाशी घनिष्ट संबंध असल्यामुळे आणि उत्पन्नातील विषमता केंद्रीय नियोजन असणाऱ्या समाजवादी देशात बरीच कमी असल्यामुळे दारिद्र्याचा प्रश्न हा विकसित भांडवली देश आणि अविकसित 'तिसऱ्या' जगातील देश यांच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. गरीब देशातील दारिद्र्य व्यापक आणि भयाण स्वरूपाचे आहे, आणि विशेषत: वासाहतिक शृंखलांमधून मुक्त झालेल्या देशांमध्ये सार्वत्रिक दारिद्र्याच्या उच्चाटनाचा विचार केवळ गतिमान अर्थव्यवस्थेच्या संदर्भातच नव्हे तर सामाजिक स्थित्यंतराच्या संदर्भात केला जातो. विकसित भांडवलदारी देशांमधील संपन्नतेच्या बरोबर असणारे दारिद्र्य अडचणीत टाकणारे आहे. कारण त्याद्वारे 'कल्याणकारी शासन' तिचे निर्मूलन करील, ही आशा विफल झाली आहे असे निदर्शनास येते.

दारिद्र्य हा 'एकात्म जगाचा प्रश्न' आहे याला जी आज मान्यता दिली गेली आहे ती पहिल्या विकास दशकाच्या अनुभवामुळे 'वाढप्रधान विकासनीती' आणि 'झिरपण्याचा' सिद्धांत यांच्याबाबत भ्रमनिरास झाला आहे ही गोष्ट प्रतिबिंबित करते. आणखी खोलात जाऊन हा प्रश्न सुव्यवस्थेच्या कल्पना प्रणालीशी जोडला पाहिजे. सुव्यवस्थेची कल्पनाप्रणाली ही तशी नाविन्यपूर्ण नाही. औद्योगिकपूर्व समाजाच्या अवस्थेत आणि औद्योगिक समाज निर्मितीच्या वेळी झालेल्या स्थित्यंतराच्या कालखंडात सुव्यवस्था या संकल्पनेची विश्वव्याप्ती आणि भावनिक शक्ती आज इतिहासकारांनी ओळखली आहे. सुव्यवस्थेच्या कल्पनाप्रणालीप्रमाणेच आता इतिहासलेखनात सुव्यवस्था कशी प्रस्थापित केली जाते, याविषयी वाढत्या प्रमाणात चर्चा होत आहे.[24] अलिकडे झालेल्या या सुव्यवस्थेच्या कल्पनाप्रणालीच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील विस्तार मात्र गुणात्मकरित्या दोन प्रकारे भिन्न आहे.

आधीच्या काळात सुव्यवस्था या संकल्पनेच्या जोडीने कनिष्ठपणा आणि आज्ञापालन याही संकल्पना अस्तित्वात होत्या. सुव्यवस्थेची कल्पनाप्रणाली राज्यकर्त्या वर्गाच्या हितसंबंधांना पूरक असली, तरी प्रतिकूल वातावरणात आणि विशेषत: सामाजिक सुव्यवस्थेला धोकादायक असणाऱ्या टंचाईच्या काळात सामाजिक स्थैर्य राखणारे एक कार्यरत मूलतत्त्व म्हणूनही तिने औद्योगिकपूर्व समाजात कार्य केले आहे. त्यामुळेच टंचाईने कधीमधी गोंधळाची परिस्थिती निर्माण केली असली, तरी असे प्रसंग वारंवार उद्भवले नाहीत या वरवर कोड्यात टाकणाऱ्या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण होते. पितृभावी पारंपरिक समाजामध्ये 'प्रामाणिक' गरिबांना किमान निर्वाहाची शाश्वती देणे हे अंतिमत: राज्यकर्त्यांच्या हिताचे होते.[25]

औद्योगिकपूर्व समाजाकडून औद्योगिक समाजाकडे झालेल्या संक्रमणामध्ये आर्थिक व्यवहारात स्थित्यंतर घडून आले. आर्थिक संघटन हे पुनरुत्पादन आणि भांडवल संचय यांच्या भोवती फेर धरू लागले. बाजारपेठेसाठी उत्पादन या क्रियेमध्ये अर्थव्यवस्था बाजारपेठेच्या स्वनियंत्रणाच्या अधीन केली गेली, आणि विक्रीसाठी उत्पादन केल्या न जाणाऱ्या कामगार, जमीन आणि चलन या घटकांनाही क्रयवस्तूची लक्षणा प्राप्त झाली. नव्या संदर्भात निर्वाहाच्या अरिष्टाने जुने सत्ताधारी वर्ग आणि जनसामान्य यांच्यामध्ये जुन्या घडीच्या संदर्भात ओढ उत्पन्न केली. इ. पी. थॉम्पसन यांनी उल्लेखलेल्या अठराव्या शतकातील 'इंग्रज माणसांच्या गर्दी'ने 'नैतिक अर्थव्यवस्थेचे' समर्थन करताना केवळ आधी घडून आलेले बदल थोपविण्याचा प्रयत्न केला नाही, तर परिणामी ती 'मागे पाहणारी' ठरली.

याच्या उलट आज सुव्यवस्था या संकल्पनेच्या जोडीने येणारी दुसरी संकल्पना म्हणजे समता होय. आज 'नाही रे' गटात मोडणाऱ्या व्यक्ती आधीच्या शतकांमधील लोकांप्रमाणे 'भाकरीचा हक्क' आणि 'काम मिळण्याचा हक्क' यांच्यासाठी आग्रह धरीत नाहीत तर समतेच्या हक्काचा आग्रह धरीत आहेत. त्यामुळे ते 'आहे रे' गटाचे हितसंबंध जपणाऱ्या **स्थैर्या** ऐवजी बदल इच्छित आहेत. जर 'नवीन आर्थिक व्यवस्थेसाठी' दिलेल्या हाकेचे स्पष्टीकरण समाजाच्या काही विभागामध्ये 'जगाचे स्वत:विषयीच्या समाजामधील वाढते अस्थैर्य दर्शविते' अशा रीतीने होत असेल, तर त्याचे कारण ती एकाच वेळी आधीच्या व्यवस्थेमध्ये फायदा होणाऱ्या लोकांमध्ये रक्तरंजित अराजकाच्या लाटेची' भीती तर बळी ठरणाऱ्यांसाठी जेथे 'जगणे हे भाग्य वाटावे' अशा सुखद 'पहाटेची' आशा प्रतिबिंबित करते हेच आहे.

सुव्यवस्थेच्या कल्पनाप्रणालीचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील अलिकडच्या काळातील विस्तार ऐतिहासिक अभ्यासांपेक्षा अधिक व्यामिश्र प्रक्रियांवरील चर्चा उपस्थित करतो. कारण संपत्ती आणि सत्ता यांच्या उतरंडीमध्ये वेगवेगळ्या जागांवर असणाऱ्या **देशांतर्गत** गटांतीलच नव्हे, तर विकासाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर (उत्पादक शक्तींची पातळी आणि नवीन समाजव्यवस्थेच्या संक्रमणांचा टप्पा अशा दोहोंचा अंतर्भाव होईल अशा रीतीने विकासाच्या पातळ्यांचा अर्थ येथे अभिप्रेत आहे) असणाऱ्या विभिन्न **देशांमधील** (परस्पर) संबंध या व्यामिश्र प्रक्रियांमध्ये गर्भित आहेत. तसेच 'नवीन आर्थिक

व्यवस्था ' या संकल्पनेत मूलतः **प्रस्थापित घडीचे** समर्थन आणि ' विषम संबंधावर ' आधारलेल्या व्यवस्थेकडून समतेच्या दिशेने केलेल्या **बदलाचे** समर्थन या दोहोंतील **संघर्ष** अभिप्रेत आहे.

दारिद्र्याच्या समस्येविषयी असणाऱ्या आस्थेचे दोन महत्त्वाचे लक्षार्थ आहेत. वाढाव्याची 'निर्मिती' आणि त्याची 'वटवणूक' या एवढीच त्याची 'गुंतवणूक' ही देखील वाढीव पुनरुत्पादन आणि त्याचबरोबर गरिबांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. जेव्हा विपुलता नव्हे तर कमतरता हीच वाढाव्याच्या संदर्भातील समस्या आहे आणि जेव्हा नफ्याच्या ओढीने होणारी वाढ 'चैनीच्या वस्तूंच्या' उत्पादनाला चालना देते अशा स्थितीत वाढाव्याची तीन विभागातील वाटणी निर्णायक बनते.

शासनसंस्थेविषयीचा उदारमतवादी वा मार्क्सवादी यांत्रिकी दृष्टिकोन उपयोगी पडत नाही. सुस्पष्ट केलेल्या राष्ट्रीय हितसंबंधांचे संवर्धन करणारा एक विवेकी वर्गविहीन घटक अशा पद्धतीने शासनसंस्थेकडे पाहणारा उदारमतवादी किंवा 'अनेकतत्त्ववादी लोकशाही' विचार मार्क्सप्रणित चौकटीशी जुळणारा नाही. तसेच, सत्ताधारीवर्गाच्या हातातील 'हत्यार' म्हणून शासनसंस्थेकडे पाहणारा मार्क्सप्रणित विचार शासनसंस्थेने सत्ताधारी वर्गाच्या वतीने स्वायत्तपणे कार्यरत होणे आणि त्या वर्गाच्या **आज्ञेवरून** कार्यरत होणे, यामध्ये फरक करण्यास असमर्थ ठरतो.[27] वर्गलढा आणि तळागाळातील लोकांकडून येणारे दबाव सत्ताधारी वर्गाच्या पुढारीपणाला किती प्रमाणात आव्हान देतात, हे शासनसंस्थेच्या स्वायत्ततेची मर्यादा प्रतिबिंबित करते. दुसरीकडे जोपर्यंत सत्ताधारी वर्ग पूर्णपणे पुढारीपण गमावत नाही तोपर्यंत सत्ताधारी वर्ग आणि शासनसंस्था सामाजिक व्यवस्था कायम राखण्याच्या सामायिक हितसंबंधामध्ये भागीदारी करत असतात प्रस्थापित समाज व्यवस्थेला टिकवून ठेवण्याच्या उद्दिष्टामध्ये मूलभूत अंतर्विरोध दूर करण्याच्या दृष्टीने हस्तक्षेप करण्यामधील शासनसंस्थेच्या सामर्थ्याच्या स्वाभाविक अडचणी गर्भित आहेत.[28]

## (3)

## भारताचा विकासाचा अनुभव[29]

'न्याय्य' समाजासाठी नियोजनाचा भारतीय प्रयोग हा सुरुवातीला एक वैशिष्ट्यपूर्ण म्हणून गणला गेला. पंडित नेहरू ज्याला 'लोकशाहीधिष्ठीत नियोजित समूहवाद' म्हणत त्यात खाजगी मालमत्तेचे उच्चाटन नव्हे, तर मूलभूत आणि महत्त्वाच्या उद्योगांवर समाजाची मालकी अभिप्रेत होती. मिश्र अर्थव्यवस्थेच्या संस्थात्मक चौकटीत एका 'न्याय्य' समाजासाठी नियोजन हा स्वतंत्र भारताला मिळालेला एक नेहरूंचा वारसा होता. सार्वत्रिक दारिद्र्याच्या निवारणासाठी औद्योगिकीकरणाची आणि देशाच्या औद्योगिकीकरणासाठी शासनसंस्थेवर अवलंबून असण्याची गरज नेहरूंनी जाणली होती. सुरुवातीला तर 'भारतामध्ये' एक क्रांतिकारक नियोजनच केवळ शेती आणि उद्योग हे दोन संबंधित प्रश्न सोडवू शकेल अशी भूमिका त्यांनी घेतली होती. तरीही 1939 साली त्यांनी 'संक्रमणाची सुरुवात म्हणून प्रस्थापित रचना' स्वीकारण्याचे समर्थन केले. 'वर्गीय पातळीवरील अकाली विरोधाने फूट पडून नवसमाजनिर्मितीच्या कार्यात अडथळा येईल' एवढीच भीती त्यांना वाटली नाही तर 'समाजवाद वगळून नियोजनाला सुरुवात करूनही आपण 'अटळपणे समाजवादाच्या कोणत्या तरी रूपापर्यंत पोहोचू' असाही त्यांचा विश्वास होता.

नेहरूंनी **केवळ** न्याय्य साधनाच्या साहाय्याने न्याय्य समाज निर्मितीवरच नव्हे, तर धार्मिक देशामध्ये निधर्मी शासन संस्था निर्मितीवरही भर दिला. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांविषयाची आत्मीयता आणि त्यांचा विकास आणि त्यांनी साध्य केलेल्या गोष्टीवरील विश्वास, यामुळे भांडवली नेतृत्वाची आधुनिकीकरणाची श्रद्धा नेहरूंनी व्यक्त केली. परंतु निश्चित वर्गीय आशयाशिवाय आधुनिकीकरणाची संकल्पना विश्लेषणाचे साधन म्हणून अपुरी पडते. आणि वर्गीय तणाव व वर्गसंघर्ष यांची दखल घेतली नाही, तर ती धोरणविषयक हत्यार म्हणून कुचकामी ठरणे अटळ आहे. याच कारणामुळे 'समाजवाद वगळून नियोजनाला सुरुवात करूनही आपण अटळपणे समाजवादाच्या कोणत्यातरी रूपापर्यंत पोहोचू' ही नेहरूंची श्रद्धा फोल ठरली. मार्क्स यांनी म्हटल्याप्रमाणे 'जेथे वर्गसंघर्ष ही एक हिणकस आणि निकृष्ट घटना म्हणून बाजूला सारली जाते, तेथे "मानवतेचे खरे प्रेम" आणि "न्याया"संबंधी पोकळ भाषा वगळता समाजवादाला कोणताही आधार उरत नाही'.

नियोजित विकासाची संकल्पना ही एक स्फूर्तिदायी साधन होण्यास सोव्हिएट युनियनचे नियोजनामधील यश कारणीभूत होते. पण रशिया'मध्ये नियोजन ही एक राजकीय संकल्पना होती आणि नियोजनाचा उद्देश समाजपरिवर्तनासाठी संपूर्ण राष्ट्र सज्ज करणे हा होता, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तेथील नियोजन म्हणजे औद्योगिकीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी वापरायचे एक तांत्रिक किंवा आर्थिक साधन नव्हते आणि बोलशेव्हिक पक्षाची अधिसत्ता प्रस्थापित होऊन एक दशकापेक्षा अधिक काळ लोटल्यावर आणि शेती-संबंधाविषयी महत्त्वाचा प्रश्न सोडविल्यानंतर योजनेची सुरुवात करण्यात आली होती.

'योजनेविषयी जाणीव निर्माण झालेल्या' जगात स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये सरकारने आपले लक्ष विकासावर केंद्रित करणे अटळ होते. परंतु स्वातंत्र्यलढ्यामध्ये 'नाही रे' गटाच्या लोकांना स्वातंत्र्यानंतर उचित न्याय देण्याचे आश्वासन दिलेले असल्यामुळे केवळ आर्थिक विकास हे उद्दिष्ट असणे शक्य नव्हते. त्यामुळे आर्थिक विकासासाठी नियोजन करताना समाजवादी समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गोष्टींची पूर्तता करण्याआधीच नियोजनामध्ये 'समाजवादी' आशय भरण्याचा प्रयत्न सरकारने केला.

मिश्रअर्थव्यवस्थेच्या चौकटीत समाजवादी उद्दिष्टांसाठी प्रयत्न यामध्ये दोन गोष्टी अभिप्रेत होत्या. एकीकडे भारताच्या राज्यघटनेनुसार मालमत्तेचा हक्क हा **मूलभूत हक्क** असला तरी जीवनवेतनावर काम मिळण्याचा हक्क तशा स्वरूपाचा नाही. त्याचबरोबर **शासनसंस्थेच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांना** अनुसरून पाठोपाठच्या पंचवार्षिक योजनांमध्ये अंतर्भूत केलेल्या आर्थिक आणि सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांमध्ये महत्त्वाचा भाग म्हणून सामाजिक न्याय, रोजगाराचा हक्क आणि पुरेशा वेतनाचा हक्क यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. दुसरीकडे उत्पादनसाधनांची प्रत्यक्ष मालकी आणि खाजगी आर्थिक व्यवहारांचे संवर्धन व नियंत्रण करणे, या दोहोंच्याही संदर्भात शासन संस्थेने केवळ गुंतवणूकदाराची महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली नाही तर यंत्रसामग्री उभारून उत्पादनशक्ती उत्पन्न करणे आणि बाजारपेठेतील मागणीची पातळी कायम राखणे अशी दुहेरी भूमिका शासनसंस्थेच्या गुंतवणुकीने बजावली आहे. शेतीक्षेत्रामध्ये मूलतः धोरणात्मक हस्तक्षेपावर विसंबून राहण्यात आले असले तरी औद्योगिक क्षेत्रामध्ये अशा हस्तक्षेपाबरोबर उत्पादन प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष सहभागही घेण्यात आला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाटचालीचे मूल्यमापन अनेक पर्यायी निकष वापरून करता येईल. नियोजनाच्या सुरुवातीपासून आढळणाऱ्या सरासरी वार्षिक वाढीच्या दराची तुलना या शतकाच्या पूर्वार्धामधील जवळपास गतिरहिततेशी करता येईल. किंवा आज विकसित असणाऱ्या देशांच्या सुरुवातीच्या काळातील वाढीच्या दराशी त्याची तुलना करता येईल. पण अभिवचन व संपादित यश आणि हेतू व सिद्धी यांच्या संदर्भात पाठोपाठच्या योजनांमधील तफावत अधिक समर्पक ठरते. 1950–51 ते 1978–79 या कालखंडात राष्ट्रीय उत्पन्नात दरसाल केवळ 3·5 टक्के, दरडोई उत्पन्नात 1·3 टक्के आणि दरडोई उपभोगात 1.1 टक्के असा वाढीच्या कालाचा दर आढळतो. 1950–51 नंतरचा तीस वर्षांचा काळ 1950–51 ते 1965–66 व 1966–67 नंतरचा काळ अशा दोन कालखंडात विभागला तर नंतरच्या कालखंडात पृथक घसरण दिसून येते. 1950–51 ते 1984–85 या 34 वर्षांत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वार्षिक वाढीच्या कलाचा दर 3.57 टक्क्यांवर घुटमळत राहिल्यामुळे दिवंगत अर्थतज्ज्ञ प्राध्यापक राजकृष्ण यांनी त्यांचे हिंदू वाढीचा दर असे नामकरण केले.

सातव्या दशकाच्या सुरुवातीला दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण या स्वरूपात दारिद्र्याचे मोजमाप करताना अनेक प्रकारे त्याचा अंदाज 38 ते 46 टक्क्यांपर्यंत करण्यात आला. 1980–85 या कालखंडासाठी केलेल्या सहाव्या पंचवार्षिक योजनेनुसार 1972–73 साली 54 टक्के ग्रामीण लोक आणि 41 टक्के शहरी लोक दारिद्र्य रेषेखाली होते तर 1977–78 साली संबंधित आकडेवारीचा अंदाज 51 व 38 टक्के असा करण्यात आला होता. सहाव्या योजनेच्या मध्यवर्ती मूल्यांकनात 1979–80 सालासाठी दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या लोकांची टक्केवारी 47 वरून 51.1 अशी दुरुस्त करण्यात आली (कारण 1981 च्या जनगणनेच्या आधारे लोकसंख्येच्या अंदाजात फेरफार घडून आले). दारिद्र्याच्या या प्रश्नाच्या संदर्भात दोन अस्वस्थ करणाऱ्या घटना लक्षात घेता दारिद्र्याचे मापन या मुद्द्याच्या संदर्भात काही चर्चा करणे उपयुक्त होईल.

विकासाच्या व्यूहरचनेचा केंद्रीय घटक असणाऱ्या विकासाच्या दराला दारिद्र्याच्या 'शोधाने' पदच्युत केल्यावर अर्थतज्ज्ञांनी करायच्या अभ्यासक्रमात त्यानुसार बदल घडून आला. अगोदरच्या आर्थिक वाढ या संकल्पनेने प्रभावित झालेल्या कालखंडाचे लक्षण जर वाढप्रतिमाने आणि योजनाप्रतिमाने असली तर दारिद्र्याच्या दडपणामुळे झालेल्या नंतरच्या नैराश्यवादाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे दारिद्र्यविरोधी कार्यक्रमाचा पाया ठरू शकेल असे गरिबीचे विवरण हेच म्हणावे लागेल. नव्या गरिबीच्या अर्थशास्त्रामुळे गरिबांची संख्या मोजण्यासाठी (त्यात दारिद्र्य रेषेच्या काटेकोर आखणीबाबत झालेल्या अनेक वादांसह), गरिबीच्या विभिन्न प्रकारांवर प्रकाश टाकण्यासाठी असे अनेक अभ्यास झाले. आधीच्या आकडेवारीत दिलेल्या निष्कर्षांचा गोषवारा ज्या दारिद्र्यव्याप्तीचा शोध घेणाऱ्या अभ्यासांवर आधारित आहेत त्यात 'आधारहीन' (आरबिट्ररी) व्याख्या केलेल्या दारिद्र्य रेषेचा वापर केलेला आहे. किमतीमधील बदलानुसार जरी काही फेरबदल करण्यात आला असला तरी दारिद्र्य रेषेची पातळी 1961–62 चीच आहे. दरडोई उत्पन्नात अगदी नगण्य का होईना पण वाढ झाली असली तरी त्या आधारे दारिद्र्य रेषेची पातळी उंचावलेली नाही.

निर्वाहाची पातळी या स्वरूपात दारिद्र्याची व्याख्या ही 'आधारहीन' (कारण त्यामध्ये बाह्य परिमाणाचा अभाव असतो) आणि 'सापेक्ष' (कारण ती एकंदर श्रीमंतीच्या पातळीनुरूप बदलत जाते) असते ही गोष्ट गरीब लोकांची

सध्या दारिद्र्याच्या परिमाणाशी संवेदक असल्याचे दर्शविते. दारिद्र्याच्या मापनाचे परिमाण 'उदार' किंवा 'काटेकोर' आहे यावरून तीच आकडेवारी दारिद्र्याचा प्रश्न 'अर्थपूर्ण' किंवा 'क्षुल्लक' ठरवू शकते. डॉ. सुखात्मे यांच्या प्रतिवादावरून दारिद्र्याच्या निर्वाहपातळीच्या संदर्भात सातव्या दशकाचा उत्तरार्ध आणि आठव्या दशकाचा पूर्वार्ध या कालखंडात सुरू झालेले वादविवाद हे या संदर्भातील सर्वोत्तम उदाहरण आहे. डॉ. सुखात्मे यांच्या मते 'न्यूनपोषणाचे' आणि त्याद्वारे दारिद्र्याचे मापन करण्याचे अस्तित्वातील किमान उष्मांकीय परिमाण खूपच उच्च आहे. संख्याशास्त्रीय पद्धत आणि विश्लेषण बरोबर आहे की नाही हा प्रश्न तूर्त बाजूला ठेवला तरीही ही सूचना गरिबांच्या शारीरिक जीवनासाठी इतरांपेक्षा वेगळे परिमाण गृहित धरते-गरीब लोकांतील अनेकजण कमी आहार घेण्याला यशस्वीपणे सरावतात आणि त्यामुळे जरी गरीब आणि कदाचित वजनाने कमी असले तरी रोगट असतातच असे नाही हा डॉ. सुखात्मे यांचा युक्तिवाद अपुरा आहार आणि अस्वास्थ्य यांच्या व्यक्तीवरील परिणामांकडे दुर्लक्ष करतो. 'भुकेला माणूस हे समाजावरील ओझे आहे. तो काम करू शकत नाही... तो आर्थिक आणि सामाजिक विकासाला प्रतिबंध करील.' असा डॉ. सुखात्मे यांच्याप्रमाणे युक्तिवाद करणे म्हणजे गरिबीच्या उपयुक्ततावादी संकल्पनेचा वापर करणे आणि गरिबी ही स्वायत्त घटना मानणे असा होतो. याहूनही वाईट म्हणजे असा युक्तिवाद राजकीयदृष्ट्या उपयुक्त अशा पद्धतीने गरिबीची व्याख्या करण्यास सहजपणे शास्त्रीय मान्यता प्राप्त करून देऊ शकतो. आणि दारिद्र्याचा प्रश्न सोडविणे जसजसे कठीण होत जाते तसे सत्तास्थानांवरील लोकांना त्याची व्याप्ति घटली असे दाखविण्याची संधी उपलब्ध करून देतो[30]

सहाव्या योजनेच्या मध्यावर्ती मूल्यांकनामध्ये दारिद्र्यात घट झाल्याचा जो अविश्वसार्ह दावा करण्यात आला होता तो निदान अप्रत्यक्षरित्या तरी दारिद्र्य रेषेच्या संदर्भातील वादविवादाचा परिणाम होता की काय हे सांगणे कठीण आहे. सहाव्या योजनेच्या पहिल्या दोन वर्षात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण 51·1 टक्क्यांवरून 41.5 टक्क्यापर्यंत घसरल्याचा दावा करण्यात आला होता. गरीब लोकांच्या प्रत्यक्ष संख्येत 33 कोटी 90 लक्षांपासून 28 कोटी 20 लक्षांपर्यंत घट झाल्याचे नोंदविण्यात आले होते. ही अंदाजित घट दारिद्र्य रेषेची पातळी खाली आणल्यामुळे झाली नव्हती, परंतु गरिबांच्या संख्येच्या अंदाजामागे दोन विशिष्ट गृहिते होती, ती म्हणजे (1) राष्ट्रीय नमुना पाहणी (N.S.S.) मधील सर्व खर्च गटांची उत्पन्नातील वाढ समान आणि (2) दारिद्र्य रेषेच्या वर आलेल्या कुटुंबांची संख्या एकात्म ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP) यांच्याद्वारे त्यांच्यावर झालेल्या खर्चाच्या प्रमाणात असते.

यातील दुसरे गृहित या दोन महत्त्वाच्या दारिद्र्य विरोधी कार्यक्रमाच्या कार्यवाहीमधील जुन्या अनुभवांकडे कानाडोळा करते. या कार्यक्रमासाठी राखून ठेवलेल्या निधीमधील मोठा हिस्सा अनेक राज्यांमध्ये वापरलाच जात नाही, एवढेच नाही तर अत्यंत अल्प हिस्सा लक्षित गटांपर्यंत पोहोचतो. कारण विकास एजन्सीमध्ये काम करणारे लोक अशा निधीचा दुर्विनियोग करतात आणि जमीनदार, सधन शेतकरी, व्यापारी आणि ग्रामीण भागातील शक्तिशाली गट यासारखे अलक्षित गट तो हडप करतात. तसेच पहिल्या गृहिताला तर्कशास्त्रीय किंवा अनुभवनिष्ठेचा आधार नाही. एकूण उत्पन्नातील वाढीमुळे भूतकाळात कधीही विभिन्न आय / खर्च गटांना समान प्रमाणात लाभ झालेला नाही. ही गृहिते खरी राहिली तर 1990 पर्यंत दारिद्र्याचे उच्चाटन होईल असा युक्तिवाद नियोजनमंडळाच्या एक जुन्या सदस्याने केला आहे. भारतातील उत्पन्नवाटपाच्या क्षेत्रामध्ये संशोधन करण्यात अनेक वर्षे घालवलेली माझ्यासारखी व्यक्ती अधिक परखड विधान करू शकेल. चतुराईने दारिद्र्य अदृश्य करणारी ही चलाखी जर आधी वापरली असती तर दारिद्र्याचा प्रश्न केव्हाच सुटला असता !

काळानुसार गरीब लोकांच्या संख्येमध्ये निरपेक्ष स्वरूपात अर्थपूर्ण वाढ झाली आहे आणि दारिद्र्य निर्मूलन या उद्दिष्टाची सतत पुनर्वाच्यता करणाऱ्या सरकारला ही गोष्ट अडचणीची ठरते यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. त्यामुळे नवी व्याख्या केली नाही तरी दारिद्र्य अस्तित्वात नाही असा बहाणा करण्याचे प्रलोभन साहजिकच मोठे आहे. विकसित देशामध्येही व्यावसायिक हुशारीच्या मागे असणारे तांत्रिक निर्णय हे 'व्याख्या करणाऱ्यांची' केवळ मूल्ये आणि कल यांचेच नव्हे तर 'राजकीय वस्तुस्थिती' चेही दर्शन घडवितात. दारिद्र्याचा प्रश्न अर्थपूर्ण ठरविणारे अंदाज राजकीयदृष्ट्या स्वीकारार्ह नसतात. या संदर्भात अमेरिकेचा अनुभव बोलका आहे. मोठ्या प्रमाणात मान्यता मिळविलेल्या दारिद्र्याच्या नवीन व्याख्येनुसार जगातील सर्वात धनवान असणाऱ्या अमेरिकेतील एक पंचमांश लोकसंख्या दारिद्र्यामध्ये जीवन कंठित आहे असे 1964 साली अधिकृतरित्या मान्य करण्यात आले होते. या दारिद्र्याविरुद्ध महान समाजाच्या 'बिनशर्त युद्धाची घोषणा सरकारने केली. तरीही सामाजिक सुरक्षा प्रशासनाने (Social Security Administration) दारिद्र्यासंबंधी जे विविध अंदाज केले त्यातील कमी पातळीच्या अंदाजाची निवड समान संधीच्या कचेरीने

(दारिद्र्याविरुद्ध बिनशर्त युद्ध करण्यासाठी निर्माण केलेले खाते) केली.

भारतात उल्लेखनीय आर्थिक वाढही झालेली नाही, आणि दारिद्र्याचे निर्मूलनही झालेले नाही आणि त्यातच दुष्काळात तेरावा महिना म्हणून की काय अर्थव्यवस्था भाववाढीच्या सापळ्यात फसलेली आहे. गेल्या तीस वर्षांत येथे केवळ किमती सतत वाढत गेलेल्या नाहीत तर भाववाढीचा दरही वाढला आहे. पाचव्या दशकात तो 1.5 टक्के होता त्यात सहाव्या दशकात 6.1 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आणि सातव्या दशकात तो 9.7 टक्क्यांपर्यंत वाढला. भाववाढीच्या दोन अंकाच्या दरात आता नावीन्य उरलेले नाही. 1966–67 साली सहाव्या दशकातील भाववाढीचा उच्चांक 13.9 टक्क्यांचा होता. 1974–75 साली सातव्या दशकासाठी तो 25.2 टक्क्यांचा झाला. आठव्या दशकात 1980–81 साली 18.1 टक्के भाववाढ झाली. 1987–88 सालातील पहिल्या दहा महिन्यात 9.5 टक्क्यांनी भाववाढ झालेली आहे आणि त्यातील 41 टक्के भाववाढ आवश्यक वस्तूंच्या भाववाढीमुळे झाली आहे.

सातत्याने आणि वाढत्या दराने होणाऱ्या भाववाढीचे मूळ योजनेसाठी लागणाऱ्या पतपुरवठ्याचे मार्ग आणि स्वरूप यात आहे. मायकेल कॅलेस्की या पोलीश अर्थतज्ज्ञानी पाचव्या दशकाच्या मध्यात याची शक्यता सूचित केली होती. शासन-संस्थेच्या भांडवल गुंतवणीवर आधारित असा विकासमार्ग भाववाढ टाळून यशस्वी होण्यासाठी शेतीक्षेत्रातील उत्पादन पुरेशा वेगाने वाढले पाहिजे आणि मालमत्तेच्या उत्पन्नावर प्रत्यक्ष कर लादून आणि चैनीच्या वस्तूंवर अप्रत्यक्ष कर लादून होणाऱ्या पतपुरवठ्याच्या माध्यमातून गुंतवणूक झाली पाहिजे ही गोष्ट त्यांनी सूचित केली होती. भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्थेने मोठ्या प्रमाणावर विकासाची जबाबदारी उचलल्यास शासनसंस्थेच्या विशिष्ट वर्गीय स्वरूपामुळे भाव-वाढीचा दबाव निश्चित निर्माण होईल अशी ताकीद त्यांनी दिली होती.

स्वयंचलित विकासमार्गावर झेप घेण्यात आणि न्याय्य समाजाची निर्मिती करण्यात नियोजनाला आलेल्या अपयशा-मुळे सामाजिक तणाव वाढले आहेत. जर वाढता जातीय-वाद आणि प्रांतिकवाद स्वातंत्र्याच्या 40 वर्षानंतरही आपल्याला उचित वाटा मिळाला नाही यामुळे आलेली एक वैफल्याची भावना दर्शवीत असेल तर जमातवाद आणि अपरिवर्तनवादाला धार्मिक मूलतत्त्वाची (fundamentalism) सुरुवात या गोष्टी ऐहिकवादास बळकटी आणण्याची गरज हा आजही देशा-पुढील अत्यंत जटिल प्रश्न असल्याचे निदर्शनात आणतात. आज उद्भवलेल्या सामाजिक अराजकाने अल्पवर्धीन लोक-शाहीच्या विणीला धोका निर्माण केल्यामुळे 'कोठे चूक झाली" हा एकमेव महत्त्वाचा प्रश्न उत्तरासाठी कंठशोष करीत आहे. याच संदर्भात शहर-खेडेगाव यांच्यातील संबंध या प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. परंतु शेती आणि उद्योग यांच्यामधील संबंध या रूपामध्ये शहर-खेडेगाव यांच्यामधील संबंधाकडे लक्ष पुरविताना या दोहोंना दुभंगणाऱ्या अप्रस्तुत बाबींवर भर देण्यात आला आहे.

## शहर–खेडेगाव संबंध

शहर–खेडेगाव या दोहोंना दुभंगणाऱ्या अप्रस्तुत बाबीं-वरील भर किंवा पुष्कळ वेळा काढलेले विचित्र निष्कर्ष याचे मुख्य कारण वर्गीय शक्तीचे केलेले चुकीचे विश्लेषण होय. जेव्हा मायकेल लिप्टन गरिबांना गरीब ठेवण्यासाठी जगातील विकास धोरणामध्ये असणाऱ्या शहरी पक्षपाती-पणाला जबाबदार धरतात तेव्हा ते शहर किंवा ग्रामीण परिसर यांपैकी कोणताही विभाग एकजिनसी नाही याकडे दुर्लक्ष करून शहरी वर्ग आणि ग्रामीण वर्ग यांच्यामधील संबंधावर आपले लक्ष केंद्रित करतात.[31] त्याचप्रमाणे जेव्हा जॉर्जस्क्यू रोगन हे 'शेती क्षेत्राकडून स्वस्त भावात खाद्य-पदार्थ मिळविणे हा औद्योगिक समाजापुढील खरा प्रश्न आहे' असे मानतात आणि 'स्वस्त भाकरीची मागणी ही औद्योगिक कामगारांच्या भांडवलदार आणि भागीदाराविरुद्ध नव्हे तर शेतात राबणाऱ्या विरुद्ध केलेली ओरड आहे' अशा रीतीने त्याकडे पाहतात तेव्हा ते शेतकरी आणि कामगार व शहरी भांडवलदार यांच्या जुटीमधील संघर्ष हा खरा वर्ग संघर्ष असे मानतात.[32]

शहरात मक्तेदारी भांडवल आणि त्याचबरोबर ग्रामीण भागात भांडवलीपूर्व संबंध अस्तित्वात असलेल्या वर्तमान-कालीन भारतातील अंतर्विरोध अधिक गुंतागुंतीचे आहेत. ते समजून घेण्यासाठी श्रमशक्ती, क्रयवस्तू आणि चलन अशा तीनही बाजारपेठांमार्फत कार्यरत असणाऱ्या जमीनदार, भांड-वलदार व कामगार यांचा अंतर्भाव होणाऱ्या शहर आणि ग्रामीण परिसर यांच्यामधील अंतर्गत आणि परस्पर संबंधांचे विश्लेषण आवश्यक आहे.

शेतकी आणि औद्योगिक वाढ या स्पर्धात्मक नव्हे तर पूरक प्रक्रिया आहेत ही वस्तुस्थिती कोणीही नाकारलेली नाही. याचे कारण या दोन क्षेत्रामध्ये मागणी आणि पुरवठा या दोन्ही पातळ्यांवर परस्परावलंबन आहे हे होय. मूलभूत आणि अमूलभूत ही विभागणी शेती आणि उद्योग (यात जड उद्योगांचाही अंतर्भाव करून) या दुहेरीपणाला छेद देणारी आहे. आज भारतात शेतीक्षेत्र औद्योगिक क्षेत्राकडून करीत असलेल्या खरेदीचे आकारमान, काहीही असले तरी

शेती क्षेत्रातील उत्पादन आणि विशेषत: अन्नधान्याचे उत्पादन यांच्या वाढीसाठी औद्योगिक क्षेत्रामध्ये उत्पादन केलेल्या उत्पादक घटकांचा वापर आवश्यक आहे. शेती आणि उद्योग यांच्या उत्पादनप्रक्रियेमधील परस्परावलंबन लक्षात घेता विकासाच्या दृष्टीने त्यांच्यामध्ये सुस्पष्ट विभाजन करणे उचित ठरत नाही. अर्थात या दोन क्षेत्रांच्या सापेक्ष वजनापेक्षा व्यापारशर्तींच्या रूपाने व्यक्त होणाऱ्या किमतविषयक अंगाचा चर्चेमध्ये अधिक प्रभाव पडला आहे.

शेतकी आणि औद्योगिक उत्पादनाच्या सापेक्ष किमती म्हणजे व्यापारशर्ती, यांच्या संदर्भात भारतामध्ये ज्या दोन प्रश्नांवर दीर्घकाल चर्चा सुरू आहे ते म्हणजे : (1) व्यापार शर्तीमधील बदल शेतीक्षेत्राच्या बाजूने की विरोधी झाले ? आणि (2) व्यापारशर्तीमधील या बदलांमुळे शेतीक्षेत्राच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला का ? हे होत. शहर आणि ग्रामीण परिसर (या दोन क्षेत्रामधील अंतर्गत भेदाकडे दुर्लक्ष करून) या दोन क्षेत्रामध्ये होणारे उत्पन्नाचे वाटप किंवा एकूण वाढीच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा शेतीक्षेत्रामधील होणाऱ्या गुंतवणुकीचा वेग याविषयीची आस्था या चर्चेमध्ये अध्याहृत आहे.

व्यापारशर्तींचा प्रश्न हा एक चकवा आहे. व्यापारशर्तींची वापरलेली विशिष्ट संकल्पना आणि व्यापारशर्तींचा अंदाज घेण्यासाठी वापरलेली विशिष्ट पद्धत यांच्या संदर्भात असणाऱ्या मतभेदांमुळेच या क्षेत्रात न संपणारे वादंग उद्‌भवले आहेत. नक्त वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्ती ही सामान्यपणे वापरली जाणारी संकल्पना शेती आणि बिगर-शेती उत्पादनाच्या युनिट मूल्यांमधील सापेक्ष बदलाचे मापन करते तर संबंधित क्षेत्रांच्या खरेदी करण्याच्या क्षमतेची निर्देशक म्हणून आय व्यापारशर्तींची संकल्पना अधिक योग्य असते आणि म्हणून ती संबंधित क्षेत्रांच्या सुस्थितीचेही दर्शन घडविते. दोन्हींपैकी कोठल्याही प्रकारात, सर्वसाधारणपणे घडते तसे, चुकत्या केलेल्या किमतीमध्ये उत्पादक घटकांच्या किमती व उपभोग वस्तूंच्या किमती या दोन्ही समाविष्ट केल्या गेल्या तर व्यापारशर्ती हे एक विचित्र मिश्रण ठरते. कारण शेतकऱ्यांमध्ये उत्पादक आणि ग्राहक अशा रीतीने ते फरक करत नाही. प्रत्यक्ष वस्तुस्थितीकडे नजर टाकल्यास 1951–52 ते 1974–75 या कालखंडात शेतीक्षेत्राला मिळालेल्या किमतीमध्ये वार्षिक 5.94 टक्के वाढ तर शेतीक्षेत्राने चुकत्या केलेल्या किमतीमध्ये वार्षिक 4·95 टक्के वाढ झाली. यामुळे शेतीक्षेत्रासाठी नक्त वस्तुविनिमयाच्या व्यापारशर्तीत 1.43 टक्के दराने वार्षिक सुधारणा झाली. आय व्यापारशर्तीमध्ये तर जास्तच सुधारणा झाली आहे आणि त्याचा वार्षिक वाढीचा दर 4.53 होता.

अगदी अलिकडचा एक अभ्यासकही ह्या निष्कर्षांना पुष्टी देतो. 1952–53 ते 1980–81 हा कालखंड लेखक 1952–53 ते 1966–67 आणि 1967–68 ते 1980–81 अशा दोन उपकालखंडात विभागतो. पहिल्या उपकालखंडासाठी 1961–62 या वर्षाने संपणारी तीन वर्षे तर दुसऱ्या उपकालखंडासाठी 1971–72 या वर्षाने संपणारी तीन वर्षे पायाभूत धरून निर्देशांक तयार केले आहेत. व्यापारशर्तींसाठी वापरलेल्या या पद्धतीमुळे दुसऱ्या उपकालखंडात हरितक्रांतीच्या परिणामी उत्पादक घटकांच्या मिश्रणात झालेले बदल हे निर्देशांकाचा अंदाज घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्थिर वजनांमध्ये योग्यपणे प्रतिबिंबित झाले आहेत. पहिल्या उपकालखंडात शेतीक्षेत्राला मिळालेल्या किमती वर्षाला 5.57 टक्के दराने वाढल्या, तर शेतीक्षेत्राने चुकत्या केलेल्या किमतीत वार्षिक 3.98 टक्के दराने वाढ झाली. परिणामी शेतीक्षेत्रासाठी वस्तुविनिमय व्यापारशर्ती प्रतिवर्षी 1.53 टक्के दराने सुधारल्या. आय व्यापारशर्तीमध्ये अधिकच सुधारणा झाली. त्या वर्षाला 3.61 टक्के दराने वाढत गेल्या. दुसऱ्या उपकालखंडामध्ये शेतीक्षेत्राला मिळालेल्या किमतीमध्ये वार्षिक वाढ 6.81 दराने झाली तर चुकत्या केलेल्या किमती 8.53 टक्के दराने वाढल्या. यामुळे नक्त वस्तुविनिमय व्यापारशर्ती वर्षाला 1.55 टक्के दराने शेती क्षेत्राला प्रतिकूल झाल्या. तरीही शेतीक्षेत्राकडून विक्रित वाढाव्यामध्ये 5.41 टक्के दराने वाढ झाल्यामुळे आय व्यापारशर्ती वर्षाला 3.73 टक्के दराने शेतीक्षेत्राला अनुकूल झाल्या.

या परिणामांना नक्त राष्ट्रीय उत्पादनाचे चलनाच्या आणि वास्तव मूल्याच्या रूपातील अधिकृत मालिकेने पुष्टी दिलेली आहे. 1950–51 ते 1979–80 या कालखंडामध्ये गर्भित मूल्य संकोचकात प्रतिवर्षी दुय्यम आणि सेवा क्षेत्रांत अनुक्रमे 4.60 टक्के आणि 3.50 टक्के चक्रवाढ दराने वाढ झाली. तुलनेने प्राथमिक क्षेत्रातील वाढ 5.90 टक्के होती. चलनाच्या रूपातील क्रयशक्तीच्या संदर्भात चलनाच्या रूपातील नक्त राष्ट्रीय उत्पादनच महत्त्वाचे आहे. त्यामुळे संबंधित कालखंडात 'वास्तव नक्त राष्ट्रीय उत्पादनातील वाढीबरोबर झालेल्या भाववाढीचा प्राथमिक क्षेत्रानेच जास्त लाभ उठविला आहे' असे ही आकडेवारी सूचित करते. अर्थात प्रत्येक क्षेत्रातील क्रयवस्तू विक्रेत्यांचा या भाववाढीमुळे फायदा झाला आहे आणि प्राथमिक क्षेत्रातील विक्रेत्यांचा तो अधिक दराने झाला आहे. अशा रीतीने व्यापारशर्ती शेती क्षेत्राच्या विरोधी गेल्याचा जो आक्षेप पुन्हा पुन्हा उपस्थित केला जातो त्याला प्रत्यक्षात आधार नाही.

या गोष्टीचे आश्चर्य वाटायला नको. भाववाढीच्या काळात प्रशासित किमतींच्या पद्धतीमुळे औद्योगिक क्षेत्राच्या

मोठ्या विभागात औद्योगिक मालाच्या किमती रोखल्या जातात. त्याच्या उलट शेतीक्षेत्रामध्ये प्रशासित किमतींची पद्धत अलिकडच्या काळात किमती वाढविण्यासाठी वापरली गेली आहे. शेती उत्पादनाच्या किमती वाढविण्यासाठी अत्यंत जोरदारपणे आणि सातत्याने युक्तिवाद करणारी मंडळी किमतींना नेट लावण्यासाठी शासनसंस्थेकडून बजावल्या जाणाऱ्या निर्णायक भूमिकेची नोंद घेण्याचे सोयीस्करपणे टाळतात. जमिनीच्या अत्यंतिक विषम वाटपामुळे स्वातंत्र्य मिळाल्यापासून मोठे जमीनदार हे नेहमीच राज्यकर्त्या वर्गाचे भागीदार ठरले आहेत. उच्च आधारभाव, अर्थसहाय्यित उत्पादक घटक, विपुल पतपुरवठा आणि शेतीक्षेत्रावर नगण्य करभारकांच्या रूपाने शासनसंस्थेचा शेतीक्षेत्रामधील हस्तक्षेप या भागीदारीचा प्रभाव उघड करतो.

उत्तरेकडील गव्हाच्या पट्ट्यामध्ये तथाकथित हरितक्रांतीच्या पहिल्या अवस्थेच्या काळात, सहाव्या दशकाच्या उत्तरार्धापासून 'सधन शेतकऱ्यांना' झुकते माप देणारा कल बळकट होण्यास सुरुवात झाली. शेतीविषयक नव्या व्यूहरचनेत भारतीय शेतीमध्ये एक जलद परिवर्तन अभिप्रेत होते. 1951–52 ते 1972–73 या कालखंडात शेती उत्पादनात प्रतिवर्षी 2·5 टक्के चक्रवाढ दराने वाढ झाली असली तरी वस्तुविनिमय व्यापारशर्तींचा शेती उत्पादनावर संख्याशास्त्रीयदृष्ट्या लक्षणीय परिणाम नव्हता. या वाढीचे स्पष्टीकरण बहुतांशी किमतीनाही घटकांच्या वाटचालीमार्फत होते. शेतीक्षेत्रामधील गुंतवणुकीचा वेग आणि त्या क्षेत्राच्या वाढीचा दर यांच्यावर व्यापारशर्तींमधील फेरफारांचा लक्षणीय परिणाम होऊ शकतो असा निष्कर्ष काढणारा 1952–53 ते 1983–1984 या कालखंडाचा एक अभ्यास शेवटी तंत्रविज्ञानातील विकास शेतीक्षेत्राला प्रतिकूल होणाऱ्या व्यापारशर्तींचा परिणाम निष्प्रभ करू शकतो, अशा निष्कर्षाप्रत झाला आहे. अनेक विकसनशील देशांचा एक अभ्यासही अनुकूल किमतविषयक धोरणापेक्षा तंत्रज्ञानाच्या गतिमानतेच्या कार्याला पाठिंबा देणाराच आहे.

भारतात किमतविषयक धोरणाने काही पिके आणि काही प्रदेश यांच्या संदर्भात पक्षपात केला, याचे मलत: कारण जमिनीचे विषम वाटप आणि त्याबरोबर प्राप्त होणारे राजकीय सामर्थ्य हेच आहे तांदळाच्या तुलनेने गहू आणि तागाच्या तुलनेने कापूस या पिकाच्या प्रशासित किमती ठरविण्यामागे असणारा पक्षपाती दृष्टिकोन मोठ्या शेतकऱ्यांच्या प्रभावामधून उद्‌भवतो. ताग आणि मोठ्या प्रमाणात तांदूळ या पिकाच्या संदर्भात बहुसंख्य कृषक हे बहुतांशी छोटे शेतकरी वा कुळे आहेत. याउलट गव्हाचे अधिकांश पीक आणि त्याचा बहुतांशी विक्रेय वाटावा याची नोंद मोठ्या आकारमानाच्या शेतांच्या संदर्भात होते. कापूस उत्पादक सधन शेतकऱ्यांचे व्यापार आणि उद्योग यांच्याशी घनिष्ठ संबंध आहेत. केवळ उत्पादकांचे हितसंबंधच नव्हेत तर ग्राहकांचे हितसंबंध आणि अर्थव्यवस्थेच्या गरजा देखील विचारात घेतल्या पाहिजेत या हेतूने 1965 मध्ये स्थापन केलेल्या कृषिमूल्य आयोगाच्या शिफारशी राजकीय दबावामुळे डावलल्या जातात. किमान आधारभाव आणि शासकीय खरेदीच्या किमती यात वरचेवर वाढ करण्यात आली आहे आणि या दोहोंमधील तफावत व्यावहारिकदृष्ट्या नाहीशी झाली आहे. देशाचे विभाग पाडून वाहतुकीच्या निर्बंधात बदल केल्यामुळे शासकीय खरेदीच्या किमतींनी आधारभावांची भूमिका बजावण्याच्या कलाला बळकटी आणली आहे. परिणामी किमतीतील बदल 'जिन्या' प्रमाणे होतात. जेव्हा उत्पादनाची पातळी वाढत असते तेव्हा किमती स्थिर राहतात आणि पिकामध्ये तूट येताच त्या वाढतात. अशा रीतीने किमतींना परिणामकारकरित्या भुई उपलब्ध करून देणारे आणि सट्टघाला एकाच बाजूने अमिष दाखविणारे हे कृषिमालाच्या किमतीविषयक धोरण मोठ्या शेतकऱ्यांच्या गटाचे वाढते सामर्थ्य प्रतिबिंबित करते.

कृषिमालाच्या किमतीविषयक धोरणातील राजकीय पक्षपातीपणाचा परिणाम म्हणजे विविध पिकांमधील, प्रदेशांतर्गत आणि प्रादेशिक विषमता वाढीस लागली आहे. झिरपण्यामधून 'लाभाचे वाटप' या गृहित सिद्धांताची कल्पित कथा पुन्हा एकदा धुडकावून लावली गेली आहे. 1978 सालच्या एका अभ्यासानुसार सर्व राज्यामधील शेती प्रगतीचे प्रतिनिधित्व पंजाब व हरियाना ही राज्ये करत असली तरी तेथल्या ग्रामीण लोकसंख्येतील सर्वात गरीब 25 टक्के लोकांच्या वास्तव उपभोगाची पातळी कुंठित झालेली आहे. 1963-64 ते 1974-75 या कालखंडातील राष्ट्रीय ग्रामीण श्रमजीवींच्या पाहणीमध्ये ग्रामीण श्रमजीवींच्या वास्तव उत्पादनात परिणामकारक घट झाल्याचे दिसून येते. केरळमध्ये शेतमजुरांच्या मजुरीत वाढ झाली हा तेथील कम्युनिस्ट पक्षाच्या प्रभावामुळे शेतमजुरांच्या राजकियीकरणाचा परिणाम होय.

शहर आणि खेडेगाव यांच्यातील संबंधाच्या संदर्भात एक अत्यंत महत्त्वाचे अंग म्हणजे ग्रामीण भागाकडून शहरांकडे सुरू असणारे स्थलांतर होय. औद्योगिक केंद्राकडे होणारे हे स्थलांतर केवळ एकाच दिशेने झाले एवढेच नाही तर ते ग्रामीण भागातील रेटचामुळे झाले आहे. इंग्रजांच्या आगमनानंतर खेडी ओसाड पडण्यामधून लोकसंख्येचा शेतीवरील भार वाढला आणि वासाहतिक कालखंडापूर्वी जमीन आणि मनुष्यबळ यांच्यामधील अनुकूल गुणोत्तराच्या विरुद्ध स्थिती निर्माण झाली. रॉयल कमिशन ऑन लेबरने भारतामध्ये अनेक ठिकाणी अतिरिक्त औद्योगिक कामगार असल्याकडे आणि त्याचबरोबर

श्रमशक्तीची बाजारपेठ विक्रेत्याऐवजी ग्राहकाची होत असल्याकडे लक्ष वेधले होते. 1954–55 ते 1970–71 या कालखंडात शेतजमिनीची उपलब्धता दरडोई 1.28 एकरापासून दरडोई 0.96 एकर एवढी घटली होती. 1960 ते 1980 या कालखंडात शेतीक्षेत्राचा एकूण राष्ट्रीय उत्पादनातील वाटा 50 टक्क्यांवरून 37 टक्क्यांपर्यंत खाली घसरला तर तेथील मनुष्यबळामध्ये 73 टक्क्यांवरून 70 टक्क्यांपर्यंत एवढीच अल्प घट झाली 1964–65 ते 1974–75 या दहा वर्षांमध्ये ग्रामीण कुटुंबातील मजुरी करणाऱ्या लोकांच्या संख्येत 54 टक्के वाढ झाली, तरीही 1971 ते 1978 या काळात कार्यक्षम लोकांच्या संख्येत एकूण वाढ झालेल्या 3 कोटी 50 लक्ष लोकांपैकी केवळ 10 ते 11 टक्के लोकांना संघटित क्षेत्रात रोजगार उपलब्ध झाला. याचा अर्थ संघटित क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधीतील वाढ ही कार्यक्षम लोकांच्या संख्येतील वाढीच्या मागे पडत आहे. शहरी भागात स्थलांतर करणारे लोक मूलत: ग्रामीण भागातील उतरंडीच्या तळातील लोक असतात. हे स्थलांतरित लोक ग्रामीण भागातील गरिबांच्यामधून आलेले असतात एवढेच नाही तर रोजगार मिळवताना ते ग्रामीण भागातील उतरंडीची शहरी विभागात पुनश्चनिर्मिती करतात.[33]

शहरी कामगारांच्या स्थितीत काय फरक झाला आहे? काही लोकांच्या मते संघटित क्षेत्रातील मक्तेदारी भांडवलाशी किमती ठरविण्यासाठी हातमिळवणी करून संघटित क्षेत्रातील कामगारवर्ग किमती स्वीकाराव्या लागणाऱ्या असंघटित क्षेत्रातील कामगारांची पिळवणूक करतो. कामगारवर्ग आणि भांडवलदार या दोन गटात तणावग्रस्त संबंधाचे अस्तित्व असतानाही औद्योगिक कामगार आणि शहरी भांडवलदार यांच्या हातमिळवणीचा जॉर्जेस्क्यू रोगन यांच्या निष्कर्षाशी हा विचार मिळताजुळता आहे. कामगारवर्गाच्या संघटना निर्माण झाल्यामुळे भांडवलदार व कामगार यांच्यातील 'विषम विनिमय' संपुष्टात येत नाही. श्रमशक्तीच्या बाजारपेठेत पैशाच्या रूपातील वेतनासाठी लढा देण्याची कामगारवर्गाची शक्ती ही क्रयवस्तूंच्या बाजारपेठेत चालत नाही. त्यामुळे पदरात पडणारे वास्तव वेतन त्यांना शेवटी अनुजात कोटी म्हणून स्वीकारावे लागते. उत्पादन व्यवहाराच्या संदर्भात निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग नसल्यामुळे कामगारांना वाढाव्यातील वाटा मिळू शकतो परंतु ते वाढावा काढून घेणाऱ्या वर्गाचा भाग कधीही ठरू शकत नाहीत.

भेदभाव करण्यासाठी उघड आधार नाही अशा ठिकाणीसुद्धा समान कामासाठी समान वेतन या तत्त्वाची पायमल्ली होते हे खरेच आहे. जर औषध कंपन्यातील साध्या शिपायाचे वेतन सरकारी कचेरीतील शिपायापेक्षाच नव्हे तर इंजिनियरिंग कंपनीतील शिपायापेक्षाही जास्त असले तर ती गोष्ट वाटपातील अराजक (उत्पादनातील अराजकाला अनुरूप असणारे) प्रतिबिंबित करते. शिवाय 'बड्या वेतनाची बेटे' ही 'बड्या व्यवस्थापकीय मोबदल्याचीही बेटे' आणि भरमसाट नफे मिळवणारी क्षेत्रे आहेत आणि त्यात मुख्यत्वे बहुराष्ट्रीय कंपन्या कार्यरत आहेत.

औद्योगिक कामगारांना नियोजित आर्थिक विकासामुळे मिळालेले फायदे हे वास्तव वेतन निर्देशांकाच्या स्वतंत्र स्वरूपात किंवा दरडोई वास्तव उत्पन्न किंवा उत्पादकता यांच्याशी त्याचा मेळ घालून मापन करण्याची पद्धत रूढ आहे. परंतु कामगारांच्या जीवनमानातील सुधारणेचे मापन करण्यासाठी दरडोई वास्तव वेतनाच्या निर्देशांकावर विसंबणे हे मुळातच चुकीचे आहे. कारण असा निर्देशांक वेतनाच्या पातळीबद्दल काहीच स्पष्ट करत नाही. ज्या 'उचित वेतन' किंवा 'जीवन वेतन' यांच्या संदर्भात 1948 च्या उचित वेतन समितीने दूरगामी वेतनविषयक धोरण ठरविण्याचा प्रयत्न केला ते तर सोडूनच द्या पण साधे 'किमान वेतन' मिळते की नाही हे देखील असा निर्देशांक दाखवीत नाही. शिवाय सरासरी वास्तव वेतन इतर सर्व सरासरीप्रमाणेच उघड करते त्यांच्यापेक्षा जास्त गोष्टी छपविते. वेगवेगळ्या वेतन पातळ्यांवर वेगवेगळे बदल होऊनही सरासरी वेतनात वाढ होऊ शकते.

मजुरी वाटप कायद्यान्वये गोळा करण्यात आलेली आकडेवारी लघुवेतन असणाऱ्या कामगार श्रेणीच्या संबंधी असते हे खरे आहे. जरी या श्रेणीत सतत घट होत असली तरी 1951 ते 1964 या कालखंडात एकूण कामगारांतील 50 टक्क्यापेक्षा अधिक कामगारांचे वेतन महिन्याला 200 रुपयांपेक्षा कमी होते तर 1976 ते 1980 या काळात 60 टक्क्यांपेक्षा अधिक कामगारांचे वेतन महिन्याला 1000 रुपयांपेक्षा कमी होते. 1975 साली 32.5 टक्के कामगारांचे वेतन महिन्याला 400 रुपयांपेक्षा कमी होते तर 1984 साली 45·3 टक्के कामगारांचे वेतन महिन्याला 100 रुपयांपेक्षा कमी होते (लघुवेतन असणाऱ्या कामगारांची व्याख्या 1951 ते 1964 या काळासाठी महिन्याला 200 रुपयांपेक्षा कमी वेतन असलेले, 1964 ते 1975 या काळासाठी महिन्याला 400 रुपयांपेक्षा कमी वेतन असलेले व 1976 पासून महिन्याला 1000 रुपयांपेक्षा कमी वेतन असलेले अशी केलेली आहे). पंधराव्या भारतीय कामगार अधिवेशनाने 1957 साली 'गरजेवर आधारित' किमान वेतनासंबंधी शिफारस करूनही किमान वेतनपातळीबाबत अजून एकमत नाही. जर आपण आधीच्या प्रथेनुसार दुसऱ्या महायुद्धापूर्वीची दरमहा 30 रुपयांची किमान पातळी स्वीकारली आणि ग्राहकमूल्य निर्देशांकातील वाढी

नुसार त्यात बदल केला तर अत्यंत कमी कामगारांना त्यापेक्षा जास्त वा त्या एवढे वेतन मिळत असल्याचे दिसते. जर आपण लघुवेतन असणाऱ्या कामगारांच्या वास्तव उत्पन्नाची सर्व कामगारांच्या वेतनाशी तुलना केली तर 1959–80 या कालखंडात लघुवेतन कामगार हे चलनी आणि वास्तव उत्पन्नाच्या संदर्भात सर्व कामगारांच्या मागे पडले आहेत आणि त्यांच्याबाबतीत भाववाढीचा परिणाम अधिकच झाल्याचे आपल्याला आढळते.

अर्थात याचा अर्थ ज्यांनी सापेक्षतः अधिक लाभ मिळवले आहेत असे 'लघुवेतन कामगार सोडून इतर कामगार' हे खंडणी उकळण्यासाठी अर्थव्यवस्था ताब्यात घेणाऱ्या उच्चभ्रू औद्योगिक कामगारांचा एक वर्ग बनले आहेत असे नाही. त्यांनी विकासाचे फायदे गिळंकृत केले आहेत, व्यवस्थापनाशी दोन हात करताना उत्पादनात घट आणली आहे आणि वाढाव्यातील त्यांचा वाटा वाढवून घेतल्यामुळे असंघटित कामगारांच्या तथाकथित पिळवणुकीला हातभार लावला आहे अशा स्वरुपाचा युक्तिवाद काहीवेळा केला जातो. बेरोजगारी व अपूर्ण रोजगारी यांच्यामुळे होते त्याचप्रमाणे कामगार तंट्यापायी जे कामाचे दिवस वाया जातात त्यामुळे **संभाव्य** उत्पादनात आणि परिणामी **संभाव्य** वाढाव्यात घट होते हे नाकारता येणार नाही. तरीही आधीची घट जशी विशिष्ट वय आणि इतर शारीरिक निकष पूर्ण करणाऱ्या व्यक्तींची सक्तीने कामासाठी भरती करणारे समाज वगळता इतरत्र टाळता येत नाहीत त्याचप्रमाणे नंतरची घटही **मालमत्तेचा हक्क** मान्य करणाऱ्या परंतु **जीवन वेतनावर काम मिळण्याच्या हक्काची** खात्री न देणाऱ्या समाजात टाळता येणार नाही.

स्वातंत्र्यपूर्व कालाप्रमाणेच गेल्या तीस वर्षातील कामगार-वर्गाचे लढे हे देखील संरक्षक स्वरुपाचेच आहेत. 1930 आणि 1971 या दोन्ही वर्षांमध्ये सुमारे 50 टक्के कामगारतंटे हे मजुरी आणि त्या संबंधातील इतर समस्या यांच्याविषयी होते, आणि 1975 साली देखील अशा तंट्यांचे प्रमाण 44 टक्के होते. खाद्य पदार्थांसाठी ग्राहक मूल्य निर्देशांकातील बदल आणि संप लढ्यांच्या निरनिराळ्या निर्देशांकांची मालिका यांच्यामध्ये जवळचे नाते आढळते. भारतामधील कामगार-विषयक देखाव्याचा गुणविशेष संघटित कामगारांकडून जास्त वेतनासाठी कांदाफोडी खेळाप्रमाणे सतत वेतनाची पातळी वाढवण्यासाठी मागण्या होणे हा नाही, तर जॉन हिक्स यांनी ब्रिटिश कामगारांच्या संदर्भात वापरलेल्या संज्ञेप्रमाणे 'वास्तव वेतनाचे संरक्षण' हाच आहे.

औद्योगिक क्षेत्रातील उत्पन्नातील वेतनाचा वाटा पाचव्या दशकाच्या सुरुवातीला असणाऱ्या 50 टक्क्यांवरून हळूहळू खाली घसरला आहे. 1980–81 मध्ये तो 33 टक्क्यांपेक्षा थोडा जास्त होता. कामगारांच्या वाट्यातील ही घट या क्षेत्राच्या उत्पन्नाचे वाटप कामगार **विरोधी** झाल्याचे सूचित करते आणि त्यामुळे संघटित कामगारांनी आपला स्वतःचा वाटा वाढवून घेऊन संचयासाठी उपलब्ध असणाऱ्या 'वाढाव्या'मध्ये तूट निर्माण केली आहे या समजाला वस्तुस्थितीचा आधार नाही हे उघड करते.

वेतनाच्या वाट्यामधील घट ही बऱ्याच प्रमाणात औद्योगिक उत्पादनातील संरचनात्मक बदलांमुळे घडून आली आहे. असे संरचनात्मक बदल म्हणजे केवळ शेतीक्षेत्राकडून औद्योगिक क्षेत्राकडे आणि पारंपरिक लघु उद्योगांकडून कारखानदारांकडे वाटचाल हेच नव्हे. कारखानदारी क्षेत्रातही मूलभूत उद्योग आणि यंत्रसामुग्री बनविणारे उद्योग यांच्यामध्ये एकूण उपभोग्य वस्तू बनविणाऱ्या उद्योगांपेक्षा जलद वाढ झाली. तसेच उपभोग्य वस्तू बनविणाऱ्या उद्योगात ग्राहकांना बराच काळ वापरता न येणाऱ्या वस्तुपेक्षा ग्राहकांना बराच काळ वापरता येणाऱ्या वस्तूंच्या–ज्यांची गणना अमूलभूत किंवा चैनीच्या वस्तूंमध्ये होते–उत्पादनात वेगाने वाढ झाली. जर मूलभूत आणि यंत्रसामुग्री बनविणाऱ्या उद्योगातील वाढ हे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या जड उद्योग प्रतिमानाची निवड प्रतिबिंबित करीत असेल, तर दुसरा बदल जेथे 'चैनीच्या वस्तूंचे' उत्पादन हे तांत्रिक प्रगतीचा अटल सहचर असते आणि जी निकड संचयाला चालना देते तीच अधिक उपभोगालाही चालना देते ही उत्तर भांडवलशाहीची संस्कृती प्रतिबिंबित करते.

मार्क्स यांनी दर्शविल्याप्रमाणे केवळ 'बडे आणि दृढपणे प्रस्थापित झालेल्या भांडवलदारांनाच' पुनर्रचना प्रक्रियेमध्ये सहभाग घेता येतो. हे खरे आहे. भारतात ज्या विशिष्ट ऐतिहासिक टप्प्यावर औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली त्याचा परिणाम 'प्राथमिक भांडवल संचय' पूर्ण होण्यापूर्वीच भारतीय औद्योगिक रंगमंचावर मुठभर उद्योगांचे वर्चस्व प्रस्थापित होण्यात झाला. किमतीच्या स्पर्धेतून बाजार-पेठेतील आपला वाटा वाढवण्याच्या भांडवलाच्या पुनर्रचनेच्या मार्गात जरी अडचणी असल्या तरी त्यासाठी दुसरे पर्याय उपलब्ध आहेत. आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमाबरोबरच उद्योग-धंद्यासाठी नवी क्षेत्रे शोधणे, अस्तित्वात असणाऱ्या कारखान्यांमध्ये वाढ आणि विविधीकरण करणे इत्यादी मार्गांनी सतत विस्तारित वाढ शक्य होते. झालेल्या संरचनात्मक बदलांनी औद्योगिक क्षेत्रातील रोजगार वाढीची संभाव्यता कमी केली आहे. त्यामुळे मोठ्या कंपन्या ह्या केवळ बडे वेतन आणि बडे व्यवस्थापकीय पगार यांची बेटे नसतात तर उच्च उत्पादकता, उच्च नफे आणि अल्प रोजगाराचीही बेटे असतात हे उघड होते.

संघटित उद्योगातील मंद गतीने होणाऱ्या रोजगारीतील वाढीमुळे ग्रामीण भागातील विपन्नावस्थेचा परिणाम म्हणून शहरांकडे स्थलांतर करणाऱ्या ग्रामीण गरिबांना अनौपचारिक उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधायला लागतात. 1965 पासून देशातील सुमारे 50 टक्के औद्योगिक कामगारांनी रोजगार पुरविणाऱ्या लघुउद्योगामध्ये लक्षणीय वाढ झाली. हे लघु-उद्योग बड्या उद्योगांना दुय्यम भागांचा वाढता हिस्सा पुरवीत आहेत. बड्या उद्योगांच्या दृष्टीने दुय्यमीकरण हे भांडवलाच्या पुनर्रचनेचा एक प्रकार आहे. कारण असे दुय्यम लघुउद्योग त्यांच्या वेतन खर्चात कपात करतात आणि त्यांचा नफा वाढवितात. कामगारांच्या दृष्टीने ही प्रक्रिया कमी वेतन आणि असमाधानकारक कार्यस्थितीस कारणीभूत होते. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे बड्या उद्योगांकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने नियमन केला जाणारा विखुरलेला कामगार-वर्ग निर्माण होतो.

छोटे भांडवल आणि कामगार यांच्या विरोधात बड्या भांडवलाची ताकद वाढण्याचे पर्यवसान बड्या उद्योगाचे नफे वाढण्यात झाले आहे. त्यांच्या आकारमानामुळे त्यांना मिळणाऱ्या लाभांबरोबरच त्यांच्या आर्थिक व्यवहारांना सातत्य आणि सामर्थ्य प्राप्त करून देण्याचे काम, मत्ता निर्मिती-साठी सवलती, मुदतीसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका यांच्याकडून सहज कर्ज मिळणे या सारख्या सरकारी धोरणांमुळे होते.

**निष्कर्ष म्हणून**

मार्क्सवादी चिरकालीन संकल्पनांशी सुसंगत असणारी आणि त्याच वेळी त्यामध्ये भारतीय परिस्थितीमधील वैशिष्ट्ये आणि वर्तमान ऐतिहासिक घडीची महत्त्वाची अंगे यांचा अंतर्भाव केलेली संरचना भारताचा विकासाचा अनुभव समजून घेण्यास उपयुक्त ठरते. अवरुद्ध आणि अडखळत होणाऱ्या विकासाची समस्या आणि त्याचबरोबर विदीर्ण होणाऱ्या शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेवर उभारलेले अपूर्ण औद्योगिकीकरण या गोष्टी भारताच्या वसाहतवादाचा वारसा आहेत. ज्या विशिष्ट ऐतिहासिक टप्प्यावर भारताने औद्योगिकीकरणाला सुरुवात केली त्याचा एक परिणाम म्हणजे प्राथमिक भांडवल संचय पूर्ण होण्यापूर्वीच औद्योगिकीकरणाच्या अगदी सुरुवातीच्या अवस्थेत बाजारपेठेच्या संरचनेमध्ये झालेले केंद्रीकरण होय. त्यामुळे सुरुवातीचे अंतर्विरोधच खडतर होते.

'लोकशाहीधिष्ठित नियोजित समूहवादा'च्या निवडीने सुरुवातीचे अंतर्विरोध अधिकच विकोपाला गेले. एकाच वेळी वेगवेगळ्या रूपातील मालमत्तेचे अस्तित्व, उत्पादन साधनां-वरील शासनसंस्थेच्या मालकीचा त्यातील अंतर्भाव, त्यामुळे विकसित भांडवलदारी व्यवस्थेपेक्षा अधिक गुंतागुंतीचे अंतर्विरोध निर्माण झाले आहेत. जमिनीच्या मालकीचे स्वरूप भांडवलदारी उत्पादनाने पूर्णपणे बदलले नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रत्यक्ष उत्पादकाचे मजुरांमध्ये रूपांतर झालेले नाही आणि खंड हा स्वयंसिद्ध वाढावा आहे. व्यापारी आणि सावकार यांच्या प्रभावाने ग्रामीण भागातील उत्पादक शक्तींच्या वाढीला अटकाव झाला आहे आणि तेथील दारिद्र्य कायम राखले गेले आहे. सधन शेतकऱ्यांना लाभदायक ठरणाऱ्या 'किमती' विषयक धोरणाद्वारे शेतीक्षेत्रात भांड-वलशाहीचा विकास करण्याचा सरकारचा प्रयत्न यशस्वी झालेला नाही. तथाकथित हरितक्रांतीनंतरच्या 15 वर्षांत 1965–66 पूर्वीच्या 15 वर्षांच्या तुलनेने शेती उत्पादनाच्या वाढीचा वेग मंदावला आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण कमी करण्याचे घोषित उद्दिष्ट साध्य झाले नाही एवढेच नाही तर प्रत्यक्षात केंद्रीकरण वाढले आहे, आणि विविधीकरणाने केवळ खाजगी साम्राज्याच्या निर्मितीलाच नव्हे तर 'चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनाला हातभार लावला आहे. या शतकातील एका आत्यंतिक दुष्काळाच्या वर्षात आता इतिहासजमा झालेल्या जुन्या संस्थानामधील संपत्ती आणि भपकेबाज उपभोगाचे घृणास्पद प्रदर्शन हे एकाच वेळी 'सरंजामी' उत्पादन व्यवस्थेचा भग्न अवशेष आणि प्रगत भांडवलशाहीमधील भोगवाद प्रतिबिंबित करते.

शेतकऱ्यांना निर्धनावस्थेला लावण्याच्या मार्गाने होणारे त्यांचे व्यवच्छेदन वाढाव्यामध्ये वाढ होणे किंवा उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होणे यापैकी कोणत्याही क्रियेसाठी उपयोगी पडत नाही. वाढीव पुनरुत्पादनाच्या सातत्याची खात्री देण्यासाठी शेतकऱ्यांच्या सधन थरांच्या उपभोगामधून पुरवली जाणारी चैनीच्या वस्तूंची व उत्पादन साधनांची मागणी ही शेती आणि उद्योग यांच्यामधील कमकुवत दुवे ठरतात याचा अर्थ स्पष्ट आहे. शेती क्षेत्राने पुरेसा वाढाव्याची निर्मिती करणे आणि उद्योगाने वाढीव पुनरुत्पा-दनाचे सातत्य राखण्यासाठी त्याचा योग्य दिशेला ओघ वळविणे या मार्गातले अडथळे मूलतः संस्थात्मक आहेत, आणि 'लोकशाहीधिष्ठीत नियोजित समूहवादा'ने त्यांना बळकटीच आणली आहे. आज अस्तित्वात असणारे उत्पादन संबंध यात शासनसंस्थेच्या हस्तक्षेपामुळे बदललेल्या विनिमय संबंधाचाही अंतर्भाव होतो उत्पादक शक्तींच्या वाढीच्या मार्गातील अडथळे ठरत आहेत. या संदर्भात 19 व्या आणि 20 व्या शतकातील फरक नजरेआड करता येणार नाही. आजच्या विकसित भांडवलदारी देशात शहरांची स्फोटक वाढ झाली होती हे खरे आहे. परंतु त्यांना ग्रामीण भागातील स्थलांतरितांना सामावून घेता आले कारण त्या देशात आर्थिक वाढ जलद

गतीने होत होती. उत्पादक रोजगारातील वाढीच्या अभावी आज ग्रामीण स्थलांतरितांना सामावून घेणे कठीण होत आहे. 'औद्योगिकीकरणावाचूनचे शहरीकरण' स्थलांतरितांना आज कामाचा अभाव असलेल्या कामगारांच्या उपखंडात ढकलीत आहे.

जरी उत्पादनसंबंध हे उत्पादक शक्तींच्या विकासाला खीळ घालीत असले तरी शक्तिशाली क्रांतिकारक वर्गाच्या अभावी दोहोंमधील अंतर्विरोध मिटण्याची आशा उज्ज्वल नाही. 'उपकामगारांचा' लोंढा हा एकीकडे शेतमजूर आणि सीमांत शेतकरी आणि दुसरीकडे औद्योगिक कामगार यांच्यापेक्षा पूर्णपणे वेगळा नाही पण स्वतःविषयी जाणीव असणारा व संघटित असा सामाजिक वर्गही नाही. अवरुद्ध विकासाचे बळी हे जरी स्वतःच्या जीवितासाठी उत्पन्न मिळण्याच्या कामात गुंतलेले असले तरी ज्या वाचून वर्गीय जाणिवांचा विकास होऊ शकत नाही अशा उत्पादन प्रक्रियेमध्ये औपचारिकरित्या सामावलेले नाहीत. शारीरिक श्रम करणाऱ्या कामगारांमधील श्रमविभाजन आणि त्यांची वर्गीय स्थिती यावर आधुनिक उद्योगाचा परिणाम याचे मार्क्स यांनी 'कॅपिटल' या ग्रंथामध्ये केलेल्या विवेचनाची आठवण करणे आवश्यक आहे. मार्क्स यांच्या क्रांतिकारक कामगारांच्या सिद्धांतामध्ये औद्योगिक तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावते ही गोष्ट हे विश्लेषण स्पष्टपणे उघड करते. नुसते भांडवलदारी उत्पादन संबंध नव्हे तर 'त्याच्या माध्यमातून वस्तीभवन झालेले तांत्रिक संबंधांचे परिणाम' निर्णायक असतात.[35] समकालीन भारतीय वास्तव-स्थितीच्या संदर्भात हे अंग विचारात न घेणे चुकीचे होईल. कारण सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने उत्पादक शक्तींची वाढ किंवा वाढीचा अभाव म्हणजे विकास प्रक्रियेची केवळ एक बाजू असते.

**संदर्भ :**


1. P. M. Sweezy, 'On the Theory of Monopoly Capitalism' in *Modern Capitalism and Other Essays,* Monthly Review Press, New York, 1972, pp. 25–52.
2. M. Mandelbaum, *The Problem of Historical Knowledge*, Liverright, New York, 1938, pp. 88–89.
3. D. McQuarie, 'A Further Comment on Karl Popper and Marxian Laws', "Science and Society", 41, Winter, 1977–78, pp. 477–84
4. F. Claudin, *The Communist Movement : From Comintern to Cominform*, Penguin, 1975.
5. K. Marx, *Grundrisse,* Penguin, 1973, pp. 471–79.
6. K. Korsch, *Three Essays on Marxism,* Monthly Review Press, New York, 1971, pp. 35-6.
7. L. S. Feuer (ed.), *Karl Marx and Friedrich Engels : Basic Writings on Politics and Philosophy,* Doubleday, Garden City, 1959, pp. 440–41.
8. G. Lichtheim, 'On the Interpretation of Marx's Thought' in N. Lobkowicz (ed.), *Marx and the Western World,* University of Notre Dame Press, Notre Dame, 1967, pp. 3–17.
9. K. Marx, 'Letter to P. V. Annenkov', December 28, 1946, K. Marx and F. Engels, *Selected* Works, Vol. One, Progress Publishers, Moscow (1969), 1977, p. 524, emphasis in the original.
10. K. Marx, 'Letter to J. B. Schweitzer', January 24, 1865, K. Marx and F. Engels, *Selected Correspondence,* Vol. Two, Progress Publishers, Moscow, (1969), 1973, p 26; emphasis in the original.
11. G. A. Cohen, *Karl Marx's Theory of History — A Defence,* Oxford Uni. Press, (1978), 1979, pp. 134-74.
12. E. J. Hobsbawm, 'Karl Marx's Contribution to Historiography' in R. Blackburn (ed.), *Ideology in Social Science,* Fontana / Collins, 1972, pp. 265–83.
13. Cohen, *Op. cit.*
14. M. Rader, *Marx's Interpretation of History,* Oxford University Press, New York, 1979' Chapters 2 and 3.
15. P. Anderson, *Arguments within English Marxism,* NLB and Verso, London, 1980, pp. 59–99,
16. K. Marx, *Capital,* Vol. One, Progress Publishers, Moscow, p. 582.
17. V. I. Lenin, 'Imperialism : The Highest Stage of Capitalism', *Collected Works,* Vol. 22, Progress Publishers, Moscow, 1964, pp. 191-193.
18. *Capital,* Vol. One, *Op. cit.* p. 19.
19. J. Degras (ed.), *The Communist International* 1919–48, *Documents, Vol. 2,* 1928–38, Oxford Uni. Press, 1960, pp. 526–48.

20. N. Bukharin, *Imperialism and World Economy*, Monthly Review Press, 1972, p. 21.

21. K. R. Ranadive, 'Relevence of Recent Developments in Monetary Theory for Developing Economics -A Sceptical Note', Reserve Bank of India, *Recent Developments in Monetary Theory and Policy*, Bombay, 1978, pp. 23–9.

22. K. Marx, *Capital*, Vol. Three, Progress Publishers, Moscow, pp. 315–17.

23. Capital, Vol. One. *Op. cit.*, pp. 556–57.

24. (I) E. P. Thompson, (i) The Moral Economy of the English Crowd in the Eighteenth Century', "Past and Present". 50, Feb. 1971, pp. 76–136, (ii) Patrician Society, Plebian Culture', "Journal of Social History". 7, 1974, (II) E. F. Genovese, 'The Many Faces of Moral Economy — A Contribution to a Debate', "Past and Present", 58, Feb. 1973, pp. 161–68.

25. J. Walters and K. Wrightson, 'Dearth and Social Order in Early Modern England', "Past and Present", 71, May 1976, pp. 22–42.

26. B. Ward, 'Foreward' in M. Haq, *The Poverty Curtain* (1976), 1978 Oxford Uni. Press, New Delhi, pp. 57–68.

27. R. Miliband, 'State Power and Class Interests', "New Left Review.", 186, March–April, 1983, pp 57–68.

28. B. Jessop, 'Recent Theories of the Capitalist State', "Cambridge Journal of Economics," 1, Dec. 1977, pp. 361–71.

29. This section is largely based on Dr. S. D. Punekar Memorial which I delivered in 1982 and which has subsequently been published under the title *Accumulation, Employment and Labour Aristocracy*, Tata Institute of Social Sciences, Bombay, 1982 and on R. R. Kale Memorial Lecture which I delivered in 1987 and which has subsequently been published under the title *Town and Country in Economy in Transition*, Gokhale Institute of Politics and Economics, Pune, 1987. For references, refer to the two publications.

30. For an overview of the debate and the references to the contributions to it see S. Zubrigy, 'Ideology and the Poverty line Debate, " Economic and Political Weekly, " 18, Dec. 3, 1983, pp. 2083-2084.

31. M. Lipton, *Why Poor People Stay Poor : Urban Bias in World Development*, Temple Smith, London, 1977.

32. N. Georgescu-Roegen, 'Economic Theory and Agraria Economies, ' "Oxford Economic Papers," 12, Feb. 1960, pp. 1-40.

33. L. K. Deshpande, *The Bombay Labour Market*, Department of Economics, University of Bombay, ( mimeographed ), Bombay, 1979, pp. 106, 114–16, 127–28, 131–32.

34. P. M. Sweezy, 'Marx and the Proletariat' in *Modern Capitalism and Other Essays op. cit.* pp. 147–65.

# आंतरराष्ट्रीय नाणे निधी : स्वरूप व कार्य

म. ग. बापट *

1930 च्या महामंदीचा फटका जसा औद्योगिक राष्ट्रांना बसला तसा प्राथमिक-वस्तू-उत्पादक-राष्ट्रांनाही बसला. उत्पादन घटले आणि व्यापार कमी झाला. 1929–1932 च्या काळात प्राथमिक वस्तूंची डॉलरमधील किंमत 50 टक्क्यांनी घसरली. अमेरिकेचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNP) 1929–33 या काळात एक तृतीयांशाने कमी झाले.

महामंदीने आंतरराष्ट्रीय पैसाविषयक व्यवस्थेत (international monetary system) खूपच उलथापालथी घडवून आणल्या. अनेक प्राथमिक-वस्तू-उत्पादक-देशांनी निर्यातीतील होणाऱ्या उत्पन्नातील घट थोपविण्यासाठी आपल्या चलनांचे अवमूल्यन केले. यातून अपेक्षित फायदा होण्याऐवजी चलनांच्या अवमूल्यनांची लाटच उसळली. स्पर्धापूर्ण अवमूल्यनाची जणू साथ पसरली.

त्यातच सुवर्णमानाचा प्रथम ब्रिटनने आणि नंतर इतर देशांनी त्याग केला. देशाच्या अर्थव्यवस्थेचे संरक्षण, अंतर्गत रोजगारवाढ इत्यादीसाठी अनेक देशांनी बहुपक्षीय व्यापाराला (multilateral trade) मूठमाती देऊन द्विपक्षीय व्यापार-पद्धती (bilateral trade system) स्वीकारली. मुक्त विदेशी विनिमय बाजार बंद करून अनेक देशात मध्यवर्ती बँकांनी चलनाचा विनिमय-दर शासकीय धोरणानुसार ठरविण्याची पद्धती रूढ झाली. त्यातूनच मग विनिमय-नियंत्रण (exchange control) पद्धती अस्तित्वात आली.

थोडक्यात म्हणजे दोन महायुद्धांच्या काळात (1919–1939) आंतरराष्ट्रीय पैसाविषयक व्यवस्थेत संपूर्णपणे अनागोंदी निर्माण झाली. सुवर्णमान संपुष्टात आले. चलनांचा विनिमय-दर अबाजार (non-market) पद्धतीने ठरविला जाऊ लागला विदेशी चलनाच्या मागणी-पुरवठ्यावर नियंत्रणे आली. द्विपक्षीय व्यापार नीतीचा प्रसार वाढला.

* प्राध्यापक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे–411 004.

अंतर्गत उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी संरक्षक जकाती (protective tariffs) बसविण्यात आल्या. या परिस्थितीत जर्मनीत हिटलरने आणि अमेरिकेत रूझवेल्टने महामंदीला तोंड देण्यासाठी नवी आर्थिक धोरणे अमलात आणली. हिटलरची आर्थिक नीती उघडउघड युद्धाच्या तयारीची नीती होती. त्यातून युद्ध अटळ झाले आणि 1939 साली युद्धाला तोंड फुटले 1945 साली या युद्धाची समाप्ती झाली.

युद्ध चालू असताना 1943 च्या सुमारास दोस्त राष्ट्रांनी युद्धोत्तर काळात जागतिक अर्थव्यवस्था-विशेषत: पैसाविषयक व्यवस्था कशी असावी यासंबंधी विचार करण्यास सुरुवात केली. इंग्लंडतर्फे जॉन मेनर्ड केन्स यांनी 'आंतरराष्ट्रीय समाशोधन संघ' (International clearing union) ही योजना मांडली. त्यालाच 'केन्स योजना' किंवा Keynes plan असे म्हणतात, तर अमेरिकेतर्फे हॅरी डेक्स्टर व्हाईट यांनी 'आंतरराष्ट्रीय स्थिरीकरण निधी' (international stabilisation fund) ही योजना मांडली त्यालाच व्हाईट योजना किंवा white plan असे म्हणतात. कॅनडा व फ्रान्सतर्फेही योजना सुचविण्यात आल्या होत्या. अखेरीस केन्स योजना व व्हाईट योजना यांच्या आधारे तडजोडीच्या स्वरूपातील आंतरराष्ट्रीय नाणे निधीची (international monetary fund) योजना अमेरिकेच्या न्यू हॅंपशायर संस्थानातील ब्रेटनवुडस या ठिकाणी भरलेल्या परिषदेत संमत करण्यात आली.

## केन्स योजना

केन्स योजनेत आंतरराष्ट्रीय समाशोधन संघ स्थापण्याची तरतूद होती. या संघाला बॅंकर (Bancor) नावाचे आंतरराष्ट्रीय हिशेबपूर्तीचे साधन (international means of settlement) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यवहार पुरे करण्यासाठी स्वीकारला जाईल असा पैसा निर्माण करण्याचा अधिकार होता. थोडक्यात म्हणजे केन्सला जागतिक मध्यवर्ती बॅंक (World central bank)* स्थापन करावयाची होती व तिने निर्माण केलेला पैसा (Bancor) राष्ट्रीय मध्यवर्ती बॅंकांनी परस्पर व्यवहारात विनामर्यादा स्वीकारायचा होता ऋणको राष्ट्रांना समाशोधन संघाकडून अधिकर्ष (Overdraft) रूपाने बॅंकर प्राप्त करण्याची त्यात सोय होती. अधिकर्ष घेण्याच्या अधिकारावर मर्यादा होती. पण सभासद-देशांच्या आयात-निर्यात व्यापाराच्या वाढीबरोबर ही मर्यादाही वाढवण्याची सोय होती. ऋणको आणि धनको दोन्ही राष्ट्रांना त्यांच्या बॅंकर खात्यावर व्याज द्यावे लागणार होते.

* म्हणजे राष्ट्रीय मध्यवर्ती बॅंकांची मध्यवर्ती बॅंक.

## व्हाईट योजना

अमेरिकेतर्फे मांडलेल्या व्हाईट योजनेत अधिकर्षाचे तत्त्व (Overdraft principle) नव्हते. त्या योजनेतील संस्थेकडे सभासद राष्ट्रांनी वर्गणीरूपाने भरणा केलेल्या आपल्या देशाच्या चलनाचा साठा उभा करावयाचा होता व त्यातून सभासद राष्ट्रांना अल्पकालीन स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या ताळेबंदातील तुटी भागविण्यासाठी कर्जे देण्याची सोय होती.

दोन्ही योजनांमध्ये निर्बंधरहित आंतरराष्ट्रीय व्यापारावर भर देण्यात आला होता. त्याचप्रमाणे सुवर्णमान पुन: न आणताही विनिमयदराचे स्थैर्य टिकविण्यावर आणि सभासद देशांच्या पैसाविषयक (monetary) व राजकोषीय (fiscal) धोरणविषयक स्वातंत्र्यावर भर देण्यात आला होता. एकंदरीत असे म्हणता येते की ब्रिटिश योजनेत धोरणांविषयीच्या देशाच्या स्वातंत्र्यावर जोर देण्यात आला होता तर अमेरिकेच्या योजनेत विनिमयदरातील स्थैर्यावर भर होता. प्रदीर्घ चर्चेतून तडजोडीच्या योजनेचा जो मसुदा तयार झाला त्यात अमेरिकेच्या योजनेचा गाभा स्वीकारण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील अमेरिकेच्या वाढत्या प्रभावाची ब्रेटनवुडस निर्णय ही एक नोंदीच म्हणावी लागेल.

ब्रेटनवुडस परिषदेतील निर्णयानुसार तीन निरनिराळ्या पण संबंधित अशा उद्दिष्टांसाठी तीन आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन व्हायच्या होत्या. त्या खालीलप्रमाणे :

(1) सभासद देशांना त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारातल्या ताळेबंदातील तुटीच्या प्रश्नांना तोंड देण्यास अल्पकालीन मदत करण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' किंवा International Monetary Fund ची स्थापना.

(2) सभासद देशांना त्यांच्या पुनर्रचना व विकासकार्यासाठी दीर्घ मुदतीची कर्जे पुरविण्यासाठी 'जागतिक बॅंक किंवा Internation Bank for Reconstruction Development (IBRD) किंवा World Bank ची स्थापना.

(3) देशांमधील व्यापार धोरणांचे नियंत्रण व नियमन करण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना' किंवा 'International Trade Organisation' (ITO)

वरीलपैकी (1) नाणेनिधी व (2) जागतिक बॅंकेची स्थापना मात्र झाली नाही. त्याऐवजी पुढे 'प्रशुल्क नि व्यापार यासंबंधी सर्वसाधारण करार' किंवा General Agreement on Trade and Tariffs,' (GATT) ही काहीशी सीमित उद्दिष्टे पुढे असणारी संस्था स्थापन करण्यात आली. नाणेनिधी व जागतिक बॅंक यांची स्थापना ब्रेटनवुडस येथील परिषदेत झाली म्हणून या दोन संस्थांना ब्रेटनवुडस संस्था (Breton woods Institutions) किंवा ब्रेटनवुडस जुळे (Brettonwoods Twins) असेही म्हणतात.

नाणेनिधीच्या स्थापनेसंबंधातील खालील तपशिलाची नोंद घेणे इष्ट ठरेल.

8 एप्रिल 1943 केन्स योजना प्रसिद्ध झाली.

10 जुलै 1943 सुधारित व्हाईट योजना प्रसिद्ध झाली.

24 एप्रिल 1944 नाणेनिधीच्या स्थापनेसंबंधी तज्ज्ञांचे संयुक्त निवेदन प्रसिद्ध झाले.

1 ते 22 जुलै 1944 नाणेनिधीच्या कराराची नियमावली (Articles of Agreement) चर्चेनंतर स्वीकृत.

27 डिसेंबर 1945 एकूण कोटयाच्या 77 टक्के कोटा असणाऱ्या 22 देशांनी कराराच्या नियमावलीला रीतसर मान्यता दिल्यानंतर नाणेनिधीचा करार अंमलात आला.

2 सप्टेंबर 1946 नियमावलीतील तरतुदीनुसार आपले काम लवकरच सुरू होईल अशी नाणेनिधीकडून घोषणा.

16 डिसेंबर 1946 सभासद देशांच्या चलनाच्या सममूल्यांची (Par values) पहिली यादी नाणेनिधीने प्रसिद्ध केली.

1 मार्च 1947 नाणेनिधीच्या कार्याला विधिवत् सुरुवात.

प्रस्तुत लेखात आपणास आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसंबंधी चर्चा करावयाची आहे.

## (2) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

नाणेनिधीच्या कराराची नियमावली (Articles of Agreement of the IMF) ब्रेटनवूडस येथे 1944 साली संमत झाल्यानंतर त्यात प्रथम 1969 (पहिली दुरुस्ती) आणि नंतर 1978 (दुसरी दुरुस्ती) झाली अशा दोन दुरुस्त्या करण्यात आल्या. पहिली दुरुस्ती नियमावलीत विशेष आहरण अधिकार किंवा Special drawing rights चा समावेश करण्यासाठी करण्यात आली तर दुसरी दुरुस्ती 1978 मध्ये मुख्यतः विनिमय-दरासंबंधीच्या तरतुदीत (Article IV) बदल करण्यासाठी व नाणेनिधीच्या व्यवस्थेतून सोन्याचे स्थान संपुष्टात आणण्यासाठी करण्यात आली स्थापनेच्या वेळी नाणेनिधीच्या नियमावलीत 20 नियम व 5 सूची होत्या तर आता दुसऱ्या दुरुस्तीनंतर त्यात 31 नियम (किंवा कलमे) आणि 11 सूची आहेत.

31 कलमांपैकी महत्त्वाची कलमे अशी आहेत–

कलम I उद्दिष्टे

कलम II सभासदत्व

कलम III कोटा आणि वर्गणी

कलम IV विनिमय व्यवस्थेसंबंधी जबाबदाऱ्या

कलम V नाणेनिधीचे कार्य व व्यवहार

कलम VI भांडवल अंतरण

कलम VIII सभासदांच्या सर्वसाधारण जबाबदाऱ्या

कलम XII संघटना आणि व्यवस्थापन

कलम XIV संक्रमणकालासाठी व्यवस्था

कलम XV ते XXV विशेष आहरण अधिकारसंबंधी (SDR)

आपण या लेखात उद्दिष्टे (कलम I), सभासदत्व (कलम II), कोटा व वर्गणी (कलम III), निधीचे कार्य व व्यवहार (कलम V), व विशेष आहरण अधिकारासंबंधीच्या तरतुदींविषयी प्रामुख्याने चर्चा करणार आहोत. पुढील लेखात क्रमाक्रमाने आंतरराष्ट्रीय रोकतेचा किंवा तरलतेचा (international liquidity) प्रश्न व नाणेनिधीच्या विनिमयदराविषयीच्या धोरणाची आणि भांडवल अंतरण (capital transfers) व भांडवल अंतरणावरील निर्बंध इत्यादींसबंधी चर्चा येईल. शेवटचा लेख नाणेनिधीच्या कार्याच्या मूल्यमापनात्मक असेल

### नाणेनिधीची उद्दिष्टे (कलम I)

(i) एक कायमस्वरूपी संस्था स्थापन करून तिच्याद्वारे आंतरराष्ट्रीय पैसाविषयक प्रश्न चर्चेतून एकत्रितपणे सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे.

(ii) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार व त्याची संतुलित वाढ सुकर करणे व त्यातून वास्तव उत्पन्न व रोजगार पातळी वाढविण्यास मदत करणे.

(iii) स्पर्धात्मक मूल्यऱ्हास (exchange depreciation) टाळणे सभासद देशांमधील विनिमय व्यवस्था (exchange arrangement) सुव्यवस्थित ठेवणे आणि विनिमय स्थैर्य (exchange stability) वाढवणे.

(iv) आंतरराष्ट्रीय व्यापारातील देण्याघेण्याच्या व्यवस्थेचे (payments system) बहुपक्षीय (multilateral) स्वरूप स्थापन करणे आणि त्यातील चालू व्यवहारावरील नियंत्रणे काढून टाकणे.

(v) सभासद देशांना त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारांच्या ताळेबंदातील प्रश्नांना तोंड देण्यासाठी नाणेनिधीची साधनसंपत्ती अल्पकाळासाठी उपलब्ध करून देणे व अशा रीतीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समृद्धीला बाधा आणणारी धोरणे टाळण्यास सभासद देशांना मदत करणे.

(vi) आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या ताळेबंदातील असंतुलनाचे प्रमाण व त्याचा अवधी कमी करणे.

वरील उद्दिष्टासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सुमारे गेली चार दशके प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातून निर्माण

होणारे प्रश्न जागतिक स्वरूपाचे असतात आणि त्यांची सोडवणूक जागतिक पातळीवरच करणे भाग असते. हिताचे असते व शक्य असते. असे अनेकवार इतिहासाने दाखवून दिले आहे. स्थापनेनंतरची पहिली तीन दशकेपर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापाराला एक स्थिर विनिमयदराची चौकट, अल्पकालीन तुटीला तोंड देण्याची व्यवस्था, वाढत्या राखीव मत्तेविषयक गरजा भागविण्यासाठी पुरेशी नसली तरी योग्य दिशेने काम करणारी एक व्यवस्था निर्माण करण्यात नाणेनिधीने निर्विवाद यश मिळविले. याविषयी तज्ञांमध्ये एकमत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय पैसा क्षेत्रात अनेक जबरदस्त परिणाम करणारे बदल घडून आले आहेत. नाणेनिधी त्या सर्वच व नव्या प्रश्नांना यशस्वीपणे तोंड देऊ शकला असे कोणी म्हणणार नाही.

## आंतरराष्ट्रीय परिस्थितीतील बदल

1960 च्या दशकाच्या मध्यापासून नाणेनिधीने उभ्या केलेल्या विनिमय दरव्यवस्थेवर असह्य ताण पडत होता. एका बाजूला जागतिक व्यापार वाढत होता तर दुसऱ्या बाजूला वाढत्या व्यापारासाठी लागणाऱ्या राखीव मत्तेचा (reserve assets) प्रश्न पुढे येत होता. आंतरराष्ट्रीय राखीव सत्तेचे परिणाम (size) तोकडे पडत होते, त्याच्या वाढीचा दर अगदीच मंद गती होता. तर त्या मत्तेच्या समुच्चयातील विदेश चलनाची विशेषत: डॉलरची राशी व प्रमाण सतत वाढत होते. आंतरराष्ट्रीय राखीव मत्तेत सुवर्ण, विदेशी चलन आणि नाणेनिधीतील राखीव स्थिती (reserve position) या तीन मत्तांचा समावेश असतो. त्यापैकी मध्यवर्ती बँकांकडे राखीव निधीत जमा होणाऱ्या सोन्याचा साठा एकतर वाढत नव्हता किंवा अतिशय नगण्य दराने वाढत होता. नाणेनिधीतील राखीव स्थिती अगदीच कूर्म गतीने आणि काही ठराविक काळानंतरच कोट्यातील सुधारणांच्याद्वारे वाढत होती. विदेशी चलनाचा व त्यातही डॉलर या चलनाचा साठा विशेष प्रमाणात वाढत होता एका बाजूला मध्यवर्ती बँकांकडील डॉलरचा साठा वाढत होता, तर दुसऱ्या बाजूला डॉलरच्या शक्तीला आधारभूत असलेला अमेरिकेतील सोन्याचा साठा घटत होता. म्हणजे 1960 च्या दशकात आंतरराष्ट्रीय राखीव मत्तेचे परिमाण अपुरे पडू लागले होते तर त्यातील विदेशी चलनाच्या (डॉलरच्या) वाढत्या राशीच्या मूल्याचे स्थैर्य धोक्यात येत होते.

थोडक्यात म्हणजे वाढत्या आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी नाणेनिधीने उभी केलेली (1) राखीव मत्तेच्या वाढीची व (2) विनिमयदराच्या लवचिक स्थिरतेची व्यवस्था अपुरी पडत होती. त्यातच युरो-डॉलर बाजाराची वाढ, आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या अंतरणातील सट्टेबाजीचा प्रभाव, प्रमुख राष्ट्रांमधील अर्थव्यवस्थांची अनावर चलनवृद्धीची परिस्थिती इत्यादींमुळे आंतरराष्ट्रीय पैसाविषयक व्यवस्था फारच धोक्यात आली होती. अमेरिकेने 1971 साली आपल्या अर्थव्यवस्थेच्या सुरक्षितता धोरणाचा भाग म्हणून डॉलर-सुवर्ण संबंध एकतर्फी सोडून टाकला. 1973 साली नाणेनिधीच्या अधिपत्याखालील विनिमय-दर-व्यवस्था अधिकृतपणे संपुष्टात आणून तरंगती विनिमय व्यवस्था अंमलात आली. एकूणात परिणाम असा झाला की, युद्धोत्तर कालासाठी सहकार्याने विचारपूर्वक उभी केलेली नाणेनिधीची व्यवस्था झपाट्याने वाढणाऱ्या जागतिक परिस्थितीच्या झंझावातात टिकाव धरायला असमर्थ ठरली. अनिश्चिततेच्या काळ्या ढगाला अर्थातच म्हणतात्याप्रमाणे एक चंदेरी किनार होतीच. SDRचा प्रयोग करून पैशाची भानपूर्वक, सहकाराने, सुव्यवस्थित व नियमित रीतीने निर्मिती व व्यवस्था करता येते हे नाणेनिधीने स्पष्ट केले आहे. उद्याच्या जगासाठी पैसाविषयक व्यवस्था कशी असावी हे नाणेनिधीच्या दीर्घ प्रयत्नातून अस्पष्टपणे सूचित झाले असले तरी ती कशी नसावी हे मात्र अनुभवाने दाखवून दिले आहे. नाणेनिधीने पुढे ठेवलेली उद्दिष्टे आजही महत्त्वाची आहेत. आणि अनुभव हाच कुठल्याही नवीन धोरणाच्या घडणीत उपयोगी पडणारा घटक आहे हे लक्षात घेऊन आपण आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे स्वरूप, कार्य, परिस्थिती, भवितव्य इत्यादी अंगांची साधार चर्चा या लेखात करू या.

## (3)

## सभासद राष्ट्रे आणि त्यांची वर्गणी–

### सभासद राष्ट्रे–

नाणेनिधीच्या सभासदांचे कलम II नुसार 'मूळचे' (original किंवा सूची 'अ' मधील पाहा परिशिष्ट i ) आणि 'इतर' सभासद असे दोन गट मानण्यात येतात मूळ सभासद म्हणजे ब्रेटनवुडस् परिषदेत ज्यांनी भाग घेतला होता आणि 1946 च्या अखेरपर्यंत ज्यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीविषयीचा करार अधिकृतरित्या स्वीकारला अशी 39 सभासद-राष्ट्रे (ब्रेटनवुडस् परिषदेत दुसऱ्या महायुद्धातील दोस्तराष्ट्र गटातील (Allied Powers) 44 राष्ट्रांनी भाग घेतला होता त्यापैकी ऑस्ट्रेलिया, हैती, लिबेरिया, न्यूझीलंड आणि सोविएत युनियन ही पाच राष्ट्रे वगळता उरलेली 39 राष्ट्रे नाणेनिधीची प्रारंभापासून सभासद होती. जी पाच राष्ट्रे सुरुवातीला सहभागी झाली नव्हती त्यापैकी ऑस्ट्रेलिया, हैती, लिबेरिया व न्यूझीलंड ही राष्ट्रे मागाहून नाणेनिधीत सामील झाली. सोविएत युनियनने आजही नाणेनिधीचे सभासदत्व स्वीकारलेले नाही.)

मूळ सभासदांव्यतिरिक्त नाणेनिधीचे इतर सभासद म्हणजे नाणेनिधीच्या स्थापनेनंतर घटनेतील तरतुदीनुसार झालेले सभासद. नव्याने सभासद होऊ इच्छिणाऱ्या राष्ट्रांना नाणेनिधीकडे (संचालक मंडळाकडे Board of Governors) तत्संबंधी विनंती करावी लागते त्यानंतर व्यवस्थापकीय संचालकांच्या (Executive Directors) त्या सभासदाचा कोटा इत्यादीसंबंधी शिफारशी संचालक मंडळाने मान्य केल्यावर आणि त्यासंबंधीची स्वीकृती सभासद राष्ट्राने देऊन नाणेनिधीची घटना मान्य करावयाची असते यानंतरच सभासदत्वासाठी विनंती करणारा देश औपचारिकपणे नाणेनिधीचा सभासद होतो (कलम II).

एखाद्या सभासदाला नाणेनिधीतून बाहेर पडावयाचे असल्यास नाणेनिधीला तशी सूचना द्यावी लागते (कलम XV, पोटकलम 1) व अशी सूचना दिलेल्या तारखेपासून सभासदाचे सभासदत्व रद्द होते. 14 मार्च, 1953 रोजी नाणेनिधीचा मूळ सभासद असलेल्या पोलंडने, नाणेनिधी अमेरिकेच्या हातचे बाहुले आहे असे कारण देऊन, आपले सभासदत्व रद्द करून घेतले. एखादा सभासद नाणेनिधीमधून जसा बाहेर पडू शकतो, तसे नाणेनिधीस एखाद्या सभासदाची हकालपट्टीही करता येते. (कलम XV, पोटकलम 2). जर एखादा सभासद नाणेनिधीच्या तरतुदींनुसार वागत नसेल तरच अशी कारवाई करता येते. 31 डिसेंबर 1954 रोजी झेकोस्लोव्हाकियाचे सभासदत्व वरील कारणासाठी रद्द करण्यात आले होते.

30 एप्रिल 1986 रोजी नाणेनिधीचे 146 सभासद होते. त्यापैकी 37 मूळ सभासद होते. याचा अर्थ काही कम्युनिस्ट राष्ट्रे आणि स्वित्झर्लंड वगळता जगातील बहुतेक लहानमोठी राष्ट्रे नाणेनिधीचे सभासद आहेत. (पाहा, परिशिष्ट 2).

## (4)

## निधीची साधनसंपत्ती

सभासद राष्ट्रांना त्यांच्या ताळेबंदाच्या (Balance of Payments) साहाय्यासाठी निधी ज्या साधनसंपत्तीचा उपयोग करतो ती दोन प्रकारची असते. एक सामान्य (ordinary) आणि दुसरी कर्जाऊ घेतलेली (borrowed). सामान्य साधनसंपत्तीत सभासदांनी त्यांच्या चलनात केलेला भरणा आणि सर्वसाधारण साधनसंपत्ती खात्यातील (General Resources Account) एस. डी. आर. (Special Drawing Rights).

सभासद राष्ट्रांना त्यांच्या ताळेबंदातील समस्यांना तोंड देण्यासाठी निधीकडून साहाय्य दिले जाते. असे साहाय्य देण्यासाठी निधीकडे जे भांडवल असते ते सभासदांकडून वर्गणीरूपाने गोळा केलेले असते. एखाद्या देशाला सभासद करून घेताना त्या देशाने नाणेनिधीच्या भांडवलासाठी द्यावयाची रक्कम कोटा (Quota) ठरविला जातो. त्या देशाची अर्थव्यवस्था, आयात-निर्यात व्यापार इत्यादी घटक लक्षात घेऊन प्रत्येक सभासदाचा कोटा ठरविला जातो.* सर्व सभासद-राष्ट्रांच्या कोटयांची बेरीज म्हणजेच नाणेनिधीचे सर्वसाधारण भांडवल (Ordinany Resources) होय.

1 एप्रिल, 1978 रोजी अंमलात आलेल्या बदलानुसार आपल्या कोटयाचा भरणा सभासदाला खालीलप्रमाणे करावा लागतो : कोटयाच्या 75% इतकी रक्कम सभासद देशाच्या चलनात भरावी लागते आणि 25% रक्कम SDR किंवा निधीला मान्य असलेल्या चलनात भरावयाची असते. 1978 पूर्वीच्या तरतुदीनुसार कोटयाच्या 75% टक्के रक्कम सभासद देशाच्या चलनात व उरलेली 25% सोन्यामध्ये भरावी लागत असे. उदा. निधीच्या स्थापनेच्या वेळी भारताचा कोटा 400 दशलक्ष डॉलर इतका ठरविण्यात आला होता. भारताने त्याचा भरणा कोटयाच्या 75% (300 दशलक्ष डॉलर्स) इतका रुपयात आणि 25% (100 दशलक्ष डॉलर्स) सोन्याच्या रूपाने केला होता. 1978 मध्ये अंमलात आलेल्या द्वितीय दुरुस्तीनुसार (Second Amendment) आता सभासदांना आपल्या कोटयाचा 25% भाग सोन्याऐवजी एस. डी. आर. किंवा निधीला मान्य अशा इतर चलनात भरावा लागतो.

### कोटयाचे महत्त्व

नाणेनिधीच्या सुविधांचा (facilities) वापर करण्यापूर्वी सभासदाने आपल्या कोटयाचा संपूर्ण भरणा केलेला असला पाहिजे, अशी अट असल्याने निधीचे भरणा केलेले भांडवल (paid-up capital) आणि प्राधिकृत भांडवल (authorised capital) इतके असते आणि त्यात (capital on call) हा भाग नसतो. नाणेनिधीच्या वित्तीय आणि संघटनात्मक व्यवस्थेत कोटयाला चार दृष्टींनी महत्त्व आहे.

---

* नाणेनिधीच्या प्रारंभीच्या सभासदांचा कोटा खालील सूत्रानुसार निर्धारित केला होता–

कोटा (Q) = (0.02 Y + 0.05 R + 0.10 M + ·10 V) (1 + x/y)

Y = 1940 मधील राष्ट्रीय उत्पन्न.

R = 1 जुलै 1943 रोजी असणारा सुवर्ण व डॉलरचा साठा

M = 1934–38 या काळातील सरासरी आयात

V = 1934–38 या काळातील निर्यातीमधील जास्तीत जास्त विचरण. (Variability)

X = 1934–38 या काळातील सरासरी निर्यात

संदर्भ : चंदावरकर (1948), पृ. 12.

(i) कोटयावरून सभासदांची मतदानशक्ती (voting power) निर्धारित होते. प्रत्येक सभासदाला, मग त्याचा कोटा केवढाही लहान अथवा मोठा असो, 250 मूलभूत मते (basic votes) असतात आणि त्यानंतर कोटयापैकी प्रत्येक 1 लाख एस्. डी. आर. मागे 1 मत असते. सभासदाच्या मतशक्तीचे सूत्र असे—

$$\text{सभासदाची मते} = \frac{250}{\text{मूलभूत मते}} + \frac{\text{सभासदाचा कोटा}}{100,000}$$

या सूत्रानुसार साहजिकच ज्या सभासदाचा कोटा जास्त असतो त्या सभासदास जास्त मते असतात हे स्पष्ट होते. उदाहरणार्थ :–

$$\text{(i) भारताची मतसंख्या} = 250 + \frac{\text{भारताचा कोटा}}{100,000}$$

$$= 250 + \frac{22,077 \text{ लक्ष एस्. डी. आर.}}{100,000}$$

$$= 22,327$$

$$\text{(ii) अमेरिकेची मतसंख्या} = + 250 \ \frac{\text{अमेरिकेचा कोटा}}{100,000}$$

$$= + 250 \ \frac{179183 \text{ लक्ष एस्. डी. आर.}}{100,000}$$

$$= 250 + 179123$$

$$= 179433$$

याचा अर्थ अमेरिकेचा कोटा मोठा आहे म्हणून अमेरिकेच्या मतांची संख्या जास्त आहे. अमेरिकेच्या तुलनेत भारताचा कोटा लहान आहे म्हणून भारताची मतसंख्या अमेरिकेच्या तुलनेने लहान आहे.

**30 एप्रिल 1987 रोजी काही प्रमुख राष्ट्रांची मतसंख्या अशी होती.**

| सभासद-राष्ट्र | मतसंख्या | एकूण मतांशी सभासदाच्या मतांची शेकडेवारी |
|---|---|---|
| 1) अमेरिका | 179,433 | 19.14% |
| 2) इंग्लंड | 62,190 | 6.63% |
| 3) पश्चिम जर्मनी | 54,287 | 5.79% |
| 4) फ्रान्स | 45,078 | 4.81% |
| 5) जपान | 42,483 | 4.53% |
| 6) सौदी अरेबिया | 32,274 | 3.44% |
| 7) कॅनडा | 29.660 | 3.16% |
| 8) इटली | 29,341 | 3.12% |
| 9) नेदरलँडस् (हॉलंड) | 22,898 | 2.44% |
| 10) भारत | 22,327 | 2.38% |

सभासदाच्या कोटयाच्या आकारावर सभासदाची मतसंख्या अवलंबून असते आणि एकूण नाणेनिधीच्या व्यवस्थेतील सभासदाचा प्रभाव त्याच्या मतसंख्येवर अवलंबून असतो. उदाहरणार्थ नाणेनिधीचे धोरण ठरविणाऱ्या मंडळावर, संचालक मंडळावर (Board of Governors) कोटयाच्या आकारानुसार पहिली 5 सभासद राष्ट्रे प्रत्येकी 1 संचालकाची नेमणूक (appointment) करू शकतात, बाकीच्यांना गट करून त्या गटातून आपल्या संचालकाची निवड (election) करावी लागते. संचालक मंडळावर आपला संचालक बड्या राष्ट्रांना नेमता येतो व या तरतुदीमुळे बड्या राष्ट्रांना हा विशेषाधिकारच (privilege) मिळालेला आहे. नाणेनिधीच्या स्थापनेच्या वेळी भारताचा कोटयाच्या आकारानुसार 5 वा क्रमांक होता. (सोविएत रशिया नाणेनिधीत सुरुवातीपासूनच सामील झालेला नाही.) म्हणून भारताला आपला संचालक नेमता येत असे. पुढे जपान, पश्चिम जर्मनी, इटली हे मोठे देश सभासद झाले आणि आता भारताचा कोटयानुसार क्रमांक 5 च्या खाली घसरलेला आहे. म्हणून आपला संचालक नेमण्याचा भारताचा अधिकार गेलेला आहे, आता बांगला देश (31,125 मते), भूतान (275 मते) श्रीलंका (2481 मते) आणि भारत (22,327 मते) या चार देशांच्या गटातून एक संचालक निवडला जातो. अर्थात या गटात भारताची मतसंख्या खूपच मोठी असल्याने भारताला आपला संचालक निवडून आणणे सोपे जाते. पण त्याचबरोबर पर्यायी (alternate) संचालक म्हणून गटातील दुसऱ्या एखाद्या देशाचा प्रतिनिधी निवडावा लागतो. 1986 साली संचालक भारतीय (श्री. अर्जुन सेनगुप्ता) होता. तर पर्यायी संचालक सिलोनी (श्री. जयवर्दने) होता. परिशिष्ट 2 मधील माहितीप्रमाणे भारताचा कोटयानुसार 10 वा क्रमांक आहे. बदलत्या परिस्थितीनुसार नाणेनिधीला फार मोठी रक्कम कर्जाऊ देणाऱ्या देशाला—सौदी अरेबियाला आपला संचालक नेमण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे आता एकूण 20 संचालकांपैकी 5 संचालक पहिल्या 5 कोटा-धारकांनी (अमेरिका, इंग्लंड, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, जपान) प्रत्येकी एक याप्रमाणे नेमलेले असतात, 1 संचालक सौदी अरेबियाने नेमलेला असतो तर उरलेले 14 संचालक बाकीच्या 140 सभासदांच्या निरनिराळ्या राष्ट्रगटांनी निवडलेले असतात. (व्यवस्थापकीय संचालक धरून संचालक मंडळावर एकूण 21 कार्यकारी संचालक (executive directors) असतात.

(ii) मतशक्तीला आणखी एका दृष्टीने महत्त्व आहे. नाणेनिधीच्या कार्यात अनेक महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतात. काही बाबतीतील निर्णय घेण्यासाठी विशिष्ट बहुमताची खाली दर्शविल्याप्रमाणे गरज असते. याचाच अर्थ नाणेनिधीच्या

निर्णयप्रक्रियेत मतशक्तीला महत्त्व आहे. कोटयाच्या आकारावर मतशक्ती अवलंबून असते-हे आपण पूर्वी पाहिले आहे.

| वित्तीय धोरणाचा प्रकार | एकूण मतांपैकी आवश्यक मतांची शेकडेवारी | निर्णय घेणारे मंडळ |
|---|---|---|
| (1) कोटयामधील बदल | 85% | संचालक मंडळ |
| (2) एस्. डी. आर.चे वाटप | 85% | संचालक मंडळ |
| (3) पुन:खरेदीच्या कालावधीतील बदल | 85% | कार्यकारी मंडळ |
| (4) सुवर्ण विक्री | 85% | कार्यकारी मंडळ |

(3) सभासदांच्या कोटयाच्या आकारावर सभासदांचा निधीच्या सुविधांचा लाभ अवलंबून असतो. आपण पूर्वी पहिल्याप्रमाणे नाणेनिधी आपल्या सभासदांना त्यांच्या ताळेबंदातील समस्यांना तोंड देण्यास मदत करतो. पण ही मदत मूलत: सभासदाला त्याच्या कोटयाच्या आकारानुसार मिळते. मोठा कोटाधारक–देश नाणेनिधीच्या सुविधांचा अधिक लाभ घेऊ शकतो. यासंबंधीची चर्चा पुढे येईल.

(4) 1969 पासून नाणेनिधीने एक नवीन प्रकारची राखीव मत्ता (reserve asset), SDR निर्माण केली. जागतिक अर्थव्यवस्थेत 1950 च्या दशकानंतर जी आंतरराष्ट्रीय रोकतेची (international liquidity) समस्या निर्माण झाली होती त्यावर नाणेनिधीने केलेली उपाययोजना म्हणजे SDR ची निर्मिती त्यासंबंधी तपशिलवार चर्चा पुढे आलेली आहे. त्यातील प्रत्येक सभासदाचा वाटा त्या सभासदाच्या नाणेनिधीमधील कोटयाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. मोठा कोटा म्हणजे एस्. डी. आर. वाटपात मोठा वाटा. या दृष्टीने कोटयाचे महत्त्व असते.

### कोटयात बदल

नाणेनिधीला आपले कार्य प्रभावीपणे करता यावे म्हणून निधीजवळील साधनसंपत्ती किंवा भांडवल गरज पडल्यास वाढविण्याची नाणेनिधीच्या घटनेत तरतूद आहे. नाणेनिधीच्या घटनेतील कलम III, विभाग 2 अन्वये काही कालावधीनंतर (असा कालावधी पाच वर्षांपेक्षा अधिक असू नये) संचालक मंडळाने कोटयासंबंधी सर्वसाधारण आढावा (general review) घेऊन आवश्यकतेनुसार सर्व सभासदांच्या कोटया-मध्ये बदल सुचवायचा आहे- इतर वेळी व्यक्तिगत सभासदांच्या कोटयामध्ये त्यांच्या विनंतीनुसारही बदल सुचविण्याचा संचालक मंडळाला अधिकार आहे. कोटयामधील बदल म्हणजे सभासदराष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील तुलनात्मक बदलाचे प्रतिबिंब होय. तक्ता क्र. 1 मध्ये 1983 पर्यंत झालेल्या कोटयामधील सर्वसाधारण वाढीची माहिती दिलेली आहे. नाणेनिधीने कार्य सुरू केल्यानंतर पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षपंचकात (quinquennium) सभासदांच्या कोटयात

**तक्ता क्र. 1 नाणेनिधीमधील कोटयाचा सर्वसाधारण आढावा**

| | संचालक मंडळाचा ठराव | कोटयामध्ये सर्वसाधारण वाढ (शेकडेवारी) | निधीच्या कोटयांतील एकूण वाढ (शेकडेवारी) |
|---|---|---|---|
| पहिली पाच वर्षे | वाढ सुचविण्यात आली नाही | — | |
| दुसरी पाच वर्षे | वाढ सुचविण्यात आली नाही | — | |
| 1958–59 | फेब्रुवारी 2, 1959 (2) एप्रिल 6, 1959 | 50 | 60.7 |
| तिसरी पाच वर्षे | वाढ सुचविण्यात आली नाही | — | |
| चौथी पाच वर्षे | मार्च 31, 1965 | 25 | 30.7 |
| पाचवा सर्वसाधारण आढावा | फेब्रुवारी 9, 1970 | 25 | 35.4 |
| सहावा सर्वसाधारण आढावा | मार्च 4, 1975 मार्च 22, 1975 | विविध देश समुहांवर आधारित वाढ | 33.6 |
| सातवा सर्वसाधारण आढावा | डिसेंबर 11, 1978 | 50 | 50.9 |
| आठवा सर्वसाधारण आढावा | मार्च 31, 1983 | 19 | 47.5 |

(1) सभासदांच्या कोटयांतील सर्वसाधारण वाढीबरोबर काही देशांच्या कोटयातील खास वाढही यात अंतर्भूत आहे.

(2) 50 टक्क्यांनी सर्वसाधारण वाढ व तीन देशांच्या कोटयातील खास वाढ. एप्रिलमधील ठरावानुसार जादा 14 देशांच्या कोटयांत खास वाढ करण्यात आली.

संदर्भ : आनंद जी. चंदावरकर : *The International Monetary Fund—Its Financial Organization and Activities*, IMF, वॉशिंग्टन, 1984, पृष्ठ 14.

काहीही बदल सुचविण्यात आला नव्हता. 1959 साली पहिल्या प्रथम सर्व सभासदांच्या कोट्यात 50% तर काही सभासदांच्या कोट्यात विशेष वाढ करण्यात आली. नाणेनिधीच्या कोट्यात त्यामुळे एकूण वाढ 60.7% इतकी झाली. 1983 मध्ये आठवा सर्वसाधारण आढावा घेण्यात आला. निधीचे सुरुवातीचे (1944) भांडवल एस्. डी. आर. 7,510 दशलक्ष होते. आठव्या सर्वसाधारण वाढीनंतर 1983 साली ते एस. डी. आर. 89,236.3 दशलक्ष इतके झाले. तक्ता क्र. 2 मध्ये निधीच्या एकूण कोट्यात कसकशी वाढ झाली ते दर्शविलेले आहे.

**तक्ता क्र. 2 : आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कोट्यातील बदल**

(आकडे दशलक्ष एस. डी. आर. चे)

| | निधीच्या सभासदांची संख्या | एकूण कोटा | सभासद संख्येच्या वाढीमुळे निधीच्या कोट्यात झालेली वाढ | | कोट्यातील वाढी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | आरंभीचा कोटा | सर्वसाधारण आढावा | तदर्थ व इतर | निधीच्या कोट्यातील एकूण बदल |
| | (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) = (4)+(5)+(6) |
| 1944 | 40 | 7,514.0 | 40 | 7,514.0 | | | |
| 1950 | 49 | 8,036.5 | 10 | 649.5 | — | −2.0 | 622.5 |
| | | | (1) | (125.0) | | | |
| 1955 | 58 | 8,750.5 | 10 | 837.0 | — | 2.0 | 714.0 |
| | | | (1) | (125.0) | | | |
| 1959 | 69 | 14,640.25 | 11 | 404.5 | 5,328.75 | 156.5 | 5,889.75 |
| 1965 | 102 | 20,932.00 | 34 | 756.75 | 4,791.75 | 793.25 | 6,291.75 |
| | | | (1) | (50.00) | | | |
| 1970 | 116 | 28,736.00 | 14 | 204.25 | 7,933.5 | 246.25 | 7,844.0 |
| 1976 | 133 | 38,976 4 | 17 | 445.4 | 9,755.0 | — | 10,200.4 |
| 1978 | 141 | 59,605.5 | 8 | 140.1 | 19,839.0 | 650.0 | 20,629.1 |
| 1983 | 146 | 89,236.3 | 5 | 394.4 | 28,176.5 | 1,059.9 | 29,630.8 |

(1) सभासदत्व रद्द करून घेतलेल्या देशांची संख्या आणि त्यांचा कोटा कंसात दिलेला आहे.

(2) सभासदांच्या कोट्यात बदल करण्यासंबंधीचा संचालक मंडळाच्या ठरावाची तारीख दर्शविणारे आकडे.

(3) स्तंभ (4) आणि (6) ची बेरीज.

(4) ब्रेटन वुडस् करारप्रमाणे ऑस्ट्रेलिया हाइटी, लिबेरिया, न्यूझीलंड आणि सोविएट रशिया हे देश सुरुवातीस सभासद झाले नाहीत. त्यांचा कोटा वगळून पण इजिप्त, फ्रान्स, इराण, पराग्वे यांचे निधीचे कार्य सुरू झाल्याबरोबर वाढलेला कोटा धरून.

(5) 1948 साली होंडुरासचा कोटा त्या देशाच्या विनंतीवरून कमी केला होता. पण 1951 साली पुन: तो पूर्ववत् केला गेला.

(6) अल्प कोटा धोरणा (Small quota policy) प्रमाणे SDR 121.5 दशलक्ष धरून.

(7) Compensatory financing decision खालील SDR 342.5 दशलक्ष धरून.

(8) ,, खालील SDR 34.0 दशलक्ष धरून.

संदर्भ : चंदावरकर (1984), पृ. 14

1983 च्या आठव्या आढाव्या पूर्वीची व त्यानंतरची कोटा आणि मतसंख्येची स्थिती तक्ता क्र. 3 मध्ये दर्शविली आहे. प्रमुख 20 औद्योगिक देशांच्या गटाचा एकूण कोटयातील हिस्सा 1.68% इतका वाढला. तर मतसंख्येतील हिस्सा 4.19% इतका वाढला. 12 प्रमुख तेल निर्यातदार देशांच्या गटाचा कोटयातील हिस्सा 11.55% वाढला तर मतसंख्येतील हिस्सा केवळ 0.55% वाढला या उलट 114 विकसनशील देशांच्या गटाचा कोटयातील हिस्सा 6% कमी झाला तर मतसंख्येतील हिस्सा 8.13% कमी झाला. या विकसनशील राष्ट्रगटापैकी 49 अगदी कमी विकसित देश गटाचा कोटयातील हिस्सा 12.43% कमी झाला तर मतसंख्येतील हिस्सा 13.55 कमी झाला. नाणेनिधीच्या निर्णय प्रक्रियेतील प्रभावात आणि आहरण अधिकारात विकसनशील देशांची पीछेहाट यावरून स्पष्ट दिसते.

## कर्जरूपाने उभारलेले भांडवल

नाणेनिधीकडील भांडवल प्राय: सभासदांच्या कोटयाच्या रूपाने जमा होते. नाणेनिधीच्या या साधनसंपत्तीला ( resources ) सामान्य साधनसंपत्ती म्हणतात असे आपण पाहिले आहेच. या व्यतिरिक्त एक किंवा अनेक सभासदांकडून उभयमान्य अटीनुसार कर्ज घेण्याचाही अधिकार आहे. (कलम VII, पोटकलम (i)). अशा तऱ्हेच्या कर्ज उभारण्याच्या व्यवस्थेला कर्ज घेण्याची सर्वसाधारण व्यवस्था' (General Arrangements to Borrow) किंवा 'कर्ज घेण्याची व्यवस्था' ( Borrowing Arrangements ) असे म्हणतात. वरीलप्रमाणे कर्ज घेऊन साधनसंपत्ती उभी करण्याच्या व्यवस्थेचे समर्थन असे आहे. : (1) सभासदांची एकूण मागणी पुरी करण्याइतकी साधनसंपत्ती, SDR आणि उपयोगी चलने (usable currencies) नाणेनिधी-

**तक्ता क्र. 3 : विविध राष्ट्रगटांच्या कोटयाचा आणि मतसंख्येचा हिस्सा (शेकडेवारी)**

| राष्ट्रगट / राष्ट्रे | कोटा | | | मते | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आठव्या आढाव्या-पूर्वीची एकूण कोटयाची टक्केवारी | आठव्या आढाव्या-नंतरची एकूण कोटयातील टक्केवारी | बदलाची टक्केवारी | आठव्या आढाव्या-पूर्वीची मतसंख्येची टक्केवारी | आठव्या आढाव्या-नंतरची मतसंख्येची टक्केवारी | बदलाची टक्केवारी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| **1.** औद्योगिक देश (20) | 61.29 | 62.32 | 1.68 | 58.47 | 60.92 | 4.19 |
| त्यापैकी पाच प्रमुख देश | 41.93 | 42.45 | 1.24 | 39.75 | 41.28 | 3.85 |
| अमेरिका | 20.65 | 19.90 | (–) 3.63 | 19.52 | 19.32 | (–) 1.05 |
| ब्रिटन | 7.19 | 6.88 | (–) 4.31 | 6.82 | 6.70 | (–) 1.81 |
| प. जर्मनी | 5.30 | 6.00 | 13.21 | 5.04 | 5.84 | 16.05 |
| फ्रान्स | 4.71 | 4.98 | 5.73 | 4.49 | 4.85 | 8.16 |
| जपान | 4.08 | 4.69 | 14.95 | 3.88 | 4.57 | 17.75 |
| 2 प्रमुख तेल निर्यातदार देश (12) | 10.91 | 11.55 | 5.87 | 10.76 | 10.82 | 0.58 |
| 3. तेल नसणारे विकसनशील देश (114) त्यापैकी | 27.80 | 26.13 | (–) 6.01 | 30.67 | 28.22 | (–) 8.13 |
| (a) कमी विकसित (49) | 8.69 | 7.61 | (–) 12.43 | 8.56 | 7.40 | (–) 13.55 |
| (b) तेलाची आयात करणारे इतर विकसनशील देश (65) | 19.11 | 18.52 | (–) 3.09 | 22.11 | 20.82 | (–) 5.83 |
| **4.** सर्व देश (146) 1+2+3 | 100.00 | 100.00 | — | 100.00 | 100.00 | — |

स्तंभामधील कंसातील आकडे देशांची संख्या दर्शवितात.

जवळ उपलब्ध नसल्यास कर्जरूपाने साधनसंपत्ती उभी करणे जरूरीचे ठरते. नाणेनिधीने गेल्या काही वर्षांत सभासदांना नाणेनिधीची साधनसंपत्ती वापरण्यासाठी अनेक सुविधा (facilities) निर्माण केलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर त्यावरील मर्यादाही कोटयाच्या काही पट होईल इतकी वाढविली आहे. त्या प्रमाणात कोटयामध्ये मात्र वाढ झालेली नाही. शिवाय अशा वाढीही काही ठराविक कालावधी गेल्यावरच (पाच वर्षे) करता येतात.

(2) दुसरे म्हणजे नाणेनिधीकडे कोटयाच्या रूपाने येणारी साधनसंपत्ती एस्. डी. आर. आणि राष्ट्रीय चलनांच्या स्वरूपात असते. सर्वच राष्ट्रीय चलने परिवर्तनीय (convertible) किंवा उपयोगक्षम (usable) नसतात. म्हणजे त्यांना मागणी नसते. याचाच अर्थ कोटा वाढविला तरी नाणेनिधीकडे मागणी असणाऱ्या चलनांचा साठा पुरेसा वाढत नाही. अशा वेळी मागणी असणाऱ्या चलनातील कर्जे ते चलन निर्माण करणाऱ्या देशाकडून घेणे उचित ठरते. अशीही परिस्थिती येऊ शकते की तुलनेने मोठा कोटा असणाऱ्या देशाने नाणेनिधीकडून मोठ्या प्रमाणावर मदत उचलली तर लहान कोटा असणाऱ्या देशांना मदत करण्याची नाणेनिधीची क्षमता कमी होते. अशा वेळी कर्जे काढण्याची व्यवस्था नाणेनिधीच्या उद्दिष्टपूर्तींच्या दृष्टीने उपकारक ठरते.

या बाबतीत नाणेनिधीचे मत असे की काही कारणामुळे एखाद्या वेळी नाणेनिधीच्या साधनसंपत्तीवर ताण पडतो. तो बहुतेक तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. त्यासाठी सभासदांचा कोटा वाढविणे तांत्रिक अडचणीमुळे शक्य नसते आणि जरूरीचेही नसते. अशा वेळी कर्जे उभारून साधनसंपत्ती जमविता येते आणि तात्पुरत्या वाढीव मागणीला तोंड देता येते. शिवाय घटनेने (कलम VII, पोटकलम 1 (i) नाणेनिधीला तत्संबंधी अधिकारही दिलेला आहे. 1962 साली नाणेनिधीने या तरतुदीचा प्रथम उपयोग करून 'कर्ज घेण्याची व्यवस्था' अंमलात आणली आणि आजवर त्याचा वारंवार उपयोग केलेला आहे. सुरुवातीला प्रगत औद्योगिक राष्ट्रांकडून कर्जे घेतली जात असत. नंतरच्या काळात वाढीव किंमतीला तेल निर्यात करून श्रीमंत झालेल्या देशांकडून ही कर्जे घेण्यात आली आहेत. तेल आयात करणाऱ्या देशांना तेलाच्या किंमती वाढल्याने त्यांच्या विदेश व्यापारात ज्या प्रचंड तुटी येऊ लागल्या त्या भागविण्यासाठी नाणेनिधीने 'तेल सुविधा' (Oil Facility) स्थापन करून त्याखाली मदत करण्यास सुरुवात केली. यासाठी लागणारा पैसा तेलनिर्यातदाराकडून नाणेनिधीने कर्जाऊ घेतला. गेल्या 25 वर्षांच्या काळात सभासदांच्याकडून मदतीसाठी होणारी वाढती मागणी भागविण्यासाठी नाणेनिधीने कर्जे घेण्याच्या योजनेचा विस्तार केलेला आहे.

नाणेनिधीने कर्जे घेण्यासंबंधी केलेल्या वरील व्यवस्थेचे महत्त्वाचे भाग खालीलप्रमाणे आहेत

(1) **कर्जे घेण्यासंबंधी सर्वसाधारण व्यवस्था–** (General Arrangement to Borrow) 1962 साली ही व्यवस्था अंमलात आली. त्यात 10 औद्योगिक राष्ट्रांकडून नाणेनिधीला S. D. R. 6·4 अब्ज इतकी राशी कर्जाऊ घेता आली असती.

(2) 1983 साली वरील व्यवस्था सुधारून विस्तारित केली गेली. त्यानुसार नाणेनिधीला S. D. R. 17·0 अब्ज इतकी राशी कर्जाऊ घेता आली असती.

(3) 1979 साली पूरक वित्तीय सुविधा (Supplementary financing facility) निर्माण झाली त्यानुसार नाणेनिधीला S. D. R. 7·8 अब्ज इतकी राशी कर्जाऊ घेता आली असती.

(4) नाणेनिधीच्या सभासदांना अधिक मदत देता यावी म्हणून 1981 साली वाढीव सवलत व्यवस्था (Enlarged Access) निर्माण करण्यात आली. त्यासाठी नाणेनिधीला S. D. R. 15·3 अब्ज इतकी राशी कर्जरूपाने उभी करता यावी म्हणून व्यवस्था करण्यात आली.

## (5)

## नाणेनिधीच्या साधनसंपत्तीचा वापर

नाणेनिधीची साधनसंपत्ती सभासदराष्ट्रांना नाणेनिधीच्या नियमावलीत दिलेल्या उद्दिष्टपूर्तीसाठी उपयोगात आणता यावी म्हणून अनेक धोरणे (policies) व सुविधा (facilities) ची तरतूद करण्यात आलेली आहे. गेल्या 40 वर्षांत नाणेनिधीची साधनसंपत्ती जशी वाढली त्याप्रमाण सभासदराष्ट्रांना मदतकारी अशा अनेक नवनवीन सुविधाही नाणेनिधीने निर्माण केलेल्या आहेत.

येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की नाणेनिधीची मदत सभासदराष्ट्रांना त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारातील ताळेबंदातील तुटीच्या (balance of payments deficits) प्रश्नांना तोंड देण्यासाठीच मिळू शकते. साहजिकच सभासदराष्ट्राला खरोखरीच ताळेबंदासंबंधी अडचण आहे किंवा काय याची खात्री करून घेण्याचा अधिकार नाणेनिधीला आहे. ताळेबंदातील तुटीच्या प्रश्नांना तोंड देण्यासाठी सभासदराष्ट्र कोणती उपाययोजना करणार आहेत. ती कितपत परिणामकारी आहे यासंबंधी मत बनवून योग्य धोरण आखण्यासंबंधी सल्ला देण्याचा अधिकारही नाणेनिधीला आहे. शिवाय नाणेनिधीने घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे प्रत्यक्षात आणण्यावरही नाणेनिधीची मदत किंवा मदतीचे हप्ते अवलंबून असतात. नाणेनिधीची मदत या अर्थाने सशर्त (condi-

tional) असते. मदतीची राशी व तिचा कालावधी जसजसा वाढतो तसतशा नाणेनिधी सभासदांवर लादत असलेल्या अटी अधिकाधिक कठोर होत जातात. (पाहा परिशिष्ट 3) नाणेनिधीच्या मदतीसंबंधीची सशर्तता (conditionality of fund assistance) हा अलीकडे खूपच विवाद्य विषय झालेला आहे.

## आहरण अधिकार ( drawing right )

नाणेनिधीच्या सभासदाला कलम V नुसार निधीकडून मदत घेण्याचा हक्क (drawing right) आहे. हा हक्क बजावण्यासंबंधी काही नियम आहेत ते समजून घेण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊ. समजा, 'अ' या देशाला त्याच्या विदेशी व्यापारात घट येत आहे याचा अर्थ या देशाला आयातीवरील खर्च निर्यातीपासून होणाऱ्या प्राप्तीपेक्षा जास्ती आहे. मग ही तूट कशी भरून काढता येईल ? आपण असे समजू की त्या देशाकडे तूट भरून काढण्यासाठी पुरेसे सोने किंवा परिवर्तनीय विदेशी चलन (convertible currency) उपलब्ध नाही. अशा वेळी त्या देशाला विदेशी व्यापारातील तूट कमी करण्यासाठी किंवा पूर्णपणे नाहीशी करण्यासाठी काहीतरी उपाय योजावे लागतील. असे उपाय विदेशी व्यापाराला हानीकारक ठरण्याची शक्यता असते. अशा वेळी त्या देशाला तूट भरून काढण्यासाठी हवे असलेले विदेशी चलन काही काळ उपलब्ध झाले तर व्यापाराला हानीकारक होतील असे उपाय तो देश टाळू शकेल व इतर परिणामकारक उपाय अंमलात आणू शकेल. नाणेनिधीचा नेमका या ठिकाणी उपयोग होतो. आपल्याला हवे असलेले विदेशी चलन नाणेनिधीकडून खरेदी करण्याचा (Purchase) अधिकार (आहरण अधिकार किंवा Drawing Right) सभासददेशाला असतो. हा अधिकार वापरण्यासंबंधी काही तरतुदी आहेत. त्या समजून घेऊ.

असे मानू की, त्या देशाचा नाणेनिधीतील कोटा 100 दशलक्ष डॉलर्स आहे. आपण पूर्वी पाहिलेच आहे की या कोटयाचा भरणा प्रत्येक देशाने 75 टक्के स्वतःच्या चलनात व 25 टक्के सोन्याच्या रूपात किंवा SDR मध्ये किंवा नाणेनिधीला स्वीकार्य अशा चलनामध्ये (currences acceptable to the Fund) केलेला असतो. अशा तऱ्हेने नाणेनिधीकडे सोने आणि सभासदराष्ट्रांची राष्ट्रीय चलने (डॉलर, पौंड, मार्क, रुपये, येन) यांचा साठा जमा होतो. तेच नाणेनिधीचे भांडवल होय, व त्यातूनच सभासदांना हवे ते चलन विकत घेता येते..

## आहरण अधिकारावरील दोन मर्यादा :

नाणेनिधीच्या नियमावलीतील कलम V प्रमाणे प्रत्येक सभासदाला आपल्या कोटयाच्या प्रमाणात नाणेनिधीकडून हवे ते चलन खरेदी करता येते. या खरेदीवर खालील बंधने आहेत.

(1) बारा महिन्याच्या काळात सभासदाला त्याच्या कोटयाच्या 25% इतके आपले राष्ट्रीय चलन (उदा. भारताने रुपये) देऊन नाणेनिधीकडून इच्छित विदेशी चलन खरेदी करता येते. याचा अर्थ पहिल्या हप्त्याच्या खरेदीनंतर खरेदी करणाऱ्या देशाच्या राष्ट्रीय चलनाचा (उदा. भारताचा रुपया) नाणेनिधीकडील साठा (IMF'S holding of the national currency) आता वाढेल. सभासदाचा कोटा जर \$ 100 दशलक्ष इतका असेल तर नाणेनिधीकडे सभासदत्व मिळवताना केलेला राष्ट्रीय चलनाचा भरणा \$ 75 दशलक्ष इतका असतो. (\$ 75 दशलक्ष राष्ट्रीय चलन + \$ 25 दशलक्ष सोने = \$ 100 दशलक्ष, एकूण कोटयाची रक्कम) म्हणजे विदेशी चलनाच्या पहिल्या खरेदीनंतर नाणेनिधीकडील त्या देशाच्या राष्ट्रीय चलनाचा (उदा. रुपये) साठा \$ 100 इतका होईल. नाणेनिधीकडील सभासदाच्या राष्ट्रीय चलनाचा साठा आता सभासदाच्या कोटयाच्या 100% इतका होईल. नाणेनिधीमधील सभासदाच्या राष्ट्रीय चलनाचा साठा व सभासदाचा कोटा यामधील फरकाला पूर्वी सुवर्ण प्रभाग (gold tranche) आणि आता राखीव प्रभाग (reserve tranche) असे म्हणतात. शिवाय असेही म्हणता येते की एखाद्या सभासददेशाचे चलन दुसऱ्या एखाद्या सभासदाने नाणेनिधीकडून खरेदी केले असल्यास नाणेनिधीकडील पहिल्या सभासदाच्या राष्ट्रीय चलनाचा साठा कमी होईल. हा साठा आणि सभासदाच्या कोटयाच्या 100% इतकी रक्कम यातील फरक म्हणजे सुवर्ण प्रभाग किंवा राखीव प्रभाग. या प्रभागाइतके इच्छित चलन सभासदाला नाणेनिधीकडून विनाशर्त व तात्काळ खरेदी करता येते. थोडक्यात म्हणजे नाणेनिधीमधील राखीव प्रभागाइतका निधी सभासदाला ताळेबंदातील असंतुलन मिटविण्यासाठी केव्हाही उपयोगात आणता येतो. राखीव प्रभाग [ Tranche (त्रांश) हा फ्रेंच शब्द असून त्याचा अर्थ भाग, तुकडा, हिस्सा असा होतो ] म्हणजे सभासदाच्या मालकीचाच राखीव निधी (owned reserve) समजण्यास हरकत नाही. म्हणूनच देशाच्या आंतरराष्ट्रीय राखीव निधीत ( international reserves ) राखीव प्रभागाची गणना करतात. म्हणजेच

देशाचा आंतरराष्ट्रीय राखीव निधी = त्या देशातील सोने + विदेशी चलन + नाणेनिधीमधील राखीव प्रभाग.

| विदेशी चलनाची खरेदी | नाणेनिधीकडील सभासदाच्या राष्ट्रीय चलनाचा साठा | खरेदी सशर्त किंवा विनाशर्त | |
|---|---|---|---|
| ( i ) खरेदी पूर्वीची स्थिती | सभासदाच्या कोटयाच्या 75% | --- | |
| (ii) सुवर्ण प्रभाग (gold tranche) किंवा राखीव प्रभागातील (resrve tranche) खरेदी | सभासदाच्या कोटयाच्या 100% | विनाशर्त | |
| (iii) प्रथम पतप्रभागांतर्गत खरेदी | सभासदाच्या कोटयाच्या 125% | सशर्त | शर्तींची उत्तरोत्तर वाढती कठोरता |
| (iv) द्वितीय पतप्रभागांतर्गत खरेदी | सभासदाच्या कोटयाच्या 150% | सशर्त | |
| (v) तृतीय पतप्रभागांतर्गत खरेदी | सभासदाच्या कोटयाच्या 175% | सशर्त | |
| (vi) चतुर्थ पतप्रभागांतर्गत खरेदी | सभासदाच्या कोटयाच्या 200% | सशर्त | |

(2) राखीव प्रभागाव्यतिरिक्तही सभासद नाणेनिधीकडून इच्छित विदेशी चलन खरेदी करू शकतो. राखीव प्रभागापलिकडे जाऊन अधिक विदेशी चलन खरेदी करण्याच्या सभासदाच्या खरेदी अधिकारावर (drawing right) काही बंधने आहेत. ती अशी :–

(i) राखीव प्रभागापलीकडील प्रभागांना पतप्रभाग (credit tranche) असे म्हणतात. या प्रभागातील खरेदी सशर्त असते. म्हणजेच पतप्रभागातील खरेदी करणाऱ्या सभासदाचा अधिकार निरंकुश नाही. नाणेनिधीने सुचविलेल्या अटी मान्य केल्यानंतरच सभासदाला पतप्रभागातील खरेदी करण्याची सवलत असते. पतप्रभागाचे पहिला, दुसरा, तिसरा व चौथा पतप्रभाग असे चार भाग आहेत. पहिल्या प्रभागातील खरेदीनंतर नाणेनिधीकडील सभासदाच्या राष्ट्रीय चलनाचा साठा सभासदाच्या कोटयाच्या 125% होतो. तद्वत दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या पतप्रभागातील खरेदीनंतर सभासदाच्या राष्ट्रीय चलनाचा नाणेनिधीमधील साठा त्या सभासदाच्या कोटयाच्या अनुक्रमे 150%, 175% व 200% इतका होतो, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या पतप्रभागांना उच्च पतप्रभाग (higher credit tranche) असे म्हणतात. खरेदी करणाऱ्या देशाच्या राष्ट्रीय चलनाचा नाणेनिधीकडील साठा 200 टक्के झाला की सभासदाच्या प्रभागामधील खरेदीच्या अधिकाराची एकूण मर्यादा (overall limit) गाठली जाते. याचा अर्थ असा की सभासदाच्या प्रभागामधील खरेदीच्या अधिकारावर (1) बारा महिन्यांच्या कालातील खरेदीवरील मर्यादा (कोटयाच्या 25%) आणि (2) एकूण खरेदीवरील मर्यादा (कोटयाच्या 200%) अशा दोन मर्यादा आहेत. त्यातील राखीव प्रभागातील खरेदी विनाशर्त असून एखाद्या वर्षात कोटयाच्या 25% इतके विदेशी चलन खरेदी करता येते, हे आपण पूर्वी पाहिले आहेच. पण पतप्रभागातील खरेदीवर उत्तरोत्तर अधिकाधिक कठोर (stiff) अटी लादल्या जातात. थोडक्यात म्हणजे राखीव प्रभागातील (reserve tranchos) खरेदी विनाशर्त (unconditional) असते, तर पतप्रभागातील (credit tranche) खरेदी सशर्त (conditional) असते.

सभासदराष्ट्रांच्या नाणेनिधीकडून इच्छित विदेशी चलन खरेदीसंबंधी तरतूद (purchase provision) किंवा खरेदी अधिकारासंबंधी (drawing right) चर्चेचा सारांश वरील तक्त्यात दर्शविला आहे.

येथवर आपण असे पाहिले की ताळेबंदातील तुटीच्या प्रश्नांना तोंड देण्यासाठी नाणेनिधीचे सभासद नाणेनिधीकडून विदेशी चलन खरेदी करू शकतात. सभासदांच्या या हक्काला किंवा अधिकाराला आहरण अधिकार (drawing right) असे म्हणतात. एखादा सभासद या अधिकाराचा–विनशर्त व सशर्त खरेदी करण्याच्या अधिकाराचा जास्तीतजास्त उपयोग काही मर्यादेपर्यंत (कोटयाच्या 200%) करू शकतो. आतापर्यंतच्या खरेदीच्या अधिकाराची चर्चा आपण प्रभाग धोरणाच्या (tranche policies) संदर्भात केली. या धोरणाबाहेरही काही अधिक खरेदीच्या सुविधाही (facilities) नाणेनिधीने निर्माण केलेल्या आहेत. त्यामुळे सभासदराष्ट्राची खरेदी आता तत्त्वतः कोटयाच्या 200% ची मर्यादा ओलांडून 505% पर्यंत जाऊ शकते. हे तक्ता क्र. 4 वरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. 4 नाणेनिधीच्या विविध सुविधांखालील आहरणाच्या (drawing) मर्यादा**

(आकडे सभासददेशांच्या कोटयाची टक्केवारी दर्शवितात)

| सुविधा | सुविधेखालील आहरणाची मर्यादा (कोटयाची टक्केवारी) | जास्तीत जास्त संचित (cumulative) आहरण (कोटयाची टक्केवारी) |
|---|---|---|
| राखीव प्रभाग | 25 | 25 |
| प्रथम पत प्रभाग | 25 | 50 |
| उच्च पत प्रभाग | 75 | 125 |
| विस्तारित निधी सुविधा | 140 | 190 |
| पूरक वित्तव्यवस्था सुविधा | 140 | 330 |
| प्रतिपूरक वित्तव्यवस्था सुविधा | 125 | 455 |
| राखीव साठा वित्तव्यवस्था सुविधा | 50 | 505 |

संदर्भ : IMF Survey, मे व जून 1981.

## नाणेनिधीने निर्माण केलेल्या नवीन सुविधा

### (1) प्रतिपूरक वित्तव्यवस्था सुविधा

(Compensatory financing facility or CFF)

असे दिसून येते की प्राथमिक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या देशांना अशा वस्तूंच्या निर्यात किंमतीतील अनिश्चिततेला नेहमी तोंड द्यावे लागते. त्यांना येणाऱ्या विदेशी व्यापारातील तुटीला जागतिक व्यापारातील प्राथमिक वस्तूंच्या घसरत्या किंमती बऱ्याच वेळा कारणीभूत असतात. नाणेनिधीने प्राथमिक वस्तु उत्पादन करणाऱ्या देशांना त्यासाठी सहानुभूतीपूर्वक मदत केलेली आहे. नाणेनिधीने 1963 मध्ये याबाबतीतील मदतीचे स्वरूप प्रतिपूरक वित्तव्यवस्था सुविधा निर्माण करून स्पष्ट केले. या सुविधेखाली आता प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीवर अवलंबून असणाऱ्या देशांना निर्यातीच्या उत्पन्नामधील घटीमुळे येणाऱ्या ताळेबंदातील तूट भरून काढण्यास मदत होते. या देशाला आपल्या कोटयाच्या 25% इतके विदेशी चलन या सुविधेखाली नाणेनिधीकडून उपलब्ध होऊ शकते. ही सुविधा पूर्वी उल्लेख केलेल्या प्रभाग सुविधाव्यतिरिक्त आहे. अर्थात या सुविधेचा वापर करण्यास दोन अटी आहेत. एक म्हणजे निर्यात उत्पन्नातील घट ही अल्पकालीन स्वरूपाची आणि निर्यात करणाऱ्या देशाच्या नियंत्रणा बाहेरील परिस्थितीमुळे निर्माण झालेली असली पाहिजे. दुसरी अट म्हणजे निर्माण झालेल्या अडचणीला तोंड देण्यासाठी योग्य उपाययोजना अमलात आणण्यासाठी सभासदाने नाणेनिधीशी सहकार्य केले पाहिजे.

### (2) भावस्थिरक साठा वित्तव्यवस्था सुविधा

**(Bufferstock Financing facility)**

प्राथमिक वस्तू उत्पादन करणाऱ्या देशांना निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नातील घटीमुळे येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी प्रतिपूरक वित्तव्यवस्था सुविधा निर्माण करण्यात आल्यानंतर साहजिकच प्राथमिक वस्तूंच्या किंमती स्थिर रहाव्या म्हणून केल्या जाणाऱ्या उपायांकडेही नाणेनिधीला लक्ष द्यावे लागले. वस्तूंचे आंतरराष्ट्रीय भाव स्थिर ठेवण्याच्या योजना राबवणे ही नाणेनिधीची प्रत्यक्ष जबाबदारी नाही पण अशा योजनांत सभासद देशांनी भाग घेतल्यास त्यासंबंधात त्यांना मदत करण्याचे नाणेनिधीचे धोरण आहे. यातूनच भावस्थिरक साठा वित्तव्यवस्था सुविधा नाणेनिधीने 1969 साली निर्माण केली. भावस्थिरक साठा करणाऱ्या आंतरराष्ट्रीय योजनात भाग घेण्यासाठी सभासद देशांना त्यांच्या वाटयाची वर्गणी भरण्यासाठी व तदनुषंगिक खर्च भागविण्यासाठी नाणेनिधीकडून मदत मिळू शकते. या सुविधेखाली सभासदांना त्यांच्या कोटयाच्या 45% पर्यंत विदेशी चलन नाणेनिधीकडून खरेदी करता येते. आजपावेतो कथिल, साखर, कोको, रबर इत्यादी वस्तूंच्या भावस्थिरक साठयांच्या संदर्भात नाणेनिधीने सभासद देशांना मदत दिलेली आहे.

### (3) विस्तारित निधी सुविधा :–

(Extended fund facility)

ही नवी सुविधा 1974 मध्ये संमत करण्यात आली. विकसनशील देशांना असा अनुभव येतो की त्यांच्या अर्थव्यवस्थांमध्ये संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांना दीर्घ मुदतीची धोरणे आखावी लागतात. साहजिकच दीर्घमुदतीसाठी सभासद देशांना प्रभाग धोरणांचा (tranche policy) फारसा उपयोग नसतो. म्हणून नाणेनिधीने सभासद देशांच्या मध्यम मुदती मदतीसाठी विस्तारित निधी सुविधा स्थापन केली. या सुविधेखाली सभासद देशांना, विशेषतः विकसनशील देशाकडे नाणेनिधीच्या मते विकासाचा सुयोग्य कार्यक्रम, त्यासंबंधी धोरणे असल्यास नाणेनिधीकडून मदत होऊ शकते. या सुविधेखालील मदत हप्ते पद्धतीने देण्यात येते. पूर्वी आखून घेतलेला कार्यक्रम वेळापत्रकाप्रमाणे जसजसा पार पडत जातो तसतशी नाणेनिधीची मदत हप्त्याहप्त्याने येते. सभासद देशाला या सुविधेखाली दिली जाणारी मदत तीन वर्षांच्या कालावधीत क्रमाक्रमाने घेता येते. या तीन वर्षांच्या कालावधीत सभासद देशाला नाणेनिधीकडून कोटयाच्या 140% पर्यंत विदेशी चलन खरेदी करता येते. अर्थात ही सुविधा वापरताना आणखीही एक

मर्यादा अशी असते की नाणेनिधीकडील सभासददेशाच्या राष्ट्रीय चलनाचा साठा कोटयाच्या 250 टक्क्यांवर जाता कामा नये.

ही सुविधा म्हणजे नाणेनिधीकडून मिळणाऱ्या वित्तीय साहाय्याचा एक महत्वाचा भाग होय. या सुविधेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे सभासदाने करावयाची परतफेड चार ते आठ वर्षांच्या काळात सोळा समान हप्त्यात करावयाची असते.

गेल्या 7 वर्षांच्या काळात निरनिराळ्या सुविधांखालील नाणेनिधीकडून सभासदराष्ट्रांनी केलेली विदेशी चलनाची खरेदी तक्ता क्रमांक 5 मध्ये दर्शविली आहे.

## 4. तेलविषयक सुविधा (Oil facility)

1973 नंतरच्या काळात तेलाच्या किमती भरमसाट वाढल्याने तेलाच्या आयातीवर अवलंबून असणाऱ्या अर्थ-व्यवस्थांचे भवितव्य डळमळीत झाले. वाढत्या किमतीमुळे तेल आयातीवरील खर्च एकदम वाढला, आणि अनेक देशांच्या विदेशी व्यापारातील ताळेबंदात भरमसाट तूट निर्माण झाली. यातून एक नवीनच आंतरराष्ट्रीय अरिष्ट उत्पन्न होईल अशी भीती वाटू लागली होती. अशा वेळी नाणेनिधीने दोन वर्षासाठी तेलसुविधा (Oil facility) निर्माण करून तेल आयात करणाऱ्या देशांना दिलासा दिला. 1975 साली खरेदी अधिकारावरील मर्यादा (drawing right) सभासदाच्या कोटयाच्या 125 टक्के इतकी ठरविण्यात आली. अर्थात सभासदाचा हा अधिकार सशर्त होता. सभासद देशाने तेलाची बचत करण्यासंबंधीचे धोरण, त्याचप्रमाणे तेलाला पर्यायी ऊर्जा धोरण ही आखावयाचे होते.

या सुविधेखाली घेतलेल्या मदतीची परतफेड पाच ते सात वर्षे मुदतीत करावयाची होती. शिवाय त्यावर 7·75 टक्के व्याजदर ही भरावयाचा होता

## पूरक वित्तव्यवस्था सुविधा (Supplementary financing facility)

1970 च्या दशकाच्या अखेरच्या वर्षात बऱ्याच सभासद देशांना त्यांच्या कोटयाच्या तुलनेत अतिशय गंभीर अशा ताळेबंदातील असंतुलनाच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले. यासाठी 1979 साली नाणेनिधीने पूरक वित्तव्यवस्था सुविधा सुरू करण्याचे ठरविले. यासाठी ताळेबंदातील वाढाव्याची परिस्थिती असलेल्या देशांकडून कर्जे घेऊन त्यातून वरील सुविधा उपलब्ध करावयाची कल्पना त्यात होती. या सुविधेचा उपयोग खालील परिस्थितीत करण्याचे ठरविले गेले. (1) सभासद देशाची गरज त्याला नेहमीच्या पतप्रभाग आणि विस्तारित सुविधांखाली मिळू शकणाऱ्या मदतीपेक्षा मोठी असली पाहिजे. (2) उच्च पतप्रभागातील मदतीसाठी ज्या

**तक्ता क. 5 प्रभाग धोरणे आणि खास सुविधांखालील सभासद राष्ट्रांची खरेदी 1981–87**
(आकडे अब्ज एस्. डी आर चे)

| | वित्तीय वर्षे अखेर (30 एप्रिल) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1981 | 1982 | 1983 | 1984 | 1985 | 1986 | 1987 |
| **प्रभाग धोरणाखालील खरेदी** | 3.60 | 5.33 | 6.17 | 8.88 | 4.81 | 3.34 | 2.58 |
| प्रथम पत प्रभाग | 0.78 | 0.02 | 0.03 | — | –(1) | 0.29 (1) | 0.02(2) |
| उच्च पत प्रभाग | 1.90 | 2.73 | 3.68 | 4.16 | 2.77 | 2.55 | 2.31 |
| विस्तारित निधी सुविधा | 0.92 | 2.58 | 2.46 | 4.72 | 2.04 | 0.50 | 0.25 |
| **खास सुविधांखालील खरेदी** | 0.78 | 1.63 | 4.09 | 1.28 | 1.25 | 0.60 | 0.59 |
| प्रतिपूरक वित्त सुविधा | 0.78 | 1.63 | 3.74 | 1.18 | 1.25 | 0.60 | 0.59 |
| भाव स्थिरक साठा वित्त सुविधा | — | — | 0.35 | 0.10 | — | — | — |
| एकूण | 4.38 | 6.96 | 10.26 | 10.16 | 6.06 | 3.94 | 3.17 |

संदर्भ : नाणेनिधी, वार्षिक अहवाल, 1987, पृ. 78.

1. 50 दशलक्ष एस्.डी.आर. पेक्षा कमी.

2. तातडीची मदत.

अटी सर्वसाधारणपणे घातल्या जातात तशा अटी पूरक वित्त-व्यवस्था सुविधेखालील मदतीसाठी लागू होतील. (3) वाजवी समाशोधन कार्यक्रम (adjustment programme) अंमलात आणण्यासाठी लागणारा कालावधी एका वर्षापेक्षा जास्त असला पाहिजे. असा काल तीन वर्षांपर्यंत वाढवता येईल.

## 5. न्यास निधी (Trust Fund)

नाणेनिधीने आंतरराष्ट्रीय पैसाव्यवस्थेतून सोन्याचे स्थान संपुष्टात आल्याचे नाणेनिधीच्या नियमावलीत (Articles of Agreement) दुसरी दुरुस्ती (second amendment) करून जाहीर केले. त्यापाठोपाठ सभासदांनी आपल्या वर्गणीचा भरणा करताना वर्गणीचा काही भाग (25%) सोन्याच्या रूपात करण्याची जी पूर्वी अट होती तीही काढून टाकली. मग प्रश्न उरला निधीकडे पूर्वी जमा झालेल्या सोन्याच्या साठ्याचा. त्याचा एक षष्ठांश भाग (25 दशलक्ष औंस) नाणेनिधीने बाजारभावाने विकण्याचे ठरविले. अमेरिकेने डॉलरचा सोन्याशी असलेला संबंध 1971 साली तोडल्यानंतर सोन्याचे भाव आंतरराष्ट्रीय बाजारात वाढू लागले. (तत्पूर्वी सोन्याचा भाव मध्यवर्ती बँकांच्या परस्परव्यवहारासाठी $ 35 = 1 औंस सोने असा होता. अमेरिकेने हा भाव 1934 साली जाहीर केला आणि तो पुढे 1971 सालापर्यंत टिकवून धरण्याचा जिद्दीने प्रयत्न केला.) नाणेनिधीने बाजारभावाने आपल्याकडील सोन्याचा एक षष्ठांश भाग विकला असता त्यापासून जो नफा झाला त्या नफ्याचा गरीब देशांना सवलतीच्या दराने दीर्घ-मुदती कर्ज देण्यासाठी उपयोग करण्याचे ठरविले व त्यासाठी एक न्यासनिधी स्थापन केला. या निधीत श्रीमंत देशांकडून देणग्या, नाणेनिधीच्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग इत्यादींची भर पडत असते. अत्यंत कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या गरीब व अविकसित देशांना त्यांच्या सुयोग्य विकास कार्यक्रमांसाठी या न्यासनिधीतूनच मदत मिळते. न्यासनिधीची मदत मिळण्यासाठी जी कसोटी, दरडोई उत्पन्न, लावली होती, त्यानुसार 1976–78 या कालावधीत 61 सभासद देश पात्र ठरविण्यात आले. त्यांचे दरडोई उत्पन्न 1973 साली SDR 300 पेक्षा कमी होते. 1978–80 या कालावधीसाठी 1975 सालचे दरडोई उत्पन्न SDR 520 अशी कसोटी लावण्यात आली. त्यानुसारही 61 सभासद देश न्यासनिधीच्या मदतीला पात्र ठरले.

न्यासनिधीची मदत कर्जरूपाने देण्यात आली. कर्जावरील व्याजदर अर्धा टक्का ठरविण्यात आला होता. कर्जवाटपानंतर साडेपाच वर्षांनंतर दहा समान सहामाही हप्त्यात कर्जाची परतफेड करायची होती.

30 एप्रिल, 1981 ला न्यासनिधीचा कर्जवाटपाचा कार्यक्रम स्थगित करण्यात आला. त्यानंतर न्यासनिधीचे कार्य फक्त पूर्वी दिलेल्या कर्जाच्या वसुलीचा हिशेब ठेवणे एवढेच राहिले. त्यातूनच पुढे SDR 750 दशलक्ष इतकी रक्कम पूरक वित्त-व्यवस्था सुविधेला आर्थिक साहाय्य म्हणून देण्याचे ठरविण्यात आले. कमी उत्पन्न असणाऱ्या विकसनशील राष्ट्रांची पूरक वित्तव्यवस्था सुविधेखाली घेतलेल्या मदतीवरील होणाऱ्या खर्चात त्यामुळे थोडी बचत होते.

## (6) नैसर्गिक आपत्तींच्या काळात तातडीची मदत (Emergency Assistance Related to Natural Disasters)

ताळेबंदातील असंतुलन दूर करण्यासाठी नाणेनिधीकडून विविध सुविधांखाली मदत होते हे येथवर आपण पाहिले. 1960 सालापासून अनपेक्षित व नैसर्गिक आपत्तींपासून (भूकंप, दुष्काळ, हरिकेन, टोळधाडी इत्यादी) उद्‌भवणाऱ्या प्रश्नांना तोंड देण्यासाठी नाणेनिधीने प्रथम व द्वितीय प्रभागांतर्गत विदेशी चलनाची खरेदी करण्याची सभासद देशांना सवलत दिलेली आहे.

या सुविधेखालील घेतलेल्या मदतीची परतफेड (परत खरेदी) तीन ते पाच वर्षांच्या मुदतीत करावयाची असते. निर्माण झालेल्या आपत्तीशी सामना देण्यासाठी कोणत्या प्रकारची धोरणे व कार्यक्रम आखलेले आहेत याची संबंधित देशाने नाणेनिधीला कल्पना द्यावयाची असते.

वरील सुविधेखाली इजिप्त (1962) युगोस्लाव्हिया (1963), भारत (1966), निकाराग्वा (1973), येमेन (1983) इत्यादी देशांना नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी साहाय्य देण्यात आले.

## हक्क विसर्जन (Waiver)

कोणत्याही बारा महिन्यांच्या काळात कोट्याच्या 25 टक्के इतकी विदेशी चलनाची खरेदी नाणेनिधीकडून करता येते. पण सभासददेशाची गरज नेमकी तेवढीच असेल असे सांगता येणार नाही. अशा वेळी नाणेनिधीच्या नियमावलीत वरील मर्यादा ओलांडण्यास म्हणजे सूट देण्याची किंवा हक्क विसर्जनाची तरतूद (Waiver) कलम V, पोटकलम 4 ने करण्यात आली आहे. 1953 साली प्रथम हक्क विसर्जनाच्या तरतुदीचा वापर करण्यात आला. नाणेनिधीने अनेकवार योग्य कारणांसाठी या तरतुदीचा वापर केल्याचे आढळते.

## राखीव व्यवस्था (Stand-by arrangement)

एखाद्या सभासद देशाची नाणेनिधीच्या मदतीची गरज तावडतोबीची नसेल पण पुढील 6 ते 12 महिन्यांच्या काळात

त्याची निकड निर्माण होण्याचा संभव असेल तर अशा परिस्थितीत सभासद देशाला संभाव्य असंतुलनाच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी राखीव व्यवस्था करण्याची तरतूद आहे. गेली अनेक वर्षे या तरतुदीचा लाभ अनेक सभासदांनी घेतलेला आहे. नाणेनिधीच्या अधिकार मंडळाने नाणेनिधीतील तरतुदींची नाणेनिधीचा मूळ हेतू लक्षात घेऊन लवचिक रीतीने कशी अंमलबजावणी केली आहे, याचे राखीव व्यवस्था हे एक चांगले उदाहरण आहे. राखीव व्यवस्थेसंबंधी कार्यकारी मंडळाने 1952 साली निर्णय केला होता. 1953 साली प्रथमतः दोन राखीव व्यवस्था मंजूर करण्यात आल्या तेव्हापासून 1987 पर्यंत एकूण 610 राखीव व्यवस्था मंजूर झाल्या आणि त्यातील एकूण रक्कम SDR 58,777.57 दशलक्ष इतकी होती. राखीव व्यवस्थेखालील रकमेवर 6.375% दराने शुल्क द्यावे लागते.

1948 ते 1987 या 40 वर्षांच्या काळात नाणेनिधीकडून सभासद देशांनी केलेल्या विदेशी चलनाच्या खरेदीसंबंधी व त्याचप्रमाणे स्वतःच्या चलनाच्या परतखरेदी संबंधी एकत्रित माहिती तक्ता क्र. 6 मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. 6 : सभासदराष्ट्रांनी नाणेनिधीकडून केलेल्या खरेदी व परत खरेदीसंबंधी वित्तीय वर्षअखेरचे आकडे 1948–87**

**(अब्ज दशलक्ष एस. डी. आर)**

| वर्ष | सभासदांकडून विदेशी चलनाची एकूण खरेदी | सभासदांकडून आपल्या चलनाची नाणेनिधीमधून एकूण परत खरेदी |
|---|---|---|
| 1948 | 606.04 | –– |
| 49 | 119.44 | –– |
| 50 | 51.80 | 24.21 |
| 51 | 28.00 | 19.09 |
| 52 | 46.25 | 36.58 |
| 1953 | 66.12 | 184.96 |
| 54 | 231.29 | 145.11 |
| 55 | 48.75 | 276.28 |
| 56 | 38.75 | 271.66 |
| 57 | 1,114.05 | 75.04 |
| 1958 | 665.73 | 86.81 |
| 59 | 263.52 | 537.32 |
| 60 | 165.53 | 522.41 |
| 61 | 577.00 | 658.60 |
| 1962 | 2,243.20 | 1,260.00 |
| 1963 | 579.97 | 807.25 |
| 64 | 625.90 | 380.41 |
| 65 | 1,897.44 | 516.97 |
| 66 | 2,817.29 | 406.00 |
| 1967 | 1,061.28 | 340.12 |
| 1968 | 1,348.25 | 1,115.51 |
| 69 | 2,838.85 | 1,542.33 |
| 70 | 2,995.65 | 1,670.69 |
| 71 | 1,167.41 | 1,656.86 |
| 1972 | 2,028.49 | 3,122.33 |
| 1973 | 1,175.43 | 540.30 |
| 74 | 1,057.72 | 672.49 |
| 75 | 5,102.45 | 518.08 |
| 76 | 6,591.42 | 960.10 |
| 1977 | 4,910.33 | 868.19 |
| 1978 | 2,503.01 | 4,485.01 |
| 79 | 3,719.58 | 4,859.18 |
| 80 | 2,433.26 | 3,775.83 |
| 81 | 4,860.01 | 2,852.93 |
| 1982 | 8,040.62 | 2,009.88 |
| 1983 | 11,391.89 | 1,555.12 |
| 84 | 11,517.73 | 2,017.65 |
| 85 | 6,288.87 | 2,730.39 |
| 86 | 4,101.22 | 4,289.01 |
| 1987 | 3,684.56 | 6,169.32 |
| | 101,004.10* | 53,960.02** |

* राखीव भाग स्थितीचा समावेश

* * Excludes sales of curreney / and adjustment that have the effeet of repurchase

**संदर्भ** : आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, वार्षिक अहवाल 1987, पृ. 81.

## शुल्क (Charges)

निधीच्या साधनसंपत्तीचा उपयोग सभासदांना करता येतो पण त्यासाठी त्यांना शुल्क द्यावे लागते. राखीव प्रभागांतर्गत खरेदी व्यतिरिक्त इतर सुविधांवरील खरेदीवर नाणेनिधीकडून शुल्क आकारले जाते. प्रथमतः सर्व व्यवहारांवर 0·5 % सेवाशुल्क द्यावे लागते. शिवाय खरेदीवर मुदतीनुसार वार्षिक 4.375 टक्क्यापासून ते 6.375 टक्क्यांपर्यंत शुल्क द्यावे लागते. एक वर्ष मुदतीसाठी शुल्क 4.375 टक्के असते व पुढे प्रत्येक जादा वर्षासाठी 0.5 टक्के याप्रमाणे

ते वाढते. याप्रमाणे पाच वर्षे मुदतीसाठी ते 6.375 टक्के होते.

पाच वर्षांपेक्षा अधिक मुदतीवर (विस्तारित निधी सुविधे खालील खरेदीसाठी) द्यावे लागणारे शुल्काची कमालमर्यादा 6.875% असते. राखीव व्यवस्थेखालील (Stand–by arrangement)रकमेवर 6.875 दराने शुल्क आकारले जाते.

## (6)

## SDR ची निर्मिती : पार्श्वभूमी

आपण सुरुवातीला पाहिल्याप्रमाणे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार पूर्वी कधी नव्हता इतक्या वेगाने आणि दीर्घकालपर्यंत सातत्याने (सुमारे 6 टक्के चक्रवाढ दराने) वाढला. वाढत्या विदेशी व्यापाराबरोबर ताळेबंदातील तुटीही वाढत्या आणि वारंवार उद्‌भवण्याची संभाव्यता वाढते. म्हणजे तुटी भागवण्यासाठी आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यात वापरात येणारी साधनेही (उदा. सोने किंवा परिवर्तनीय विदेशी चलन) व्यापाराबरोबर वाढली पाहिजेत. 1969 पर्यंत सोने, विदेशी चलन व नाणेनिधीतील राखीव प्रभाग अशी तीन साधने होती त्यांनाच आंतरराष्ट्रीय राखीव मत्ता (international reserve assets) असे म्हणतात. या राखीव मत्तेची राशी विविध कारणांसाठी व्यापाराच्या वाढीशी सुसंगतपणे वाढत नव्हती. 1960 च्या दशकात राखीव मत्तेच्या या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले होते. यालाच आंतरराष्ट्रीय तरलतेचा किंवा रोकतेचा प्रश्न (problem of international liquidity) असे म्हणतात. (त्याची सविस्तर चर्चा पुढील लेखात येईल.)

या प्रश्नाला तोंड देण्यासाठी नाणेनिधीने स्पेशल ड्रॉईंग राईट (SDR) किंवा विशेष आहरण अधिकार या स्वरूपात एक नवीन राखीव मत्ता निर्माण केली. आता सोने, विदेशी चलन व नाणेनिधीचे आहरण अधिकार (drawing right) याबरोबरच विशेष आहरण अधिकार SDR हासुद्धा राखीव मत्तेत गणला जातो आता एखाद्या देशाची आंतरराष्ट्रीय राखीव मत्ता = सोने + विदेशी चलन + नाणे निधीमधील राखीव प्रभाग + एस्. डी आर. 1969 मध्ये नाणेनिधीच्या नियमावलीत दुरुस्ती करून (पहिली दुरुस्ती) SDR निर्माण करण्याचा अधिकार नाणेनिधीला देण्यात आला. (कलम XV, पोटकलम 1).

राखीव मत्तेसंबंधी दीर्घकालीन जागतिक गरज लक्षात घेऊन जरूरीप्रमाणे जगात चलनवृद्धी किंवा चलनक्षय टाळण्याच्या उद्देशाने उपलब्ध असलेल्या राखीव मत्तेला पूरक म्हणून एस. डी. आरची निर्मिती करावी किंवा त्यात कपात करावी असे संबंधित नियमात म्हटलेले आहे. नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालकाने कार्यकारी मंडळाच्या संमतीने केलेल्या शिफारशीनुसार नाणेनिधीचे नियामकमंडळ SDR च्या वाटपासंबंधी निर्णय करू शकते. त्यासाठी अर्थातच निधीमधील एकूण मतांच्या 85% इतके बहुमत अशा निर्णयाच्या बाजूचे असले पाहिजे असा नियम आहे.

SDR निर्माण केल्यानंतर त्याचे वाटप सहभागी सभासद देशांमध्ये त्यांच्या नाणेनिधीमधील कोट्याच्या प्रमाणात होते. उदाहरणार्थ 1000 दशलक्ष SDR निर्माण केले गेले व एखाद्या सभासदाचा नाणेनिधीमधील कोटा एकूण कोट्याच्या 10% आहे तर त्या सभासदास 100 दशलक्ष एस. डी. आर. मिळतील.

SDR चा उपयोग सहभागी देशांकडून इच्छित विदेशी चलन खरेदी करण्यासाठी, नाणेनिधीच्या कोट्याची वर्गणी देण्यासाठी किंवा नाणेनिधीकडील स्वत:चे चलन परत खरेदी करण्यासाठी (re-purchase) केला जातो. याचा अर्थ असा की SDR चा प्रश्न अनिवार्यपणे आंतरराष्ट्रीय व्यवहारातील ताळेबंदातील तुटीतून निर्माण झालेल्या प्रश्नाशीच निगडित आहे. नाणेनिधीच्या मूळ उद्देशाशी (ताळेबंदातील तुटीच्या अल्पकालीन प्रश्नाशी) हे सुसंगतच आहे. SDR चा उपयोग विकासासाठी वित्तीय साधन (development finance) म्हणून करता येत नाही. शिवाय सोन्याच्या बदल्यात SDR मिळत नाही

## SDR ची वैशिष्ट्ये

प्रचलित राखीव मत्तेला पूरक म्हणून SDR ही विश्वासाश्रित (fiduciary) राखीव मत्ता नाणेनिधीने 1970 पासून निर्माण केली. 1969 च्या नाणेनिधीच्या नियमावलीत दुरुस्ती करून अशी विश्वासाश्रित मत्ता निर्माण करण्याचा निधीला अधिकार देण्यात आला. SDR च्या रूपाने व्याजदायी (interest-bearing) राखीव मत्ता आंतरराष्ट्रीय सहकार्याने प्रथमच निर्माण करण्यात आल्याचे इतिहासात नमूद करावे लागेल. ही मत्ता नाणेनिधीने निर्माण करून सभासदांमध्ये काही संकेतानुसार वाटली जाते. वस्तुरूप पैशाप्रमाणे (commodity money) SDR ही धारकाची मत्ता आहे पण कुणाचेही दायित्व (liability) नाही. वस्तुरूप मत्तेचे मूल्य अंगभूत (intrinsic) असते पण SDR चे मूल्य मात्र SDR योजनेत सहभागी होणाऱ्या देशांनी SDR स्वीकारण्याचे आणि धारण करण्याचे कबूल केलेले असते, या त्यांच्या बांधिलकीतून (commitment) निर्माण होते. ब्रिटिश कन्सोल्स (consols) प्रमाणे SDR हा एक प्रकारचा मुदतसमाप्ती (maturity-limit) नसणारा रोखा (security) आहे. पण तो सममूल्यात (at par) वटवता येतो किंवा रद्द

करता येतो. आपल्या वाट्याला आलेली SDR ची राशी सभासदराष्ट्रे आपल्या आंतरराष्ट्रीय मत्तेचा (international reserves) भाग म्हणून वापरू शकतात. SDR धारकांना SDR च्या राशीवर बाजारदराशी निगडित व्याज मिळते. (1973 सालापासून हा दर प्रत्येक आठवड्याला नाणे निधीतर्फे जाहीर केला जातो.) आजमितीस एस. डी. आर. धारकांना त्याचा उपयोग अधिकृत मत्ता (official asset) म्हणून आणि SDR योजनेत सहभागी असणाऱ्या देशामध्ये आणि मान्यताप्राप्त संस्थांमध्येच त्याचे हस्तांतरण करता येते. अशा रीतीने विविध प्रकारच्या मत्तांची आणि वस्तुरूप, विश्वासाश्रित व पतपैशांची वैशिष्टचे ज्यात आहेत अशी SDR संमिश्र मत्ता (syncretic asset) आहे.

## विशेष आहरण अधिकार SDR आणि आहरण अधिकार, DR त्यांमधील फरक

(1) आहरण अधिकारात वाढ करण्यासाठी प्रथम कोटचामध्ये वाढ करावी लागते. त्यानंतर सभासद देशांना राखीव आणि पतप्रभागांच्या नियमानुसार इच्छित विदेशी चलन खरेदी करता येते. याउलट SDR ची निर्मिती सभासदांच्या कोटचावर अवलंबून नाही. त्यासंबंधीचा निर्णय स्वतंत्रपणे होत असतो. पण SDR निर्माण झाल्यानंतर वाटपाशी कोटचाचा संबंध येतो. SDR चे वाटप सभासदांमध्ये त्यांच्या नाणेनिधीतील कोटचाच्या प्रमाणात होते.

(2) आहरण अधिकाराखाली (कलम V) केलेली इच्छित विदेशी चलनाची खरेदी करणाऱ्या देशाला काही मुदतीत आपल्या चलनाची परत खरेदी करावी लागते. याउलट SDR खाली केलेल्या खरेदीमध्ये परत खरेदी करण्याचा प्रश्न येत नाही.

(3) कलम V खालील आहरण अधिकार वापरताना, विशेषतः उच्च पतप्रभागांतर्गत केलेली खरेदी (drawing in the higher credit tranches) ही सशर्त (conditional) असते तर SDR खालील खरेदी बिनशर्त (unconditional) असते.

(4) SDR संबंधीचा व्यवहार करण्यासाठी नाणेनिधीमध्ये SDR खाते (S.D.R. account) उघडण्यात आले आहे. SDR व्यतिरिक्तचा म्हणजे प्रभाग धोरणाखालील व्यवहार सर्वसाधारण खात्यातून (General Department) होतो.

(5) सभासद देशांना SDR योजनेत सामील होण्याचा किंवा न होण्याचा हक्क आहे.

## SDR चा पुरवठा

SDR निर्माण करण्याचा निर्णय झाला की त्याचे वाटप (allocation) काही विशिष्ट कालासाठी केले जाते. या कालावधीला मूलाधार काल (Basic Period) असे म्हटले जाते. हा काल साधारणपणे 5 वर्षांचा असतो. तो त्याहून कमी वर्षांचाही असू शकतो. पहिला मूलाधार काल तीन वर्षांचा (1970–72) होता. दुसरा पाच वर्षांचा (1973–77), तिसरा चार वर्षांचा (1978–81) तर चौथा पाच वर्षांचा (1982–86) होता. पहिल्या व तिसऱ्या मूलाधार वर्षात SDR चे अनुक्रमे SDR 9·4 अब्ज आणि SDR 12 अब्ज असे वाटप करण्यात आले. आत्तापर्यंतचे वाटप आणि निव्वळ संचयी वाटप (net cumulative allocation) तक्ता क्र. 7 मध्ये दाखविले आहे.

**तक्ता क्र. 7 SDR चे वाटप (allocation), 1970–85**

(आकडे अब्ज एस. डी. आर. चे)

| वर्ष | आधार-काल (Basic Period) | SDR चे वाटप | निव्वळ संचयी वाटप (Net cumulative allocation |
|---|---|---|---|
| 1970 | प्रथम | 3·4 | 3·4 |
| 1971 | प्रथम | 3·0 | 6·4 |
| 1972 | प्रथम | 3·0 | 9·4 |
| 1973 | द्वितीय | – | 9·4 |
| 1974 | द्वितीय | – | 9·4 |
| 1975 | द्वितीय | – | 9·4 |
| 1976 | द्वितीय | – | 9·4 |
| 1977 | द्वितीय | – | 9·4 |
| 1978 | तृतीय | – | 9·4 |
| 1979 | तृतीय | 4·0 | 13·4 |
| 1980 | तृतीय | 4·0 | 17·4 |
| 1981 | तृतीय | 4·0 | 21·4 |
| 1982 | चतुर्थ | – | 21·4 |
| 1983 | चतुर्थ | – | 21·4 |
| 1984 | चतुर्थ | – | 21·4 |
| 1985 | चतुर्थ | – | 21·4 |

## SDR चे विविध उपयोग

आजवर निर्माण केलेल्या SDR चा एकूण जागतिक राखीव मत्तेत फारच कमी वाटा आहे. एप्रिल 1984 मध्ये एकूण जागतिक सोन्याव्यतिरिक्तच्या राखीव मत्तेत SDR चे प्रमाण सुमारे 6 टक्के इतके होते. याचा अर्थ आंतरराष्ट्रीय राखीव मत्ता म्हणून SDR चे कार्य मर्यादित आहे. विनिमयाचे

माध्यम (medium of exchange) म्हणूनही SDR चे कार्य फार महत्त्वाचे नाही कारण अधिकृत संस्थांमधील परस्पर व्यवहारात त्याचा उपयोग होतो. नाणेनिधी किंवा पैसा-विषयक अधिकार मंडळांबाहेर SDR मध्ये व्यक्त केलेली (SDR denominated) मत्ता (assets) किंवा दायित्वे (liabilities) अजून फारशी प्रचारात आलेली नाहीत. शिवाय SDR चे मूल्याची साठवण (store of value) म्हणून होणारे कार्य SDR च्या मूल्यनिर्धारणासाठी निश्चित केलेल्या चलन–समुच्चयातील चलनांच्या मूल्यावर अवलंबून आहे.

आजपर्यंत SDR चा प्रमुख उपयोग हिशेबाचे युनिट किंवा एकक (unit of account) म्हणून होत आहे. नाणेनिधीचे हिशेबही SDR मध्ये ठेवले जातात जवळजवळ 15 आंतरराष्ट्रीय संस्था (एशियन डेव्हलपमेंट बँक, आफ्रिकन डेव्हलपमेंट फंड इत्यादी) SDR चा हिशेबाचे युनिट म्हणून उपयोग करतात. SDR मध्ये व्यक्त केलेल्या ठेवी स्वीकारण्यासही काही संस्थांनी सुरुवात केली आहे. शिवाय जून 1984 पर्यंत नाणेनिधीच्या 11 सभासद देशांनी आपले चलन SDR शी कीलित (pegged) केले होते. SDR चे मूल्य तुलनात्मकदृष्ट्या स्थिर असल्याने मूल्य–स्थैर्यासाठी या देशांनी आपली चलने SDR कीलित (pegged to SDR) केली आहेत.

## SDR चा उपयोग–एक उदाहरण

समजा 'अ' हा देश SDR योजनेत सहभागी आहे 'अ'ला आपल्या चलनाचा विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी चलन-बाजारात हस्तक्षेप करावयाचा आहे तर तो देश या कामासाठी SDR चा उपयोग करण्याचा इरादा नाणेनिधीला कळवतो. त्यानंतर कोणत्या देशाचे चलन या कामी उपयोगात येऊ शकेल त्यासंबंधी माहिती नाणेनिधीकडून 'अ' देशाला दिली जाते. त्यानंतर 'अ' देश आपल्याला हव्या असलेल्या चलनाचा निर्देश करतो. उदा. 'अ' देशाला 50 दशलक्ष SDR या किंमतीचे मार्क (DM) हे जर्मन चलन चालू विनिमयदराने हवे आहे असे आपण मानू. या परिस्थितीत 'अ' देशाच्या नाणेनिधीकडील SDR खात्यात 50 दशलक्ष नावे टाकले जातील (Debit) तर जर्मनच्या SDR खात्यात 50 दशलक्ष SDR जमा केले जातील. पुढे जेव्हा 'अ' देशाकडे विदेशी व्यापारातील वाढाव्यातून विदेशी चलनाचा साठा वाढत जाईल त्या वेळी पात्र (eiglble) विदेशी चलनाच्या बदल्यात नाणेनिधीकडून SDR खरेदी करता येतील.

वरील तऱ्हेच्या SDR व्यवहाराला निर्दिष्ट व्यवहार (transactions with designation) असे म्हणतात. यात नाणेनिधीकडून ज्या देशाच्या ताळेबंदाची स्थिती चांगली आहे अशा देशाचा निर्देश केला जातो. असा निर्दिष्ट देश SDR च्या बदल्यात आपले चलन पुरविण्यास बांधील असतो अर्थात त्या देशाच्या वाट्याला आलेल्या SDR च्या राशीच्या दुपटीपर्यंत इतर देशांकडून SDR स्वीकारायला तो बांधील असतो. त्या मर्यादेपलीकडे तो देश खुशीने SDR स्वीकारू शकतो.

एखादा देश दुसऱ्या देशाशी परस्पर संमतीने SDR च्या बदल्यात त्या देशाचे चलन मिळवू शकतो त्याला SDR चा संमतीपूर्वक व्यवहार (transactions by agreement) असे म्हणतात. अशा प्रकारे SDR चा व्यवहार निर्दिष्ट व्यवहार पद्धतीनुसार किंवा संमतीपूर्वक व्यवहारपद्धतीनुसार होतो.

## SDR वरील व्याज–

सभासद देशाला मिळालेल्या SDR च्या वाट्यावर (allocation) द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा दर आणि त्याने धारण केलेल्या SDR च्या धारणावर किंवा साठ्यावर (holding) मिळणारा व्याजदर एकच असतो. उदाहरणार्थ एखाद्या देशाचा SDR चा साठा (holding) त्याला मिळालेल्या वाट्यापेक्षा (allocation) जास्त असेल तर त्यामधील फरकाच्या राशीवर त्यास निव्वळ व्याज (net interest) मिळेल आणि वाट्यापेक्षा साठा कमी असेल तर त्या देशाला त्यामधील फरकाच्या राशीवर निव्वळ व्याज द्यावे लागेल. एखाद्या देशाचा वाटा आणि साठा यांची राशी एकच असेल तर त्याला मिळणारे आणि त्याला द्यावे लागणारे व्याज सारखेच असेल. एखाद्या देशाने आपल्या वाट्याच्या SDR चा उपयोग केला असल्यास त्या देशाच्या SDR खात्यावर जमा होईल. दर तिमाहीला असे व्याज सभासद देशाच्या SDR खात्यावर नावे पडते किंवा जमा होते.

सुरुवातीला SDR वरील व्याजदर अगदीच अल्प म्हणजे 1·5 टक्के होता. तो 1975 साली 5 टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला. 1981 पासून SDR च्या मूल्यनिर्धारणासाठी ज्यांची चलने निश्चित केली आहेत अशा पाच देशांच्या देशीय पैसा बाजारातील व्याजदरांच्या सरासरीएवढा असतो. अर्थात चलन समुच्चयातील त्या त्या चलनाच्या प्रमाणानुसार वरील सरासरी व्याजदर भारित (weighted) असतो. हे लक्षात ठेवले पाहिजे. हा दर, दर आठवड्याला मागील शुक्रवारी असलेल्या बाजार दराच्या आधारावर, ठरविला जातो.

प्रतिवर्षी 30 एप्रिल रोजी SDR योजनेत सहभागी असणाऱ्या देशांवर त्यांच्या SDR च्या निव्वळ संचयी साठ्यावर एक प्रकारचा कर (assessment) आकारला जातो. त्याच्या वसुलीतून नाणेनिधीच्या एस. डी. आर. खात्याचा खर्च भागवला जातो. हा कर अर्थात अत्यल्प असतो. 1984 साली (30 एप्रिल, 1984) SDR च्या निव्वळ संचयी साठ्यावर 0·0139997 टक्के इतका आकार घेण्यात आला होता.

## SDR चा वाढता उपयोग

आज मितीस SDR चा उपयोग विविध कारणांसाठी आणि वाढत्या प्रमाणावर होत आहे. SDR मधील व्यवहार खालील संबंधी होतात :

(1) सभासदांनी नाणेनिधीकडून आहरण अधिकाराखाली आपले चलन देऊन इच्छित विदेशी चलन खरेदी केलेले असते. आपल्या चलनाच्या परतखरेदीसाठी व खरेदीवरील शुल्कासाठी (charges), कोट्याची वर्गणी भरण्यासाठी नाणेनिधीकडे सामान्य साधनसंपत्ती खात्याकडे (General Resources Account) SDR हस्तांतरित केले जातात.

(2) इच्छित विदेशी चलनाच्या खरेदीसाठी निर्दिष्ट व्यवहार व्यवस्थेतून किंवा पूर्वसंमतीने SDR चे सभासदांमध्ये हस्तांतरण होते.

(3) नाणेनिधीने सभासदांकडून घेतलेल्या कर्जाचे मुद्दल व त्यावरील व्याजाची परतफेड या कारणांसाठी नाणेनिधी सभासदांकडे SDR चे हस्तांतरण करत असतो.

1970 पासून 1985 पर्यंत SDR च्या हस्तांतरणासंबंधी माहिती (तक्ता क्र. 8) दिली आहे. SDR च्या निरनिराळ्या कारणाने झालेल्या हस्तांतरणाचे परिमाण वाढत असल्याचे त्यावरून स्पष्ट दिसते. एकूण हस्तांतरणे 1970-75 या कालावधीत सरासरी SDR 1 अब्ज इतकी होती. 1982 आणि 1985 या वर्षात सरासरी SDR 16 अब्ज इतकी वाढल्याचे दिसते.

## SDR चे मूल्य निर्धारण

SDR च्या निर्मितीच्या वेळी (1968) त्याचे मूल्य एका अमेरिकी डॉलरइतके ठेवण्यात आले होते. त्यांचे सुवर्णातील मूल्यही डॉलरच्या मूल्याइतके म्हणजे 0.88867088 ग्रॅम सोन्याइतके होते. म्हणजे SDR चा इतर चलनातील विनिमयदरही डॉलरच्या त्या त्या चलनातील विनिमयदराइतका होतो. उदाहरणार्थ आंतरराष्ट्रीय बाजारात 1 जर्मन मार्क (DM) = $ 0.25 असेल, तर 1 जर्मन मार्क (DM) = $SDR^{0.25}$ असे मूल्य निर्धारित होते. परंतु 1971 मध्ये ज्या वेळी डॉलरचा सुवर्णाशी संबंध तोडण्यात आला, त्या वेळी डॉलरचा सोन्यातील व अनेक विदेशी चलनातील विनिमयदर बदलला. शिवाय त्यानंतर आंतरराष्ट्रीय पैसाविषयक व्यवस्थेतून डॉलरचे स्थान (वर्चस्व) कमी करण्याच्या उद्देशाने 1 जुलै 1974 पासून SDR चे मूल्य 16* मुख्य चलनांच्या समुच्चयाशी (Basket of Currencies) जोडण्यात आले. SDR च्या मूल्याचा आता सोन्याशी काही संबंध नाही. 1968-72 या काळात ज्यांच्या व्यापाराचा हिस्सा जागतिक व्यापाराच्या किमान एक टक्का होता अशा देशांच्या चलनांची निवड चलन समुच्चयासाठी (Currency-basket) करण्यात आली. असे 16 देश होते. 1978 साली SDR च्या मूल्य निर्धारणासाठी मानलेल्या चलन-समुच्चयामधून (Currency-basket) दक्षिण आफ्रिका व डेन्मार्क यांची चलने वगळून त्याऐवजी सौदी अरेबिया व इराण यांच्या चलनांचा समावेश करण्यात आला. 1 जानेवारी 1981 पासून मात्र पाच मुख्य चलनांचा चलन समुच्चय SDR च्या मूल्यनिर्धारणासाठी व त्याचबरोबर SDR च्या व्याजनिर्धारणासाठी घेण्याचे ठरले. 1975 ते 1979 या

**तक्ता क्र. 8 SDR हस्तांतरणासंबंधी माहिती (वार्षिक सरासरी, आकडे अब्ज SDR चे)**

| | 1970–75 | 1976–78 | 1979–81 | 1982–84 | 1985 |
|---|---|---|---|---|---|
| सहभागी देश आणि अधिकृत धारकांमध्ये हस्तांतरण त्यापैकी | 661 | 1,475 | 2,151 | 5,808 | 5,026 |
| i) निर्दिष्ट व्यवहार | 261 | 446 | 1,458 | 2,638 | 1,950 |
| ii) पूर्वसंमतीने झालेला व्यवहार | 377 | 960 | 520 | 2,225 | 2,591 |
| सहभागी देशांकडून सामान्य साधनसंपत्ती खात्याकडे हस्तांतरण | 296 | 1,381 | 3,406 | 5,186 | 4,502 |
| सामान्य साधनसंपत्ती खात्याकडून सहभागी सभासदांकडे आणि विहित धारकांकडे हस्तांतरण | 204 | 1,163 | 2,135 | 5,206 | 6,391 |
| एकूण हस्तांतरणे | 1,161 | 4,019 | 7,692 | 16,200 | 15,919 |

संदर्भ : आंतरराष्ट्रीय नाणेनिधी.

* डॉलर (अमेरिका), मार्क (पश्चिम जर्मनी), स्टर्लिंग पाऊंड (ग्रेटब्रिटन), फ्रँक (फ्रान्स), येन (जपान), डॉलर (कॅनडा) लिरा (इटली), गिल्डर (नेदरलँड), फ्रँक (बेल्जियम), क्रोना (स्वीडन), शिलिंग (ऑस्ट्रिया), डॉलर (ऑस्ट्रेलिया), क्रोन (डेन्मार्क) क्रोन नॉर्वे), पेसेता (स्पेन), रँड (दक्षिण आफ्रिका),

कालावधीतील जागतिक व्यापारातील वस्तू व सेवांच्या निर्यातीत ज्यांचा सर्वात जास्त वाटा आहे अशा नाणेनिधीच्या पहिल्या पाच सभासदराष्ट्रांच्या चलनाचा चलन समुच्चयामध्येसमावेश करण्यात आला. ती पाचचलने अशी : डॉलर (अमेरिका) $; डॉईश मार्क (पश्चिम जर्मनी) DM; फ्रॅंक (फ्रान्स) FF; येन (जपान) Y, पाऊंड (ग्रेटब्रिटन) £.

असेही ठरविण्यात आले आहे की 1 जानेवारी 1986 पासून दर पाच वर्षांनी चलन समुच्चयाची पुनर्रचना करण्यात येईल. अशी पुनर्रचना ज्या तारखेपासून करावयाची त्या आधीच्या 12 महिन्यापूर्वी 5 वर्षात ज्या देशांची वस्तू व सेवा यांची निर्यात सर्वाधिक असेल अशा पाच देशांच्या चलनांचा त्यामध्ये समावेश करण्यात येईल. उदाहरणार्थ 1 जानेवारी 1986 ला झालेल्या पुनर्रचनेसाठी 1980–84 या 5 वर्षांच्या काळात झालेल्या वस्तू व सेवा यांच्या निर्यातीचा विचार करण्यात झाला.

नाणेनिधीतर्फे SDR चे डॉलरमधील मूल्य रोजच्या रोज जाहीर करण्यात येते. याचा अर्थ इतकाच की आंतरराष्ट्रीय व्यवहारात डॉलरचे महत्त्व असल्याने SDR चे मूल्य डॉलर-मध्ये व्यक्त केले जाते. पण या ठिकाणी SDR चे मूल्य केवळ डॉलरच्या मूल्यावर अवलंबून नाही तर ते महत्त्वाच्या पाच चलनांशी निगडित आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

**SDR च्या मूल्यनिर्धारणाची पद्धत : एक उदाहरण**

चलन समुच्चयामधील चलनांचा भार (weight) 1975–79 या पाच वर्षांच्या कालावधीत ते चलन ज्या देशाचे चलन आहे, त्या देशाच्या वस्तू व सेवा यांच्या निर्यात व्यापाराचे मूल्य आणि नाणेनिधीच्या सभासदांनी अधिकृतपणे त्या चलनाची धारण केलेली राशी यावर अवलंबून असतो.

सुरुवातीला समुच्चयामधील चलनांना खालील भार देण्यात आले होते. अमेरिकन डॉलर 46%, डॉईश मार्क 19%, फ्रेंच फ्रॅंक 13%, जपानी येन 13%. ब्रिटीश पाऊंड 13%, 31 डिसेंबर, 1980 रोजी संपणाऱ्या मागील तीन महिन्यांच्या लंडन बाजारातील विनिमयदरांची सरासरी काढून त्यावरून चलन समुच्चयामधील प्रत्येक चलनाची युनिटे ठरविण्यात आली. ही युनिटे ठरवितांना प्रत्येक चलनाचे जुन्या सोळा चलनांच्या बास्केट-पद्धतीतील SDR मधील जे मूल्य होते ते 31 डिसेंबर, 1980 रोजी नव्या बास्केटमध्ये तसेच राहील याची काळजी घेण्यात आली होती.

SDR चे डॉलरमधील मूल्य कसे काढले जाते ते खालील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

वरील विविध चलनांचे डॉलरमधील मूल्य काढून त्यांची बेरीज केली असता SDR चे डॉलरमधील मूल्य मिळेल. त्यासाठी आपणास प्रत्येक चलनाचा विदेशी चलन बाजारातील विनिमयदर माहीत हवा. स्तंभ (3) मध्ये 30 एप्रिल, 1981 चा लंडन बाजारातील एका डॉलरचा विविध चलनातील विनिमयदर दिलेला आहे. उदाहरणार्थ :– $1 = DM 2.2145 असा दर दिला आहे. परंतु आपणास DM 0.46 चे डॉलर सममूल्य हवे आहे, कारण एका SDR मध्ये मार्कची राशी 0.46 एवढी आहे.

एस्. डी. आर. चे मूल्यनिर्धारण, एप्रिल 30; 1981

| चलन | चलनाची समुच्चयातील राशी (युनिटे) | लंडन बाजारातील डॉलरचा विनिमय-दर | डॉलरमधील सममूल्य |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| डॉलर, $ | 0·54 | $ 1 = $ 1 | $ 0·540000 |
| मार्क, DM | 0·46 | $ 1 = DM 2·2145 | $ 0·207722 |
| फ्रॅंक, FF | 0·74 | $ 1 = FF 5·2540 | $ 0·140845 |
| येन Y | 34·00 | $ 1 = Y 215·13 | $ 0·158044 |
| पाऊंड, £ | 0·071 | $ 1 = £ 0·4672036 | $ 0·151968 |
| | | | $ 1·198579 |

∴ SDR चे डॉलरमधील मूल्य SDR 1 = $ 1·198579.

∴ $1 = SDR 0·834321.

स्तंभ (2) वरून एका SDR मध्ये कोणत्या चलनाची किती युनिटे असतात, ते कळते जसे :

SDR 1 = $ 0·54 + DM 0·46 + FF 0.74 + Y 34 + £ 0·071.

$\therefore$ DM 2.2145 = \$ 1 (स्तंभ 2 वरून)

$\therefore$ DM 0.46 = \$ 0.207722

तसेच आपणाला FF 0.74 चे डॉलरमधील मूल्य हवे आहे.

$\because$ FF 5.2540 = \$ 1

$\therefore$ FF 0.74 = \$ 0.140845

त्याप्रमाणे येन व पाऊंडाचे डॉलरमधील मूल्य स्तंभ (2) मधील माहितीवरून काढता येईल. स्तंभ (4) मध्ये ते दाखविले आहे. त्यावरून SDR चा डॉलरमधील विनिमयदर असा काढता येतो.

SDR 1 = \$ 0.54 + DM 0.46 + FF 0.74
+ Y 34 + £ 0.071
= \$ 0.540000 + \$ 0.207722
+ \$ 0.140845 + \$ 0.158044
+ \$ 0.151968
= 1.198579

$\therefore$ SDR 1 = \$ 1.198579

$\therefore$ \$ 1 = SDR 0.834321

याच पद्धतीने SDR चे कोणत्याही चलनातील मूल्य काढता येते. नव्या चलन समुच्चयामध्ये पूर्वीच्या सोळाऐवजी आता पाच चलनेच आहेत. त्यामुळे SDR चे मूल्यनिर्धारण सुलभ झाले आहे. या पाच चलनांच्या रोजच्या विनिमय-दरावरून SDR चा डॉलरमधील रोजचा विनिमयदर काढून तो नाणेनिधीतर्फे प्रसिद्ध केला जातो.

SDR च्या रूपाने पैशाच्या इतिहासात माणसाने प्रथमच आंतरराष्ट्रीय सहकार्याने, जरूर पडेल तेव्हा आणि जरूर असेल तेवढी राखीव मत्ता निर्माण करण्याचा यशस्वी प्रयोग केलेला आहे. आज त्याचे कार्य मर्यादित दिसते पण भावी काळात त्याचे महत्त्व वाढतच जाणार आहे. आजच्या परिस्थितीतील राखीव मत्तेची निकडीची गरज भागविण्यात SDR चे स्थान निर्विवाद आहे. पण SDR वाटपाबद्दल आणि केवळ ताळेबंदातील तुटी संबंधातील उपयोगाबद्दल असमाधान आहे. विकसनशील देशांना SDR मध्ये अधिक वाटा मिळावा म्हणून वाटपाचा पाया बदलावा. आज SDR चे वाटप सभासदांमध्ये कोट्याच्या प्रमाणात होते व त्यामुळे अल्प कोटा–धारकांना अल्प वाटा मिळतो व उच्च कोटा धारकांना अधिक वाटा मिळतो हे आपण आधी पाहिलेच आहे. शिवाय SDR चा उपयोग विकासासाठी वित्तपुरवठा करण्याचे साधन म्हणून व्हावा असा विचार पुढे मांडला जात आहे. म्हणजेच SDR ची विकासासाठी वित्तपुरवठ्याशी सांगड (LINK) घालावी असा युक्तिवाद करण्यात येत आहे. त्यासंबंधी अनेक योजनाही सुचविण्यात आल्या आहेत. त्यासंबंधीची चर्चा पुढील एका लेखात करण्यात येईल.

## परिशिष्ट 1

### सूची 'अ' सभासद

नाणेनिधीचे मूळ (Original) सभासद

| सभासददेश | कोटा | सभासद देश | कोटा |
|---|---|---|---|
| (आकडे दशलक्ष अमेरिकन डॉलरचे) | | | |
| ऑस्ट्रेलिया | 200 | इराक | 8 |
| बेल्जियम | 225 | लायबेरिया | 0.5 |
| बेलिव्हिया | 10 | लक्झेंबर्ग | 10 |
| ब्राझिल | 150 | मेक्सिको | 90 |
| कॅनडा | 300 | नेदरलँड्स् | 275 |
| चिली | 50 | न्यूझीलंड | 50 |
| चीन | 550 | निकाराग्वा | 2 |
| कोलंबिया | 50 | नॉर्वे | 50 |
| कोस्टारिका | 5 | पनामा | 0.5 |
| क्युबा | 50 | पराग्वे | 2 |
| झेकोस्लोव्हाकिया | 125 | पेरू | 25 |
| डेन्मार्क* | * | फिलिप्पीन कॉमनवेल्थ | 15 |
| डोमिनिकन रिपब्लिक | 5 | पोलंड | 125 |
| इक्वेडॉर | 5 | युनियन ऑफ साउथ आफ्रिका | 100 |
| इजिप्त | 45 | यू.एस.एस.आर | 1200 |
| एल् सॅल्व्हेडॉर | 2.5 | इंग्लंड | 1300 |
| इथिओपिया | 6 | युनायटेड स्टेट्स् | 2750 |
| फ्रान्स | 450 | उरुग्वे | 15 |
| ग्रीस | 40 | व्हेनेझुवेला | 15 |
| ग्वाटेमाला | 5 | युगोस्लाविया | 60 |
| हाइती | 5 | होंडुरास | 2.5 |
| आइसलँड | 1.0 | इंडिया | 400 |
| इराण | 25 | | |

[* डेन्मार्कचा कोटा तेथील सरकारने नाणे निधीच्या करारावर सही करण्याची तयारी दाखविल्यावर पण सही करण्यापूर्वी ठरवावयाचा होता.]

## परिशिष्ट 2

### आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सभासद राष्ट्रांचा कोटा (दशलक्ष SDR मध्ये)

### आठव्या सर्वसाधारण आढाव्यानुसार (1983)

| अनुक्रम | सभासद राष्ट्राचे नाव | कोटा | एकूण कोटयाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | अफगाणिस्तान | 86.7 | 0.096 |
| 2. | अल्जिरिया | 623.1 | 0.692 |
| 3. | अँटिक्वा आणि बार्बुडा | 5.0 | 0.006 |
| 4. | अर्जेंटिना | 1,113.0 | 1.236 |
| 5. | ऑस्ट्रेलिया | 1 619.2 | 1.798 |
| 6. | ऑस्ट्रिया | 775.6 | 0.861 |
| 7. | बहामाज | 66.4 | 0.074 |
| 8. | बहारिन | 48.9 | 0.054 |
| 9. | बांगला देश | 287.5 | 0.319 |
| 10. | बार्बाडोस | 34.1 | 0.038 |
| 11. | बेल्जियम | 2,080.4 | 2.311 |
| 12. | बेलिझे | 9.5 | 0.011 |
| 13. | बेनिन | 31.3 | 0.035 |
| 14. | भूतान | 2.5 | 0.003 |
| 15. | बोलिव्हिया | 90.7 | 0.101 |
| 16. | बोटस्वाना | 22.1 | 0.025 |
| 17. | ब्राझिल | 1,461.3 | 1.623 |
| 18. | बर्मा | 137.0 | 0.152 |
| 19. | बुरुंडी | 42.7 | 0.047 |
| 20. | कामेरुन | 92.7 | 0.103 |
| 21. | कॅनडा | 2,941.0 | 3.267 |
| 22. | केप वेर्दे | 4.5 | 0.005 |
| 23. | सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक | 30.4 | 0.034 |
| 24. | छाड | 30.6 | 0.034 |
| 25. | चिली | 440.5 | 0.489 |
| 26. | चायना | 2,390.9 | 2.656 |
| 27. | कोलंबिया | 394.2 | 0.438 |
| 28. | कोमोरोस | 4.5 | 0.005 |
| 29. | काँगो | 37.3 | 0.041 |
| 30. | कोस्टा रिका | 84.1 | 0.093 |
| 31. | सायप्रस | 69.7 | 0.077 |
| 32. | डेन्मार्क | 711.0 | 0.790 |
| 33. | जिबुती | 8.0 | 0.009 |
| 34. | डोमिनिका | 4.0 | 0.004 |
| 35. | डोमिनिकन रिपब्लिक | 112.1 | 0.125 |
| 36. | इक्वेडोर | 150.7 | 0.167 |
| 37. | इजिप्त | 463.4 | 0.515 |
| 38. | एल् साल्व्हाडोर | 89.0 | 0.099 |
| 39. | इक्वेटोरियल गिनी | 18.4 | 0.020 |
| 40. | इथियोपिया | 70.6 | 0.078 |
| 41. | फिजी | 36.5 | 0.041 |
| 42. | फिन्लँड | 574.9 | 0.639 |
| 43. | फ्रान्स | 4,482.8 | 4.979 |
| 44. | गबोन | 73.1 | 0.081 |
| 45. | गांबिया | 17.1 | 0.019 |
| 46. | पश्चिम जर्मनी | 5,403.7 | 6.002 |
| 47. | घाना | 204.5 | 0.227 |
| 48. | ग्रीस | 399.9 | 0.444 |
| 49. | ग्रेनाडा | 6.0 | 0 007 |
| 50. | ग्वाटेमाला | 108.0 | 0.120 |
| 51 | गिनी | 57.9 | 0.064 |
| 52. | गिनी–बिसाऊ | 7.5 | 0.008 |
| 53. | गुयाना | 49.2 | 0.055 |
| 54. | हैती | 44.1 | 0.049 |
| 55. | होंडुरास | 67.8 | 0.075 |
| 56. | हंगेरी | 530.7 | 0.589 |
| 57. | आईस्लँड | 59.6 | 0.066 |
| 58. | इंडिया (भारत) | 2,207.7 | 2.452 |
| 59. | इंडोनेशिया | 1,009.7 | 1.121 |
| 60. | इराण | 1,117.4 | 1.241 |
| 61. | इराक | 504.0 | 0.560 |
| 62. | आयर्लंड | 343.4 | 0.381 |
| 63. | इस्राईल | 446.6 | 0.496 |
| 64. | इटली | 2,909.1 | 3.231 |
| 65. | आयव्हरी कोस्ट | 165.5 | 0.184 |
| 66. | जमेका | 145.5 | 0.162 |
| 67. | जपान | 4,223.3 | 4.691 |

| | | |
|---|---|---|
| 68. जॉर्डन | 73.9 | 0.082 |
| 69. कांपुचिया | 25.0 | 0.028 |
| 70. केनिया | 142.0 | 0.158 |
| 71. कोरिया | 462.8 | 0.514 |
| 72. कुवेत | 635.3 | 0.706 |
| 73. लाओस | 29.3 | 0.033 |
| 74. लेबनॉन | 78.7 | 0.087 |
| 75. लोसोथो | 15.1 | 0.017 |
| 76. लायबेरिया | 71.3 | 0.162 |
| 77. लिबिया | 515.7 | 4.691 |
| 78. लक्झेंबर्ग | 77.0 | 0.082 |
| 79. मादागास्कर | 66.4 | 0.028 |
| 80. मालावी | 37.2 | 0.158 |
| 81. मलेशिया | 550.6 | 0.514 |
| 82. मालदीव्हज् | 2.0 | 0.706 |
| 83. माली | 50 8 | 0.033 |
| 84. माल्टा | 45.1 | 0.087 |
| 85. मॉरिटानिया | 33.9 | 0.017 |
| 86. मॉरिशस | 53.6 | 0.079 |
| 87. मेक्सिको | 1,165.5 | 0.573 |
| 88. मोरोक्को | 306.6 | 0.086 |
| 89. नेपाळ | 37.3 | 0.074 |
| 90. नेदरलँडस् | 2,264.8 | 0.041 |
| 91. न्यूझीलंड | 461.6 | 0.612 |
| 92. निकाराग्वा | 68.2 | 0.002 |
| 93. निगेर | 33.7 | 0.056 |
| 94. नायजेरिया | 849.5 | 0.050 |
| 95. नॉर्वे | 699.0 | 0.038 |
| 96. ओमान | 63.1 | 0.060 |
| 97. पाकिस्तान | 546.3 | 1.294 |
| 98. पनामा | 102.2 | 0.341 |
| 99. पापुआ न्यू गिनी | 65.9 | 0.041 |
| 100. पराग्वे | 48.4 | 2.515 |
| 101. पेरु | 330.9 | 0.368 |
| 102. फिलीपाईन्स | 440.4 | 0.489 |
| 103. पोर्तुगाल | 376.6 | 0.418 |
| 104. कतार | 114.9 | 0.128 |
| 105. रुमानिया | 523.4 | 0.581 |
| 106. रुआंडा | 43.8 | 0.049 |
| 107. सेंट लुसिया | 7.5 | 0.008 |
| 108. सेंट व्हिन्सेंट | 4.0 | 0.004 |
| 109. साओ तोमे अँड प्रिंसिपे | 4.0 | 0.004 |
| 110. सौदी अरेबिया | 3,202.4 | 3.557 |
| 111. सेनेगल | 85.1 | 0.095 |
| 112. सेचेलस | 3.0 | 0.003 |
| 113. सिअेरा लिओन | 57.9 | 0.064 |
| 114. सिंगापूर | 250.2 | 0.278 |
| 115. सोलोमन आयलंडस | 5.0 | 0.006 |
| 116. सोमालिया | 44.2 | 0.049 |
| 117. दक्षिण आफ्रिका | 915.7 | 1.017 |
| 118. स्पेन | 1,286.0 | 1.428 |
| 119. श्रीलंका | 223.1 | 0.248 |
| 120 सुदान | 169.7 | 0.188 |
| 121. सुरिनाम | 49.3 | 0.055 |
| 122. स्वाझिलँड | 24.7 | 0.027 |
| 123. स्वीडन | 1,064.3 | 1.182 |
| 124. सिरिया | 139.1 | 0.154 |
| 125. टांझानिया | 107.0 | 0.119 |
| 126 थायलंड | 386.6 | 0.429 |
| 127. टोगो | 38.4 | 0.043 |
| 128. त्रिनिदाद व टोबॅगो | 170.1 | 0.189 |
| 129. ट्युनिशिया | 138.2 | 0.153 |
| 130. तुर्कस्तान | 429.1 | 0.477 |
| 131. युगांडा | 99.6 | 0.111 |
| 132. युनायटेड अरब एमिरेटस | 385.9 | 0.429 |
| 133. इंग्लंड (युनायटेट किंगडम) | 6,194.0 | 6.880 |
| 134. अमेरिका (युनायटेड स्टेटस्) | 17,918.3 | 19.902 |
| 135. अप्पर व्होल्टा | 31.6 | 0.035 |
| 136. उरुग्वे | 163.8 | 0.182 |
| 137. वानुआतु | 9.0 | 0.010 |
| 138. व्हेनेझुएला | 1,371.5 | 1.523 |
| 139. व्हिएतनाम | 176.8 | 0.196 |
| 140. पश्चिम सामोआ | 6.0 | 0.007 |
| 141. येमेन अरब रिपब्लिक | 43.3 | 0.048 |
| 142. येमेन पीपल्स डेमोक्रॅटिक रिपब्लिक | 77.2 | 0.086 |
| 143. युगोस्लाव्हिया | 613.0 | 0.681 |
| 144. झायरे | 291.0 | 0.323 |
| 145. झांबिया | 270.3 | 0.300 |
| 146. झिंबाब्वे | 191.0 | 0.212 |

संदर्भ : नाणेनिधी, वार्षिक अहवाल 1986

## परिशिष्ट 3

नाणेनिधीच्या वित्तविषयक सुविधा व सशर्तता (Conditionality)

| सुविधा | शर्ती |
|---|---|
| **राखीव प्रभाग** | आंतरराष्ट्रीय व्यवहारातील ताळेबंदातील असंतुलनातून निर्माण झालेली गरज. |
| **प्रत प्रभाग** | |
| (i) पहिला प्रत विभाग | ताळेबंदातील असंतुलन दूर करण्यासाठी संयुक्तिक प्रयत्न करीत असल्याचा प्रत्यक्ष कार्यक्रम |
| (ii) उच्चतर प्रभाग | ताळेबंदातील असंतुलन दूर करण्याचा प्रत्यक्ष कार्यक्रमाद्वारे प्रयत्न करीत असल्याचे गरजू देशाकडून भरीव समर्थन. |
| | निधीची मदत राखीव व्यवस्था म्हणून व हप्त्याहप्त्याने मिळते. |
| **विस्तारित सुविधा** (स्थापना 1974) | अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक कमकुवतपणा दुरुस्त करण्यासाठी तीन वर्षापर्यंतचे मध्यम–मुदती कार्यक्रम धोरणासंबंधी आणि प्रत्यक्ष आणल्या जाणाऱ्या पावलासंबंधी तपशील- वार निवेदन. |
| | या सुविधेखालील मदतीसाठी प्रत्यक्ष कृती करीत असल्याचा पुरावा द्यावा लागतो. |
| प्रतिपूरक वित्तव्यवस्था सुविधा (स्थापना 1973) | देशाच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे निर्यातीत हंगामी स्वरूपाची घट येत असल्याचे सिद्ध करावे लागते. |
| | या सुविधेखालील पाहिजे असलेली मदत कोट्याच्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास नाणेनिधीशी प्रश्न सोडविण्याच्या प्रक्रियेत सभासदांकडून सहकाराचे आश्वासन अपेक्षित आहे. |
| भावस्थिरक राखीव साठा वित्तव्यवस्था सुविधा (स्थापना 1969) | नाणेनिधीने मान्य केलेल्या आंतरराष्ट्रीय भावस्थिरक साठ्याची योजना असली पाहिजे. नाणेनिधीशी प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत सभासदाकडून सहकार्याची अपेक्षा. |
| पूरक वित्तव्यवस्था सुविधा/वाढीव सवलत देण्याचे धोरण | मदत हप्त्याहप्त्याने. प्रत्यक्ष कृतीची योजना करीत असल्याचा पुरावा व त्यासंबंधीच्या कसोटीस उतरण्याची आवश्यकता. |

संदर्भ : IMF Surveys, मे आणि जून 1981.

■ ■

# महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या उत्पादन क्षमतेचा वापर

सु. दा. तुपे*

साखर उद्योग हा भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा उद्योग आहे. साखर उद्योगाच्या आदान आणि प्रदानाच्या बाजूने अनेक दुवा परिणाम ( linkage effects) दिसून येतात. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी साखर उद्योगाचा फार मोठा उपयोग करून घेता येतो. या दृष्टिकोनातून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात साखर उद्योगाला महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. आता तर ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासासाठी सहकारी साखर कारखाना आर्थिक विकासाचे केंद्र म्हणून समजण्यात येऊ लागले आहे. साखर उद्योग असा एकमेव उद्योग आहे की, जो शहरामध्ये स्थापन करता येत नाही, केवळ ग्रामीण भागातच हा उद्योग स्थापन करावा लागतो, त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेशी या उद्योगाचा अगदी जवळून संबंध येतो म्हणून साखर कारखाने ग्रामीण भागाच्या सामाजिक आणि आर्थिक बदलाचे प्रभावी साधन म्हणून काम करू शकतात.

भारतातील साखर उद्योग हा श्रमप्रधान उद्योगापैकी एक आहे त्यामुळे एखाद्या भागात साखर कारखाना स्थापन केला असता त्या भागातील लोकांना रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकते. याबाबत उदाहरण द्यायचे झाल्यास 1200 ते 2000 मेट्रिक टन दैनिक गाळप क्षमता असलेल्या कारखान्यामधून 900 ते 950 कामगारांना कारखान्यातच काम मिळू शकते. या कारखान्यास ऊसपुरवठा वेळेत आणि लवकर करता यावा म्हणून हंगामात ऊस तोड करणारा कामगार मोठ्या प्रमाणात कामाला घ्यावा लागतो. त्यामुळे 3500 ते 4000 मजुरांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. याशिवाय उसाच्या वाहतुकीसाठी साधारणपणे 500 ते 600 बैलगाड्या, 35 ते 40 ट्रक व तेवढेच ट्रॅक्टर

*प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

कामावर घ्यावे लागतात. एकंदरीत एका साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे साधारणत: 4500 ते 5500 मजुरांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. याशिवाय एखाद्या भागात साखर कारखाना स्थापन झाल्यामुळे तेथील जमीन उसाच्या लागवडी-खाली आणली जाते व त्यामुळे शेतमजुरांना 22 टक्के अधिक दिवस काम मिळू शकते[1] त्यामुळे त्या भागातील छुप्या बेकारीचे व अर्धबेकारीचे प्रमाण कमी करणे शक्य होते. व्याव-सायिकांचे व्यवसाय तेजीत चालू लागतात. एकंदरीत साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे शेतकरी शेतमजूर व व्यावसायिक या सर्वांच्या उत्पन्नात निश्चितपणे वाढ होते. लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली म्हणजे त्यांच्या राहणीमानात साहजिकपणे सुधारणा होते. अर्थात हे चित्र सर्व साखर कारखान्याच्या परिसरात आढळून येते असे नाही, तर जो साखर कारखाना अधिक चांगल्या प्रकारे चालतो तेथेच हे चित्र दिसून येते. मात्र आजारी कारखान्यांच्या परिसरात असा परिणाम जाणवत नाही. त्यामुळे असे म्हणता येईल की, केवळ कार्यक्षम साखर कारखानेच आपल्या परिसरातील अर्थव्यवस्थेला "जोराचा धक्का" ( Big push ) देऊन अर्थव्यवस्थेस गती प्राप्त करून देऊ शकतात. प्रत्येक साखर कारखान्याची कार्य-क्षमता त्यांची आर्थिक परिस्थिती, साखर उताऱ्याचे प्रमाण, तांत्रिक कार्यक्षमता, व्यवस्थापकीय धोरण आणि गाळप क्षमतेचा वापर (उत्पादन क्षमतेचा वापर) यावर अवलंबून असते. गुलाबराव पाटील कमिटीच्या मते 1983–84 मध्ये महा-राष्ट्रात 19 साखर कारखाने आजारी होते.[2] त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या गाळप क्षमतेचा वापर ऊस पुरवठ्याअभावी पुरेसा होऊ शकला नाही. मात्र आज महा-राष्ट्रामध्ये अनेक साखर कारखाने आजारी आहेत त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे गाळप क्षमतेचा अपुरा होणारा वापर हे होय. गेली तीन वर्षे महाराष्ट्रात सातत्याने दुष्काळ पडत असल्यामुळे उसाखालील क्षेत्र कमी झाले आहे. त्याचा परिणाम म्हणून उसाचा पुरवठा कमी झाला व त्यामुळे उत्पादन क्षमतेचा वापर पुरेपूर करून घेता आला नाही ही परिस्थिती केवळ महाराष्ट्रातच आढळून येत नाही तर भारतातील इतर घटक राज्यांमध्येही तिचा प्रत्यय येतो.

भारतातील साखर उद्योगाच्या गाळप क्षमतेचा वापर किती प्रमाणात केला जातो तसेच त्या संबंधीची कारणे कोणती आहेत हे समजावून घेण्याअगोदर भारतात व महाराष्ट्रात एकूण साखर कारखाने किती आहेत, त्यांची क्षेत्रवार विभागणी कशी आहे. भारताच्या आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत साखर उद्योगांचे स्थान कोणते आहे यांचा मागोवा घेतला आहे. तक्ता क्रमांक : 1 एकमध्ये निरनिराळ्या घटक राज्यात स्थापन करण्यात आलेल्या साखर कारखान्यांची क्षेत्रवार विभागणी केलेली आहे. 1986 अखेर भारतात एकूण 395 साखर कारखाने होते. त्यापैकी 369 साखर कारखाने प्रत्यक्षात उत्पादन करत होते. यापैकी 36 कारखान्याची उभारणी चालू होती, तसेच या एकूण साखर कारखान्यांपैकी 55.18 टक्के कारखाने सहकारी क्षेत्रात स्थापन करण्यात आलेले होते तर 33.42 टक्के कारखाने खाजगी क्षेत्रात कार्यरत होते. सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या साखर कारखान्याचे प्रमाण 11.40 टक्के इतके होते. भारतातील सर्व घटक राज्यापेक्षा उत्तर प्रदेशामध्ये उभारण्यात आलेले साखर कारखाने सर्वात जास्त आहेत. उत्तर प्रदेशामध्ये 1986 अखेर 105 साखर कारखाने होते. उत्तर प्रदेशानंतर महा-राष्ट्राचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात एकूण 102 साखर कारखाने होते व आज देखील ही संख्या तितकीच आहे. अलीकडे केंद्र सरकारने महाराष्ट्राला आणखी दोन कारखान्यांना परवानगी दिलेली आहे. त्यापैकी एक अमरावतीस व दुसरा जळगावला देण्यात आला आहे. तक्ता क्रमांक : 1 वरून एक महत्वाचा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे तो असा की, महाराष्ट्रातील 102 साखर कारखान्यापैकी 92 साखर कारखाने सहकारी क्षेत्रात व केवळ 10 कारखाने खाजगी क्षेत्रात आहेत. सहकारी क्षेत्रात सर्वात जास्त साखर कारखाने असलेले महाराष्ट्र हे एकमेव घटक राज्य आहे. यावरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची आपणास कल्पना येते. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात सर्वाधिक सहकारी साखर कारखाने असल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळीच धार आलेली आहे. याचे कारण म्हणज सहकारी साखर कारखान्यांनी महा राष्ट्रात एक नवीन राजकीय नेतृत्व निर्माण केले आहे व हे नेतृत्व गल्लीच्या राजकारणांपासून दिल्लीच्या राजकारणांपर्यंत प्रभाव पाडू शकते. थोडक्यात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत साखर कारखान्याचे अनन्यसाधारण महत्व आहे. तक्ता क्रमांक : 2 दोनवरून आपणास साखर उद्योगाचे भारताच्या व महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील स्थान स्पष्ट होते. या तक्त्या-वरून एकूण स्थापन करण्यात आलेले साखर कारखाने त्यात गुंतविलेले भांडवल, त्यातून झालेली रोजगार निर्मिती एकूण साखर उत्पादन व उपवस्तूंचे उत्पादन याची कल्पना येते. येते. या तक्त्यातील 1963 ते 1970 व 1981 या तिन्ही वर्षातील स्थापन करण्यात आलेल्या साखर कारखान्याचे प्रमाण व साखर उत्पादनाचे प्रमाण लक्षात घेता साखर कार-खान्याच्या प्रमाणापेक्षा साखर उत्पादनाचे प्रमाण महाराष्ट्रात अधिक आहे हे दिसून येते. 1970–71 मध्ये महाराष्ट्राने साखर उत्पादनाचा उच्चांक गाठून भारतात पहिला क्रमांक मिळविला.[3] 1981 मध्ये महाराष्ट्राने भारताच्या एकूण साखर उत्पादनापैकी 40.47 टक्के इतके उत्पादन केलेले होते. मात्र त्या वर्षी भारताच्या एकूण साखर कारखान्यां-

पैकी महाराष्ट्रात साखर कारखान्याचे प्रमाण 24.24 टक्के इतके होते.[4] साखर कारखान्याच्या प्रमाणापेक्षा साखर उत्पादनाचे प्रमाण महाराष्ट्रात जास्त का आहे याचे उत्तर आपणास तक्ता क्रमांक : 3 मधील आकडेवारीवरून स्पष्ट होते. तक्ता क्रमांक : 3 मध्ये भारतातील विविध घटक राज्यांमध्ये खाजगी, सार्वजनिक व सहकारी क्षेत्रात परवाना देण्यात आलेल्या उत्पादनक्षमतेचे प्रमाण स्पष्ट होते. तसेच परवाना देण्यात आलेल्या गाळप क्षमतेपैकी किती गाळपक्षमता उभारण्यात आलेली आहे याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. या तक्त्यातील आकडेवारीनुसार दोन महत्त्वाच्या गोष्टींचा खुलासा होतो. पहिला असा की, परवाना दिलेल्या एकूण गाळपक्षमतेपैकी सहकारी क्षेत्रात देण्यात आलेल्या गाळपक्षमतेचे प्रमाण सर्वाधिक आहे. मात्र खाजगी सार्वजनिक क्षेत्रातील गाळप क्षमतेचे प्रमाण कमी आहे. दुसरा मुद्दा असा की, या 18 घटक राज्यांपैकी उत्तर प्रदेशामध्ये साखर कारखान्याचे प्रमाण जरी जास्त असले तरी परवाना देण्यात आलेल्या गाळपक्षमतेचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक आहे व त्यामुळेच महाराष्ट्रात साखरेचे उत्पादन जास्त होते. तक्ता क्रमांक 4 वरून सहकारी, खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात उभारण्यात आलेल्या उत्पादन क्षमतेचा वापर किती प्रमाणात केला जातो हे दर्शविण्यात आलेले आहे. तसेच भारतामध्ये साखर उद्योगाची एकूण उत्पादन क्षमतेच्या होत असलेल्या वापराचे चित्रही यावरून स्पष्ट होते. या तक्त्यावरून प्रामुख्याने तीन गोष्टी स्पष्ट होतात. त्यापैकी पहिली गोष्ट अशी की, खाजगी व सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेने सहकारी क्षेत्रात गाळप क्षमतेचा वापर अधिक करण्यात येतो. दुसरे असे की, या तक्त्यात दिलेल्या 10 वर्षांपैकी 1977–78, 1981–82 व 1982–83 ही तीन वर्षे सोडली तर राहिलेल्या सात वर्षांत साखर उद्योगाला आपल्या गाळप क्षमतेचा वापर पूर्ण करता आला नाही. ही सात वर्षे सर्वसाधारण परिस्थितीची किंवा दुष्काळी परिस्थितीची असलेली आढळून येतात. थोडक्यात ज्या वर्षी पावसाचे प्रमाण चांगले होते त्याचवर्षी साखर उद्योगातील गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर झालेला आढळून येतो. याचाच अर्थ असा की, भारतातील साखर उद्योग पूर्णपणे मान्सून पावसाच्या दयेवर अवलंबून आहे.

साखर कारखान्याचे उत्पादन प्रामुख्याने दोन गोष्टींवर अवलंबून असते. एक म्हणजे उसातील साखरेच्या उताऱ्याचे प्रमाण आणि दुसरे म्हणजे उत्पादन क्षमतेचा करण्यात आलेला वापर. यापैकी साखरेच्या उताऱ्याचे प्रमाण प्रदेशानुरूप सामान्यत: स्थिर असते. फारच थोड्याशा प्रमाणात यात बदल होऊ शकतो. त्यामुळे साखर उत्पादनात बदल घडवून आणणारा खरा घटक म्हणजे उत्पादन क्षमतेचा वापर हा होय. उत्पादन क्षमतेचा वापर उसाच्या पुरवठ्यावर अवलंबून असतो. एखाद्या साखर कारखान्याच्या उत्पादन क्षमतेचा 100 टक्के वापर करण्यासाठी त्या कारखान्याच्या गळित हंगामात किमान 160 दिवस पुरेसा ऊस पुरवठा केला पाहिजे. ज्या कारखान्याला गळित हंगामात किमान 160 दिवस ऊस पुरवठा होऊ शकतो तोच कारखाना किफायतशीर ठरू शकतो, म्हणजे किफायतशीर साखर कारखाना ठरण्यासाठी त्याच्या उत्पादनक्षमतेचा 100 टक्के वापर होणे आवश्यक आहे व त्यासाठी त्यास किमान 160 दिवस ऊस पुरवठा होणे जरूरी आहे.[5] उदाहरणार्थ 2000 मे. टन दैनिक गाळप क्षमता असलेल्या कारखान्याच्या उत्पादन क्षमतेचा 100 टक्के वापर होण्यासाठी त्या कारखान्यास 320000 मेट्रीक टन इतका ऊस गळीतासाठी मिळणे आवश्यक आहे. (2000 मे. टन दैनिक गाळप क्षमता × 160 गळिताचे दिवस – 320000) तज्ज्ञांच्या अलिकडील मतानुसार कोणताही साखर कारखाना किफायतशीर चालण्यासाठी दैनिक गाळप क्षमता किमान 2000 मेट्रीक टन असावयास पाहिजे, त्यामुळे साखर उत्पादनाचा सरासरी खर्च कमी करणे शक्य होते. परंतु भारतातील व महाराष्ट्रातील बहुसंख्य साखर कारखान्याची गाळप क्षमता यापेक्षा कमी आहे याचाच अर्थ असा की 2000 मे. टनापेक्षा कमी गाळप क्षमता असलेल्या साखर कारखान्याची गाळप क्षमता विस्तारण्याची गरज आहे. तक्ता क्रमांक : 5 मध्ये महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील एकूण साखर कारखाने, त्यांची गाळप क्षमता, केलेले गळीत, साखर उत्पादन, साखर उतारा आणि उत्पादन क्षमतेचा केलेला वापर याविषयीची आकडेवारी दिलेली आहे. या आकडेवारीवरून आपणास कांही गोष्टींची कल्पना येते. पहिले असे की, भारतात साखर उद्योगाच्या उत्पादन क्षमतेचा सरासरी जेवढा वापर करण्यात येतो त्यापेक्षा महाराष्ट्रात त्याचा अधिक वापर करण्यात येतो. तक्ता क्रमांक : 4 मध्ये 1980–81 ते 1984–85 या पाच वर्षांची जी सरासरी दिलेली आहे त्यामध्ये फक्त 1983–84 हे वर्ष अपवाद आहे. (तक्ता क्रमांक 4 मधील शेवटचा स्तंभ). दुसरे असे की, महाराष्ट्राची उत्पादन क्षमता वापराबाबतची सरासरी भारताच्या सरासरीपेक्षा जास्त असली तरी मराठवाड्यामध्ये या पाच वर्षांत उत्पादन क्षमतेचा जो सरासरी वापर झालेला आहे तो महाराष्ट्राच्या सरासरीपेक्षा बराच कमी आहे. तिसरे असे की, महाराष्ट्राच्या सरासरीच्या तुलनेने साखर उताऱ्याचे प्रमाण मराठवाड्यात बरेचसे कमी आहे. मराठवाड्यात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने साखर कारखाने अकार्यक्षम का आहेत किंवा ते आजारी का आहेत याचे उत्तर आपणास या तक्त्यावरून स्पष्ट मिळते. मराठवाड्यात केवळ साखर कारखान्याच्या उत्पादन क्षमतेचा वापर कमी होतो असे नाही तर येथे उसातील साखर उताऱ्याचे प्रमाण देखील कमी आहे. महाराष्ट्राची साखर उताऱ्यांची

सरासरी 11 टक्के आहे. कधीकधी ती 11 टक्क्यापेक्षा जास्त असलेली दिसून येते तर मराठवाड्यातील साखर उताऱ्याने 10.5 टक्के सरासरी अजूनही ओलांडली नाही. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्याची गाळप क्षमता पुरेपूर उपयोगात आणली गेली नाही तरीही तेथे सरासरी साखर उताऱ्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे तेथील साखर कारखाने दुष्काळी परिस्थितीतही तग धरून राहू शकतात. आज महाराष्ट्रातील सर्व प्रदेशात साखर कारखान्याच्या उत्पादन क्षमतेच्या अपुऱ्या वापराची समस्या निर्माण झाली आहे. परंतु या समस्येची तीव्रता विविध विभागात कमी अधिक आहे.

तक्ता क्रमांक : 6 मध्ये साखर कारखान्याची जिल्हावार उत्पादन क्षमता, उसाखालील एकूण क्षेत्र, साखरेच्या उत्पादनासाठी उपलब्ध होऊ शकणारे निव्वळ क्षेत्र याचा उल्लेख केलेला आहे व त्याच्या आधारे साखर कारखान्यांना आपली गाळप क्षमता 100 टक्के वापरता यावी यासाठी उसाखालील प्रत्येक जिल्ह्यात किती क्षेत्र आवश्यक आहे व त्याकरिता आणखी किती क्षेत्र लागवडीखाली आणणे आवश्यक आहे हे दाखविलेले आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन करण्यात आलेल्या साखर कारखान्याची उत्पादन क्षमता विचारात घेऊन त्या त्या जिल्ह्यात उसाखालील आवश्यक असलेल्या क्षेत्राचा हिशोब केलेला आहे. त्यासाठी पुढील सूत्र वापरले आहे :–

$$\text{साखर कारखान्यांस उसाखालील आवश्यक क्षेत्र} = \frac{\text{जिल्ह्यातील एकूण गाळप क्षमता} \times 160 \text{ दिवस}}{\text{*जिल्ह्यातील सरासरी हेक्टरी ऊस उत्पादन}}$$

एखाद्या कारखान्याच्या उत्पादन क्षमतेचा 100 टक्के वापर करता यावा म्हणून त्या कारखान्यास किमान 160 दिवस पुरेल ऊस मिळाला पाहिजे या गोष्टीचा ऊहापोह केला आहे. तक्ता क्रमांक : 6 मधील 8 व्या रकान्यात जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या उत्पादन क्षमतेचा 100 टक्के वापर करता यावा यासाठी किती क्षेत्र उसाखाली आवश्यक आहे याचा खुलासा दिलेला आहे तर 6 व्या रकान्यात त्या त्या जिल्ह्यात 1981–82 ते 1985–86 या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये सरासरी उसाखाली क्षेत्र किती होते याचा खुलासा केला आहे. आपणास हे माहीतच आहे की, लागवडीखालील उसाचे सर्व क्षेत्र साखर कारखान्यांना साखरेच्या उत्पादनासाठी उपलब्ध होत नसते. त्यापैकी काही क्षेत्र गूळ व खांडसरी तयार करण्यासाठी, खाण्यासाठी व काही बियाण्यासाठी वापरले जाते. सध्या महाराष्ट्रातील एकूण ऊस लागवडीखालील क्षेत्रापैकी 89.9% साखरेच्या उत्पादनासाठी वापरले जाते. 0.6 टक्के गूळ व खांडसरीसाठी वापरले जाते व राहिलेले 9.5 टक्के क्षेत्र खाण्यासाठी व बियाण्यासाठी वापरले जाते म्हणून एखाद्या जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील उसाच्या क्षेत्रापैकी साखरेच्या उत्पादनासाठी निव्वळ किती क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल हे विचारात घेताना इतर उपयोगासाठी वापरले जाणारे क्षेत्र एकूण उसाच्या क्षेत्रामधून वजा केलेले आहे. त्यामुळे आपणास साखरेच्या निव्वळ वापरासाठी उपलब्ध होणारे क्षेत्र मिळते ते सातव्या रकान्यात दाखविले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या उत्पादन क्षमतेचा 100 टक्के वापर करण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षेत्राची आकडेवारी आठव्या रकान्यात दिलेली आहे. रकाना क्रमांक 7 व 8 मधील फरक 9 व्या रकान्यात दाखविलेले आहेत. तक्ता क्रमांक : 6 मधील दाखविलेल्या आकडेवारीवरून विदर्भातील सर्व कारखान्याच्या गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर करण्यासाठी 18,474 हेक्टर निव्वळ क्षेत्र आवश्यक आहे. परंतु तेथे केवळ 4900 हेक्टर जमीन उसाच्या लागवडीखाली आहे आणि त्यापैकी 4376 हेक्टर कारखान्यासाठी उपलब्ध होऊ शकते म्हणजेच तेथे आणखी 13,838 हेक्टर जमीन उसाच्या लागवडीखाली आणण्याची आवश्यकता आहे.

मराठवाड्यामध्ये साखर कारखान्याच्या गाळप क्षमतेचा वापर करण्याच्या दृष्टीने 61,433 हेक्टर जमीन आवश्यक आहे. परंतु तेथील एकूण उसाखालील क्षेत्र मुळात 61,200 हेक्टर इतके आहे व त्यापैकी केवळ 54,812 हेक्टर क्षेत्र कारखान्यांना साखर उत्पादनासाठी उपलब्ध होऊ शकते म्हणजे मराठवाड्यामध्ये आणखी 6,621 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील सात जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यात उसाखालील क्षेत्र अत्यंत कमी आहे व केवळ औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील क्षेत्र तेथील साखर कारखान्यांना पुरेल एवढे आहे.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये साखर कारखान्यांच्या उत्पादन क्षमतेनुसार 2,20,911 इतके क्षेत्र उपलब्ध व्हायला पाहिजे. त्यापेक्षा अधिक क्षेत्र तेथे उपलब्ध आहे. अर्थात ही आकडेवारी पाच वर्षांची सरासरी असल्यामुळे दुष्काळी वर्षातील लागवडीखालील क्षेत्र किती होते हे यावरून स्पष्ट होत नाही. तथापि पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांपैकी धुळे जिल्ह्यात उसाचे क्षेत्र अतिशय कमी आहे. अहमदनगर जिल्ह्यात उसाचे क्षेत्र 1983–84 व 1984–85 या दोन वर्षात बरेच कमी होते. अहमदनगर जिल्ह्यातील सर्व साखर कारखाने सुरळीत चालण्याच्या दृष्टीने 55,067 हेक्टर उसाचे क्षेत्र आवश्यक आहे.

*जिल्ह्याचे सरासरी उत्पादनाने भागताना 1981–82 ते 1985–86 या पाच वर्षातील एकूण उत्पन्न व ए. क्षेत्र याच्या आधारे काढलेल्या सरासरीने भागून आवश्यक क्षेत्र काढले आहे.

परंतु यापेक्षा कमी क्षेत्र दुष्काळाच्या काळामध्ये उपलब्ध झाले. तेथे साखर कारखान्यांना त्यांची गाळप क्षमता 100 टक्के उपयोगात आणता यावी यासाठी लागणाऱ्या उसाखालील क्षेत्राचा हिशोब मांडला आहे. परंतु काही साखर कारखाने आपल्या गाळप क्षमतेचा वापर अधिक काळ करता यावा व कारखान्याच्या गळीत हंगाम लांबवता यावा यासाठी दुसऱ्या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील उसाची पळवापळवी करतात. कमजोर साखर कारखान्याच्या क्षेत्रातील ऊस वडे साखर कारखान्याचे व्यवस्थापक पळवून नेतात; त्यामुळे कमजोर साखर कारखाने लवकर आजारी पडतात व वडे साखर कारखाने आपल्या गाळप क्षमतेचा अधिक वापर करतात. हा प्रकार केवळ एखाद्या दुसऱ्या जिल्ह्यात घडत नाही तर याबाबतचा अनुभव संपूर्ण महाराष्ट्रात येतो. महाराष्ट्रातील एकूण साखर कारखान्याची गाळप क्षमता व त्यांना लागणारा ऊस याचा विचार करता महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यासाठी 2,96,500 हेक्टर क्षेत्र उसाखाली आवश्यक आहे हे स्पष्ट होते. तथापि महाराष्ट्रात 3,22,197 हेक्टर क्षेत्र साखर कारखान्यांना उपलब्ध होऊ शकते. मात्र सध्याच्या साखर कारखान्याची दैनिक क्षमता सरासरी 1603 मेट्रीक टन आहे ही दैनिक सरासरी 2000 मेट्रिक टनापर्यंत वाढविली तर या गाळप क्षमतेचा उपयोग करण्यासाठी 3,69,893 इतके हेक्टर क्षेत्र सर्व साखर कारखान्यासाठी आवश्यक आहे व एवढे क्षेत्र साखर कारखान्यांना मिळण्यासाठी साधारणपणे 4,10,600 लक्ष हेक्टर क्षेत्रामध्ये उसाची लागवड करावी लागेल. आज महाराष्ट्रात उसाखालील सरासरी क्षेत्र 3,59,770 हेक्टर आहे. म्हणजे आणखी जवळ जवळ 51,000 हेक्टर जमीन उसाच्या लागवडीला आणखी लागणार आहे. परंतु आज साखर उद्योगातील गाळप क्षमतेचा होत असलेला वापर विचारात घेता सध्या साखर कारखान्यांची जी गाळप क्षमता आहे त्यात वाढ न करता व आहे त्या गाळप क्षमतेचा वापर पुरेपूर करणे गरजेचे आहे अन्यथा महाराष्ट्रातील आजारी साखर कारखान्याची संख्या वाढत जाईल.

तशातच सध्या धरणातील पाणी वाटपाविषयी जोरदार चर्चा चालू आहे. आठमाही की बारामाही असा वाद निर्माण झालेला आहे हा वाद विचारात घेऊन सरकारने महाराष्ट्रात आणखी साखर कारखाने न काढण्याचेच धोरण स्वीकारले पाहिजे. महाराष्ट्रातील पाण्याखालच्या क्षेत्रात वाढ घडवून आणली गेली तर आहे तेच कारखाने किफायतशीर चालविण्यासाठी सध्या ज्या कारखान्याची दैनिक गाळप क्षमता 2000 मेट्रीक टनापेक्षा कमी आहे त्यांना 2000 मेट्रीक टनापर्यंत वाढविण्याची परवानगी सरकारने द्यावी.

तक्ता क्रमांक 5 आणि 6 वरून आपणास महाराष्ट्रातील प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्यातील साखर कारखाने आजारी का आहेत याची स्पष्ट कल्पना येऊ शकेल. एकतर या भागातील उसाखालील कमी क्षेत्रामुळे साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर करून घेतला जात नाही व दुसरे असे की, विदर्भ आणि मराठवाड्यातील साखर उताऱ्याचे प्रमाण महाराष्ट्राच्या सरासरी पेक्षा कमी आहे व तिसरे म्हणजे मराठवाडा आणि विदर्भात उसाचे दर हेक्टरी उत्पादन कमी आहे. 1981–82 ते 1985–86 या पाच वर्षातील सरासरी क्षेत्र विचारात घेता पश्चिम महाराष्ट्रात उसाचे उत्पादन प्रती हेक्टरी 101.09 मेट्रीक टन झाल्याचे दिसते. मराठवाड्यात ते 66.96 मेट्रीक टन, तर विदर्भात ते 62.51 मेट्रीक टन इतके आहे. मात्र महाराष्ट्राची सरासरी 94.51 मेट्रीक टन इतकी आहे. येथे लक्षात घेण्याजोगा विशेष महत्वाचा जो मुद्दा आहे तो म्हणजे मराठवाडा आणि विदर्भाने जर उसाच्या उत्पादन क्षमतेत महाराष्ट्राच्या सरासरीइतकी वाढ घडवून आणली तरीही मराठवाडा आणि विदर्भात आवश्यक तेवढा ऊस उपलब्ध होऊ शकतो व तेथील साखर कारखाने चांगले चालू शकतील.

एकंदरीत ग्रामीण विकासाच्या दृष्टीने साखर कारखानदारी हा एक महत्वाचा दुवा आहे. म्हणून या साखर कारखानदारीच्या स्वास्थ्यावरच ग्रामीण भागाचा विकास अवलंबून आहे याची जाणीव ठेऊन साखर कारखान्यांनी आणि सरकारने पुढील गोष्टींचा विचार गांभीर्याने करावा.

1. साखर कारखान्यास परवाने देण्याबाबतचे व गाळप क्षमतेच्या विस्तारास परवानगी देण्याचे सरकारचे धोरण हे अर्थशास्त्रीय निकषापेक्षा राजकीय निकषावरच अवलंबून आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, म्हणून असे सुचवावे वाटते की, सरकारने साखर कारखान्याची आजारी पडण्यामागील कारणमीमांसा लक्षात घेऊन व त्याचबरोबर आजारी साखर कारखान्याचा त्या भागातील विकासावर होणारा संभाव्य परिणाम विचारात घेऊन महाराष्ट्रातील साखर कारखान्याचे आजारीपण नाहीसे होईपर्यंत कोणत्याही नवीन साखर कारखान्यांना स्थापण्यास किंवा अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यांना त्यांची गाळप क्षमता वाढविण्यास परवानगी देऊ नये.

2. जे साखर कारखाने आजारी आहेत त्यांना ऊस खरेदी करामध्ये (cane purchase tax) सवलत द्यावी अन्यथा त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये लवकर सुधारणा होणार नाही.

3. आजारी सहकारी साखर कारखान्यांना ऊस विकास निधीतून ऊस विकास योजना राबविण्यासाठी मदत द्यावी याबाबतीत सरकारी दप्तर दिरंगाई टाळावी.

4. सर्व सहकारी साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात ऊस विकास कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविला पाहिजे. बहुतेक सहकारी साखर कारखान्याबाबतचा अनुभव असा की, शेतीखालील उसाचे क्षेत्र वाढविण्याची जबाबदारी केवळ शेतकऱ्याची आहे व शेतकरी व्यापारी दृष्टिकोनातून ऊस लावतील आणि त्यात आपली कांहीही जबाबदारी नाही अशा भ्रामक कल्पनेखाली साखर कारखाने आहेत त्यामुळे ऊस विकास योजना गांभीर्याने राबविली जात नाही. बहुतेक साखर कारखान्यामधून ऊस विकास योजनेसाठी नेमण्यात आलेला नोकरवर्ग ऊस विकास योजनेसाठी न राबविता पुरवठा विभागात (Cane Supply Department) किंवा अन्यत्र राबविला जातो. त्यामुळे साखर कारखान्यांना पुरेसा ऊस उपलब्ध होऊ शकत नाही.

5. एखाद्या वस्तूचा पुरवठा वाढावा अशी अपेक्षा असेल तर त्यासाठी त्या वस्तूला जास्त किंमत दिली पाहिजे हा साधा अर्थशास्त्रीय नियम आहे. त्यानुसार आपल्या भागातील ऊस दुसरीकडे पळविला जाऊ नये यासाठी दुसऱ्या कारखान्यापेक्षा आपल्याकडून उसास कमी किंमत दिली जाणार नाही याची संचालक मंडळाने जाणीव ठेवली पाहिजे व त्या दृष्टीने दैनिक कारभारात काटकसर करणे आवश्यक आहे. बरेच साखर कारखाने अनावश्यक वस्तू खरेदी करून ठेवतात. संचालक मंडळाच्या प्रवास भत्त्यावर बराच खर्च होतो. आवश्यकतेपेक्षा जास्त मजूर कामावर घेतला जातो. बहुतेक सर्व सहकारी साखर कारखाने आवश्यकतेपेक्षा 10 ते 12 टक्के जादा मजूर कामावर घेतात त्यामुळे प्रतिवर्षी 22 ते 27 लाखाचा पगाराचा बोजा निष्कारणच कारखान्यांना सहन करावा लागतो हे टाळले पाहिजे. असे झाले तर उत्पादनखर्च कमी होऊ शकेल व शेतकऱ्यांना उसाची वाजवी किंमत देण्यात काही मदत होईल. त्यामुळे उसाच्या एकूण पुरवठ्यात वाढ घडवून आणून साखर कारखान्यांच्या उत्पादन क्षमतेचा अधिकाधिक वापर करता येईल.

## संदर्भ


(1) S. D. Tupe–Impact of Sugar Factories on the Rural Economy, Ph. D. Thesis, पुणे विद्यापीठ, (1980), पान 185.

(2) महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ लि. मुंबई 31 वा वार्षिक अहवाल सन 1986–87, पान 41.

(3) Y. J. Mohite, Sugar Industry of Maharashtra –A Blue Print published by the Government of Maharashtra, Bombay 1974, पान 3.

(4) A National Monthly Journal of Sugar and its Co-products Pravaranagar Vol. III, No. 8, September 1985, पान 8.

(5) R. M. Kharche – Co-operative Sugar Factories in Marathwada – A Critical Study, Ph. D. thesis, मराठवाडा विद्यापीठ, (1987), पान 330.

(6) Co-operative Sugar – August–1987, Vol. 18, No. 12, पान 837.

तक्ता क्रमांक : 1

**खाजगी, सार्वजनिक आणि सहकारी क्षेत्रात 1986 या वर्षाअखेरीस भारतातील निरनिराळ्या घटक राज्यामध्ये परवाना प्राप्त आणि स्थापन झालेले साखर कारखाने.**

| अ. क्र. | घटक राज्य | खाजगी क्षेत्र | सार्वजनिक क्षेत्र | सहकारी क्षेत्र | एकूण साखर कारखाने |
|---|---|---|---|---|---|
| 1. | आंध्र प्रदेश | 11 | 1 | 18 | 35 |
| 2. | आसाम | — | 1 | 2 | 3 |
| 3. | बिहार | 21 | 9 | — | 30 |
| 4. | गोवा | — | — | 1 | 1 |
| 5. | गुजराथ | — | — | 17 | 17 |
| 6. | हरियाणा | 1 | — | 7 | 8 |
| 7. | कर्नाटक | 8 | 3 | 19 | 30 |
| 8. | केरळ | 1 | — | 2 | 3 |
| 9. | मध्य प्रदेश | 5 | — | 3 | 8 |
| 10. | महाराष्ट्र | 10 | — | 92 | 102 |
| 11. | नागालँड | — | 1 | — | 5 |
| 12. | ओरिसा | 1 | — | 4 | 5 |
| 13. | पाँडेचरी | 1 | — | 1 | 2 |
| 14. | पंजाब | 2 | 2 | 9 | 13 |
| 15. | राजस्थान | 1 | 1 | 1 | 3 |
| 16. | तामिळनाडू | 13 | 2 | 12 | 27 |
| 17. | उत्तर प्रदेश | 56 | 19 | 30 | 105 |
| 18. | पश्चिम बंगाल | 1 | 1 | — | 2 |
| | एकुण | 132 | 45 | 218 | 395 |
| | शेकडा प्रमाण | 39.42 | 11.40 | 55.18 | 100.00 |

संदर्भ – महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ मर्यादित. 31 वा वार्षिक अहवाल सन 1986–87.

तक्ता क्र. 2

भारतातील आणि महाराष्ट्रातील साखर उद्योग–एक तुलनात्मक दृष्टिक्षेप.

| अ. क्र. | तपशील | 1963 | | | 1970 | | | 1981 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र | 3 चे 2 शी शेकडा प्रमाण | भारत | महाराष्ट्र | 6 चे 5 शी शेकडा प्रमाण | भारत | महाराष्ट्र | 9 चे 8 शी शेकडा प्रमाण |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1. | साखर कारखान्यांची संख्या | 187 | 28 | 14.97 | 223 | 39 | 17.49 | 297 | 72 | 24.24 |
| 2. | उत्पादक भांडवल गुंतवणूक (को. रुपये) | 126.01 | 31.96 | 27.37 | 251.25 | 85.26 | 34.73 | 790.35 | 300.26 | 38.90 |
| 3. | रोजगार रोजगार प्राप्त व्यक्तींची संख्या | 105862 | 15194 | 14.35 | 142811 | 25660 | 17.76 | 443474 | 100074 | 22.56 |
| 4. | साखर उत्पादन (टनामध्ये) | 2075176 | 492802 | 23.75 | 3997588 | 858678 | 24.48 | 8436000 | 3026000 | 35.57 |
| 5. | उत्पादन आणि उपउत्पादन (को. रुपये) | 172.72 | 41.32 | 32.93 | 558032 | 13406 | 24.01 | 1919.81 | 773.94 | 40.31 |
| | उत्पादनाचे ढोबळ मूल्य (कोटी रुपयात) उत्पादन व उपउत्पादन | 173.72 | 41.75 | 24.04 | 562.39 | 135.15 | 24.03 | 1919.82 | 795.98 | 40.47 |

संदर्भ : Annual Survey of Industries ( Census Sector ) Vol. I & II of the years 1963, 1970 and 1980.

## तक्ता कमांक : 3

**भारतातील साखर उद्योगातील राज्यवार आणि क्षेत्रवार परवाना मिळालेली व उभारलेली क्षमता 30/9/1986 ला**

(आकडे मेट्रिक टनामध्ये)

| अ. क्र. राज्य | परवाना मिळालेली क्षमता | | | | उभारलेली गाळप क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाजगी क्षेत्र | सार्वजनिक क्षेत्र | सहकारी क्षेत्र | एकूण | खाजगी क्षेत्र | सार्वजनिक क्षेत्र | सहकारी क्षेत्र | एकूण | उभारलेल्या क्षमतेशी % प्रमाण |
| 1. उत्तर प्रदेश | 12.793 | 3.279 | 4.85 | 20.922 | 11.243 | 2.73 | 4.25 | 18.223 | 87.09 |
| 2. बिहार | 2.855 | 0.85 | — | 3.705 | 2.655 | 0.85 | — | 3.505 | 94.60 |
| 3. पंजाब | 0.216 | 0.286 | 1.076 | 1.578 | 0.18 | 0.22 | 0.70 | 1.10 | 69.70 |
| 4. हरियाना | 0.82 | — | 1.02 | 1.84 | 0.53 | — | 1.02 | 1.55 | 84.23 |
| 5. प. बंगाल | 0.10 | 1.10 | — | 0.20 | 0.10 | 0.05 | — | 0.15 | 75.00 |
| 6. आसाम | — | 0.12 | 0.24 | 0.36 | — | 0.12 | 0.08 | 0.20 | 55.55 |
| 7. नागालँड | — | 0.12 | 0.09 | 0.26 | 0.11 | 0.77 | 0.09 | 0.27 | 103.84 |
| 8. राजस्थान | 0.10 | 0.07 | 0.09 | 0.26 | 0.11 | 0.77 | 0.09 | 0.27 | 103.84 |
| 9. मध्य प्रदेश | 0.42 | — | 0.27 | 0.69 | 0.37 | — | 0.27 | 0.64 | 92.24 |
| 10. ओरिसा | 0.03 | — | 0.426 | 0.456 | 0.03 | — | 0.19 | 0.22 | 48.24 |
| 11. महाराष्ट्र | 2.65 | — | 26.832 | 29.482 | 2.60 | — | 21.892 | — | -- |
| 12. गुजराथ | — | — | 5.35 | 5.35 | — | — | 5.155 | 5.155 | 96.35 |
| 13. गोवा | — | — | 0.20 | 0.20 | -- | — | 0.20 | 0.20 | 100.00 |
| 14. तामिळनाडू | 3.965 | 0.37 | 2.935 | 7.27 | 3.65 | 0.37 | 2.64 | 6.66 | 91.60 |
| 15. कर्नाटक | 2.621 | 1.405 | 4.235 | 8.261 | 2.271 | 1.40 | 3.615 | 7.286 | 88.19 |
| 16. पॉडिचरी | 0.19 | — | 0.15 | 0.34 | 0.19 | — | 0.15 | 0.24 | 100.00 |
| 17. आंध्र प्रदेश | 2.485 | 1.12 | 2.385 | 5.987 | 2.27 | 0.99 | 2.362 | 5.622 | 93.90 |
| 18. केरळ | 0.04 | — | 0.18 | 0.12 | 0.4 | — | 0.18 | 0.22 | 100.00 |
| एकूण | 29.285 (33.56) | 7.72 (8.85) | 50.226 (57.59) | 87.241 (100.00) | 26.139 (39.57) | 6.92 (0.09) | 42.794 (60.34) | 75.953 (100.00) | |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ, मुंबई सन 1986–87 चा 31 वा वार्षिक अहवाल पृष्ठ 21 कंसातील आकडेवारी शेकडा प्रमाण दर्शविते.

तक्ता क्र 4 : भारताची 1976–77 ते 1985-86 या कालावधीत साखर उद्योगातील राज्यवार विभागलेली कार्यक्षमता आणि केलेला वापर

(उत्पादन व विभागलेली क्षमता लाख मेट्रिक टनामध्ये)

| अ. क्र. वर्ष | सहकारी क्षेत्रे | | | खाजगी व सार्वजनिक क्षेत्र | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पादन | उभारलेली क्षमता | शेकडा वापर | उत्पादन | उभारलेली क्षमता | शेकडा वापर | उत्पादन | उभारलेली क्षमता | शेकडा वापर |
| 1976–77 | 23.13 | 24.34 | 95.0 | 25.27 | 27.305 | 92.40 | 48.40 | 51.65 | 93.7 |
| 1977–78 | 31.75 | 27.19 | 116.00 | 32.86 | 28.44 | 115.5 | 64.61 | 55.63 | 116.1 |
| 1978–79 | 30.52 | 29.75 | 102.6 | 27.89 | 29.10 | 95.8 | 58.41 | 58.85 | 99.3 |
| 1979–80 | 20.32 | 30.61 | 66.4 | 18.26 | 29.14 | 62.7 | 38.58 | 69.75 | 64.6 |
| 1980–81 | 29.03 | 33.61 | 87.5 | 22.45 | 30.20 | 74.3 | 51.08 | 63.37 | 81.2 |
| 1981–82 | 46.04 | 33.99 | 135.5 | 38.33 | 30.81 | 124.4 | 86.37 | 64.80 | 130.2 |
| 1982–83 | 45.11 | 34.89 | 129.3 | 37.18 | 31.01 | 119.9 | 82.29 | 65.90 | 124.9 |
| 1983–84 | 31.88 | 37.166 | 85.8 | 27.29 | 31.894 | 85.6 | 59.17 | 59.06 | 85.7 |
| 1984–85 | 36.37 | 40.911 | 88.9 | 25.07 | 32.074 | 78.2 | 61.44 | 72.985 | 84.2 |
| 1985–86 | 41.28 | 42.794 | 96.27 | 18.80 | 33.109 | 86.85 | 70.00 | 70.003 | 92.16 |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ लि. मुंबई, 31 वा वार्षिक अहवाल 1986–77, पृ. 23.

तक्ता क्र.–5 : महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील साखर कारखान्यातील साखर उत्पादन, उभारलेली क्षमता, ऊस गाळप आणि साखर उत्पादन इ.

| तपशील | मराठवाडा | | | | | महाराष्ट्र | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1980–81 | 1981–82 | 1982–83 | 1983–84 | 1984–85 | 1980–81 | 1981–82 | 1982–83 | 1983–84 | 1984–85 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1. उत्पादनातील साखर कारखान्यांची संख्या. | 15 (19.48) | 15 (19.23) | 15 (19.23) | 15 (19.23) | 16 (18.82) | 77 (100) | 78 (100) | 78 (100) | 78 (100) | 85 (100) |
| 2. उभारलेली क्षमता (000 मे. टन साखर उत्पादन) | 311.26 (14.85) | 311.46 (14.84) | 311.46 (14.84) | 311.46 (14.84) | 311.66 (14.11) | 2096.00 (100) | 2098.11 (100) | 2098.11 (100) | 2098.11 (100) | 2208.29 (100) |
| 3. ऊस गाळप (000 मे. टन) | 1849.89 (9.80) | 3863.61 (13.63) | 3719.83 (13.46) | 1533.22 (8.56) | 289.00 (13.88) | 18873.00 (100) | 28333.00 (100) | 27625.00 (100) | 17903.00 (100) | 20885.00 (100) |
| 4. साखर उत्पादन (000 मे. टन) | 187.80 (9.04) | 367.49 (12.14) | 383.19 (12.53) | 160.69 (8.06) | 303.19 (13.11) | 2078.00 (100) | 3026.00 (100) | 3058.00 (100) | 1993.00 (100) | 2311.00 (100) |
| 5. साखरेचा उतारा | 10.15 | 9.51 | 10.30 | 10.48 | 10.48 | 11.05 | 10.68 | 10.95 | 11.13 | 11.07 |
| 6. क्षमतेचा वापर | 56.79 | 123.72 | 114.46 | 46.44 | 88.46 | 90.00 | 141.66 | 131.60 | 81.08 | 95.97 |

संदर्भ : कंसातील आकडे मराठवाड्याचे महाराष्ट्राशी संबंधित वर्षातील शेकडा प्रमाण दर्शवितात.

R. M. Kharche, Co-operative Sugar Factories in Marathwada–A Critical Study, Ph. D. Thesis, Marathwada University, May 1987, पान–330.

**तक्ता क्र. 6 : महाराष्ट्रात 1981-82 ते 1985-86 या वर्षातील सरासरी उसाखालील क्षेत्र, साखर कारखान्यासाठी उपलब्ध होऊ शकणारे क्षेत्र, आवश्यक असणारे व कमी पडणारे/जादा क्षेत्र**

| अ. क्र. | जिल्हा | साखर कारखान्यांची संख्या | एकूण दैनिक गाळप क्षमता (1985-86) | सरासरी गाळप क्षमता | उसाखालील सरासरी क्षेत्र आकडे 100 हेक्टरात 1981-82 ते 1985-86 | साखर कारखान्यासाठी निव्वळ उसाखालील क्षेत्र 100 हेक्टरात | जिल्ह्यातील साखर कारखान्यासाठी त्यांच्या गाळप क्षमतेनुसार लागणारे क्षेत्र आकडे 100 हेक्टरात | रकाना क्र. 7 व 8 मधील फरक | 2000 मे. टन ला गाळप क्षमतेनुसार लागणारे उसाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1. | नासिक | 7 | 9750 | 1392 | 254 | 226.80 | 171.04 | 55.76 | 245.06 |
| 2. | धुळे | 4 | 6275 | 1568 | 113 | 100.46 | 114.69 | – 14.24 | 146.22 |
| 3. | जळगाव | 3 | 3750 | 1250 | 100 | 88.90 | 65.93 | 22.97 | 105.49 |
| 4. | अहमदनगर | 18 | 31466 | 1748 | 731 | 652.85 | 550.67 | 101.18 | 631.16 |
| 5. | पुणे | 7 | 12500 | 1785 | 349 | 313.26 | 170.50 | 142.76 | 180.66 |
| 6. | सोलापूर | 8 | 11516 | 1439 | 272 | 243.83 | 169.09 | 74.71 | 234.94 |
| 7. | सातारा | 7 | 13700 | 1957 | 255 | 228.69 | 205.61 | 23.08 | 210.12 |
| 8. | सांगली | 7 | 13250 | 1892 | 286 | 256.25 | 205.58 | 50.67 | 214.05 |
| 9. | कोल्हापूर | 11 | 23950 | 2090 | 571 | 510.61 | 391.79 | 118.82 | 359.89 |
| | प. महाराष्ट्र | 72 | 126157 | 1752 | 2931 | 2625.65 | 2209.11 | 416.54 | 2521.56 |
| 10. | औरंगाबाद | 5 | 6016 | 1203 | 147 | 131.68 | 106.09 | 25.59 | 176.35 |
| 11. | जालना | 2 | 2500 | 1250 | 51 | 45.33 | 45.98 | – 00.65 | 73.57 |
| 12. | परभणी | 3 | 3750 | 1250 | 56 | 50.78 | 102.19 | – 52.02 | 163.44 |
| 13. | बीड | 4 | 5000 | 1250 | 85 | 76.00 | 104.80 | – 28.80 | 167.68 |
| 14. | नांदेड | 3 | 3750 | 1250 | 78 | 70.00 | 101.76 | – 31.76 | 162.82 |
| 15. | उस्मानाबाद | 2 | 3450 | 1725 | 128 | 114.79 | 81.24 | 33.55 | 94.19 |
| 16. | लातूर | 3 | 3750 | 1250 | 67 | 59.74 | 111.59 | – 51.85 | 178.55 |
| | मराठवाडा | 22 | 28116 | 1282 | 612 | 548.12 | 614.33 | – 66.31 | 957.99 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 17. | बुलढाणा | 1 | 1250 | 1250 | 13 | 11.68 | 26.10 | – 14.42 | 41.77 |
| 18. | अकोला | 1 | 1250 | 1250 | 4 | 3.55 | 27.16 | – 23.61 | 43.47 |
| 19. | अमरावती | 1 | 1250 | 1250 | 4 | 3.55 | 27.09 | – 23.54 | 43.35 |
| 20. | यवतमाळ | 1 | 1250 | 1250 | 16 | 14.48 | 26.62 | – 11.85 | 42.59 |
| 21. | वर्धा | 1 | 1250 | 1250 | 2 | 1.78 | 33.00 | – 22.23 | 40.00 |
| 22. | नागपूर | 1 | 1250 | 1250 | 2 | 1.78 | 25.00 | – 23.22 | 40.00 |
| 23. | भंडारा | 1 | 1250 | 1250 | 7 | 6.40 | 24.71 | – 18.31 | 39.53 |
| 24. | चंद्रपूर | — | — | — | 1 | 0.87 | — | — | — |
| 25. | गडचिरोली | — | — | — | — | — | — | — | — |
| | विदर्भ | 7 | 8750 | 1250 | 49 | 43.76 | 184.74 | –138.38 | 292.39 |
| 26. | रत्नागिरी | 1 | 400 | 400 | 5 | 4.44 | 6.80 | – 2.36 | 34.04 |
| | कोकण | 1 | 400 | 400 | 5 | 4.44 | 6.80 | – 2.36 | 34.04 |
| | महाराष्ट्र | 102 | 163523 | 1603 | 3597 | 3221.97 | 2965.00 | 256.97 | 3698.93 |

संदर्भ : (1) साखर संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे 37. (2) कृषी विभागाची सांख्यिकीविषयक सर्वसाधारण जिल्हावार माहिती 1986–87

# मराठवाडा अर्थशास्त्र परिषद :

# सहाव्या वार्षिक (1988) अधिवेशनाचा वृत्तांत

उत्तम दे. वाकोडकर*

मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचे सहावे वार्षिक अधिवेशन मा. दिनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या विद्यमाने औराद-शहाजणी येथे दिनांक 27 ते 28 मार्च 1988 या काळात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी शेती आणि पाणी प्रश्नावरील मराठवाड्यातील अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. एच. एम. देसरडा हे होते.

अधिवेशनाचा उद्‌घाटन समारंभ मा. दिनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या परिसरात उभारलेल्या कै. लक्ष्मीकांत झा सभागृहात रविवार दिनांक 27 मार्च रोजी सकाळी 10 वाजता सुरू झाला. मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. म. द. पाध्ये यांनी मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेची भूमिका व वाटचाल विशद केली. प्रा. शिवाजीराव जाधव यांच्या प्रास्ताविकानंतर स्वागताध्यक्ष प्राचार्य सदाविजय आर्य यांनी उपस्थितांचे हार्दिक स्वागत केले. ते म्हणाले : परिषदेचे ग्रामपंचायत पातळीवरील औरादसारख्या छोट्या भागात अधिवेशन भरत असल्यामुळे ग्रामीण परिसरातील जनतेला विद्वानांच्या सहवासात राहून विचार ऐकण्याची संधी मिळत आहे ही समाधानाची बाब आहे. स्वागताध्यक्षांच्या भाषणानंतर जिल्हा सहकारी निबंधक श्री. हरिदासजी यांनी श्रीफळ फोडून अधिवेशनाचे उद्‌घाटन केले. आपल्या उद्‌घाटनाच्या भाषणात श्री हरिदासजी म्हणाले : "अशा उपक्रमातून ग्रामीण आर्थिक जीवनाशी व समस्यांशी अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी जवळीक ठेवावी हे अपेक्षित आहेच परंतु अर्थशास्त्र परिषदेतून अर्थव्यवस्थेला कोणत्या प्रकारे वळण द्यावयाला पाहिजे याचा तात्त्विक भूमिकेतून डोळस विचार झाला पाहिजे." प्रा. एच. एम. देसरडा यांनी "अर्थसिद्धांतातील वर्गीय दृष्टी

* व्याख्याता, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, आंबाजोगाई – 431 517.

आणि 'भारतीय गतितत्त्व' या अध्यक्षीय भाषणात ॲडम स्मिथ, रिकार्डो, केन्स, स्राफा आणि मार्क्स यांच्या विचारांचा विस्तृत परामर्श घेऊन सखोल विवेचन केले. नवसनातनवादी अर्थशास्त्राच्या वैफल्य आणि वैयर्थाविषयी त्यांनी सखोल चर्चा करून सांगितले की भारताच्या व बहुसंख्य तिसऱ्या जगाचा प्रश्न आर्थिक संरचना आणि वर्गीय हितसंबंध लक्षात घेऊन त्याचे सिद्धांतन व बदलासाठी तयार होणे हा आहे. वर्गीय भूमिका आणि आर्थिक विश्लेषणाच्या संदर्भात मार्क्संच्या कार्याचा त्यांनी आढावा घेऊन मार्क्संची अन्वेषण पद्धती भारताच्या सांप्रतच्या समस्यांच्या आकलनासाठी कितपत उपयुक्त आहे याचे विवेचन केले. स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक विकासाचा जमेच्या बाजू स्पष्ट करून प्रा. देसरडा म्हणाले की, भारताच्या विकास अनुभवाचे यथार्थ आकलन होण्यासाठी विकासप्रक्रियेची संस्थात्मक चौकट आणि नियोजनाचा घाट यांचा मूलगामी विचार करणे अनिवार्य आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या गतितत्त्वासंबंधी सखोल विवेचन करून डॉ. देसरडा म्हणाले की शोषित जनसमुदायाला केवळ "अभ्यासवस्तु" म्हणून वापर करण्याची प्रवृत्ती संशोधक अभ्यासकांमध्ये उत्तरोत्तर वाढत आहे.

### चर्चासत्रे

अधिवेशनात एकूण तीन चर्चासत्रे आयोजली होती. अध्यक्षस्थानी प्रा. एच. एम. देसरडा होते. पहिले चर्चासत्र रविवार दिनांक 27 मार्च रोजी दुपारी 3 ते 6 पर्यंत चालले. चर्चासत्राचा विषय होता "भाववाढीची समस्या – भारतीय अनुभव" या चर्चासत्रात डॉ. श्रीराम पेडगावकर, प्रा. उत्तम वाकोडकर, डॉ. कोंडेवार, प्रा. अरविंद एकताटे, डॉ. देवगिरीकर यांनी आपले शोधनिबंध सादर केले. चर्चेत श्री. डॉ. तोंडारे, प्रा. म. द. पाध्ये, डॉ. कल्याणकर यांनी भाग घेतला प्रा. सुरेश खेडकर यांनी चर्चासत्राचा उपन्यास केला. अध्यक्षांनी समारोप केला.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या सत्रात "मराठवाड्यातील सहकार चळवळ" हा विषय चर्चेसाठी होता. या चर्चासत्रात प्रा. दळणकर, प्रा. जाधव, डॉ. सोमवंशी, डॉ. वि. बी. बोरकर आणि प्रा. सौ. पाटील यांनी निबंध सादर केले. चर्चेत प्रा. म. द. पाध्ये, प्रा. एकताटे, प्रा. वाकोडकर, प्रा. पेडगावकर यांनी भाग घेतला. चर्चासत्राचा उपन्यास आणि समारोप प्रा. एच. एम्. देसरडा यांनी केला.

तिसरे चर्चासत्र तेरणाती दाट वृक्षांच्या सान्निध्यात "पर्यावरण" – एक समस्या" या विषयावर दुपारी 1 वाजता सुरू झाले. या चर्चासत्रात, प्रा. कुलकर्णी, प्रा. जायभाये, डॉ. उत्तम शिंदे यांनी निबंध सादर केले. या चर्चासत्रात, प्रा. गव्हाणे, प्रा. म. द. पाध्ये यांनी भाग घेतला. या चर्चासत्रात पुण्याहून ग्रामीण प्रदूषण जागृती समितीचे डॉ. अजित करकरे व श्री. एस. भास्कर या तज्ज्ञांना मुद्दाम त्यांच्या या विषयावरील संशोधनाचा लाभ घेण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते या तज्ज्ञांनी अहमदनगर जिल्ह्यातील वितळी या खेड्यावर डिस्टीलरी प्रदूषणाचा झालेला परिणाम प्रत्यक्ष पाहणीच्या आधारावर तयार केलेल्या निबंधातून स्पष्ट केला. प्रदूषणाशी संबंधित कायदेविषयक तरतुदी व अंमलबजावणीचा विस्तृत परामर्शही त्यांनी चर्चेत उत्तर देताना घेतला.

संध्याकाळी या अधिवेशनाचा सांगता समारोह संपन्न झाला. विभागीय सहनिबंधक डॉ. एम. आर. खर्चे हे प्रमुख पाहुणे होते व अध्यक्षस्थानी डॉ. जी. एस. कल्याणकर हे होते. डॉ. खर्चे यांनी सहकारी चळवळीशी संबंधित विविध पैलूंचा आढावा घेऊन सांगितले की सहकारी चळवळीत अग्रेसर असलेल्या महाराष्ट्र राज्यात सुद्धा सहकारी चळवळ शासनाच्या पाठिंब्यावर अवलंबून असावी ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

प्रतिनिधींच्या वतीने या सांगतासमारोहात डॉ. श्रीराम पेडगावकर आणि प्रा. उत्तम वाकोडकर यांनी मनोगत व्यक्त करून व्यवस्थेबद्दल स्थानिक संयोजन समितीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

डॉ. जी. एस. कल्याणकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रा. म. द. पाध्ये डॉ. पानपट्टे, प्रा. जाधव, प्राचार्य सदाविजय आर्य, प्रा. पाईकराव, प्रा. व्यास आदींनी हे अधिवेशन यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतलेत.

■ ■

# मराठी अर्थशास्त्र परिषद
## १२ वे वार्षिक अधिवेशन
### शहादा, जि. धुळे

वरील अधिवेशनात ज्या तीन विषयावर परिषदेच्या सदस्यांनी सादर केलेल्या शोध निबंधांवर चर्चा होणार आहे' त्यापैकी दोन विषयावरील शोध निबंधात ज्या मुद्द्यांची विशेषकरून चर्चा अभिप्रेत आहे असे मुद्दे शोध-निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी त्या त्या विषयावरील तज्ज्ञांनी तयार केलेले आहेत. तिसऱ्या विषयासंबंधीचे मुद्दे उपलब्ध झाल्यास पुढील अंकी देण्यात येतील.

संपादक

## 1. भारतातील भांडवल-बाजाराचे बदलते स्वरूप

या विषयावरील शोधनिबंधात खालील विवेचनाची अपेक्षा आहे :

● स्वातंत्र्यपूर्व काळातील भांडवल बाजारातील प्रमुख त्रुटी काय होत्या, त्या का होत्या याचे थोडक्यात विश्लेषण व त्या भरून काढण्याची जरूरी व झालेले प्रयत्न याचे विश्लेषण.

● या त्रुटी भरून काढण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात केले गेलेले महत्त्वाचे संस्थात्मक / संरचनात्मक बदल, यांचे स्वरूप व उद्दिष्टे. या संदर्भात भांडवली बाजाराच्या विकासाची' संरचनात्मक बदलाची ठळक वैशिष्ट्ये.

● उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने भांडवली बाजाराचे यशापयश, सध्या असलेल्या त्रुटी, दोष इ. यांचे निवारण करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक बदल याविषयी विवेचन.

**वरीलप्रमाणे विवेचन करतांना पुढील बाबींबाबत दक्षता घ्यावी :**

● भांडवल बाजारातील प्रमुख संस्थांचा / विभागांचा एकत्रित विचार अभिप्रेत आहे. परंतु प्रत्येक संस्थेसंबंधीची सांख्यिकी माहिती वा तपशील देण्याची जरूरी नाही.

● भांडवली बाजारासंबंधीची सर्वत्र सहज उपलब्ध असलेली आकडेवारी/माहिती तपशीलवार देऊ नये. निवडक, वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाच्या मुद्द्याच्या विवेचनाच्या दृष्टीने अत्यावश्यक तेवढीच आकडेवारी / माहिती द्यावी.

● अर्थव्यवस्थेच्या संदर्भात भांडवलबाजाराचे कार्य, भांडवल निर्मितीचा वेग, भांडवल बाजारावर परिणाम घडवून आणणाऱ्या घटना आणि भांडवल बाजारातील प्रमुख चल यांचे आवश्यक तेवढेच विवेचन असावे. मात्र विस्तृत वर्णनात्मक विवेचन नसावे.

● शोध-निबंधातील विश्लेषण प्रामुख्याने भारतातील भांडवलबाजाराशी संबंधित राहील याची दक्षता घ्यावी. त्यातील विवेचन केवळ सर्वसाधारणतेच्या स्वरूपाचे नसावे.

## 2. 'महाराष्ट्रातील साखर उद्योग'

या विषयाच्या पुढील विविध बाजूंवर लेखकांना शोध निबंध लिहिता येईल.

(1) **महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा विकास :–** भारतातील साखर उद्योगात महाराष्ट्राचा हिस्सा एकूण कारखाने, क्षेत्रवार रचना, भांडवल गुंतवणूक, उत्पादन, रोजगार इत्यादि.

(2) **साखर उद्योगाचा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम** :–याबाबत पुढील प्रत्येक पैलूवर स्वतंत्रपणे लिहितायेईल.

– शेतीवर झालेला परिणाम,
– शेतकरी वर्गावर झालेला परिणाम,
– शेतमजूर (Agricultural labourer),
– स्थानिक उद्योग–रोजगार इ.

(3) **साखर कारखानदारी व क्षेत्रीय विकास** (Area Development) :– साखर कारखानदारीमुळे त्या त्या **ग्रामीण भागात** संरचनेचा (Infrastructure) विकास झालेला आहे तसेच शिक्षण, वैद्यकीय मदत, जलसिंचन अशा अनेक योजना राबविल्या गेलेल्या आहेत.

(4) **आजारी साखर कारखान्यांची समस्या** :–कारणे, स्वरूप व उपाययोजना सांगाव्यात.

(5) **गाळप क्षमतेच्या** (उत्पादन क्षमतेच्या) **वापराचा प्रश्न** :–गाळप क्षमतेचा सध्या किती वापर होत आहे व का ?

(6) **उपवस्तु उत्पादनाची आवश्यकता व भवितव्य** :–

(7) ऊसतोड कामगारांच्या (Harvesting labourrs)

(8) महाराष्ट्रातील साखर कारखान्यांची आर्थिक रचना व व्यवस्थापन.

(9) साखर उद्योग व प्रदूषणाची समस्या.

(10) पाणी वाटपाचा वाद व साखर उद्योगाचे भवितव्य.

(11) साखरेच्या दुहेरी किंमतीचा प्रश्न (Dual Price Policy). स्वरूप व त्याचा महाराष्ट्रातील साखर उद्योगावर होणारा परिणाम याची चर्चा करावी.

(12) साखर उद्योगाचे परकीय व्यापारात स्थान.

(13) साखर उद्योगाबाबतचे सरकारी धोरणाचा आढावा.

■ ■

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## बारावे वार्षिक अधिवेशन

परिषदेचे बारावे वार्षिक अधिवेशन 1988 च्या ऑक्टोबर/नोव्हेंबरमध्ये शहादा, जि. धुळे येथे होणार आहे. **प्रा. (सौ.) नलिनी पंडित,** मुंबई या अध्यक्षस्थानी असतील.

अधिवेशनातील चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत :—

1. शिक्षणाचे अर्थशास्त्र
2. महाराष्ट्रातील साखर उद्योग
3. भारतातील भांडवल बाजाराचे बदलते स्वरूप

चौथा विषय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असेल व तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील.

**निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 100 शब्दांत त्याचा गोषवारा सादर करावयाचा आहे.**

निबंध मराठीतच असावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता मराठीत देणे आवश्यक आहे. चर्चासत्रासाठी सादर करण्यात येणारे निबंध पूर्वी अन्यत्र कोठेही सादर केलेले वा प्रकाशित केलेले नसावेत.

31 ऑगस्ट 1988 ही निबंध स्वीकारण्याची अखेरची तारीख असून त्यानंतर पाठवलेला निबंध स्वीकारला जाणार नाही.

निबंध लेखकांनी आपले निबंध प्रा. सौ. नलिनी पंडित, बांबुळी निवास, माहीम, मुंबई 400016 या पत्त्यावर पाठवावयाचे आहेत.

**व्यंकटेश पाटणकर**
कार्यवाह खजिनदार

---

### मराठी अर्थशास्त्र परिषद

### आजीव सदस्यांची यादी

(जानेवारी–मार्च 1988 अंकावरून पुढे चालू)

406 श्री. एम्. आर्. कांबळे, मुंबई
407 डॉ. श्री. मो. इसराणी, मुंबई
408 प्रा. रमेश आ. देव, देवरुख
409 प्रा. वामन सावंत, रत्नागिरी

## मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

नी. वि. सोवनी : **अर्थसिद्धांत, आणखी चिकित्सक निबंध*** (1977). पृष्ठे 226. किंमत 20 रुपये.

मो. वि. भाटवडेकर : **शिक्षणाचे अर्थशास्त्र** (1978). पृष्ठे 157. किंमत 20 रुपये. (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, 381 क, शनिवार पेठ, पुणे 411 030)

भ. ग. बापट : **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण*** (1982), पृष्ठे 333, किंमत रु. 50 (वितरक : कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे 411 030)

नी. वि. सोवनी : **स्राफा विचारसरणी : चार व्याख्याने,*** पृष्ठे 64, किंमत रु. 10, प्रकाशक : नी. वि. सोवनी, पुणे.

* ही प्रकाशने म. अ. परिषदेच्या कार्यालयाकडून मिळू शकतील.

### मराठी अर्थशास्त्र परिषद

## निवेदन

प्रा. नी. वि. सोवनी यांनी आपल्या 'स्राफा विचारसरणी' या ग्रंथाच्या सुमारे सव्वाशे प्रती मराठी अर्थशास्त्र परिषदेला देणगी म्हणून दिलेल्या असून त्याच्या विक्रीतून मिळणारी रक्कम परिषदेच्या प्रकाशननिधीमध्ये जमा करण्यास सुचविले आहे.

प्रा. सोवनी यांचे आम्ही ऋणी आहोत.

**व्यं. मु. पाटणकर**
कार्यवाह-खजिनदार

## 'अर्थसंवाद'मध्ये प्रसिद्धीसाठी लेखनसाहित्य पाठवू इच्छिणाऱ्यांकरिता सूचना

1. 'अर्थसंवाद' साठी पाठविलेला लेख अन्यत्र प्रसिद्ध झालेला अथवा अन्यत्र प्रसिद्धीसाठी पाठविलेला नसावा. मात्र एखादा प्रकाशित लेख 'अर्थसंवाद'च्या वाचकांसाठी पुनर्मुद्रित करणे आवश्यक वाटल्यास तसे करण्याचे अधिकार प्रमुख संपादक यांना राहतील.

2. परभाषेतील अत्युत्तम लेखांचे अनुवाद 'अर्थसंवाद'मध्ये प्रसिद्ध होऊ शकतात. मात्र त्यासाठी प्रमुख संपादक यांनी अनुवाद स्वीकृत केल्यानंतर भाषांतर वगैरेचे अधिकार ज्यांच्याकडे असतील त्यांची लेखी अनुमती मिळवून भाषांतरकाराने ती प्रमुख संपादक यांजकडे पाठविली पाहिजे.

3. लेख वगैरे मजकूर टंकलिखित अथवा सुवाच्य हस्ताक्षरात निदान 1/3 समास सोडून कागदाच्या एकाच बाजूला लिहिलेला असावा. लेखात खाडाखोड टाळावी.

4. पाठविलेला मजकूर प्रकाशित करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण असावा. लेखाच्या अग्रभागी मथळा देऊन त्याखाली लेखकाने आपले नाव लिहावे. नाव लेखाच्या शेवटी देऊ नये. लेखकाने स्वत:विषयी संक्षिप्त माहिती-पत्ता, व्यवसाय, प्रकाशित लेखन इ.--वेगळ्या कागदावर लेखनसाहित्याबरोबरच पाठवावी.

5. सर्व लेखकांचा उल्लेख–भारतीय वा परकीय, हयात वा दिवंगत-आदरार्थी बहुवचनी करण्याचा 'अर्थसंवाद'चा संकेत आहे. लेखाची प्रत तयार करताना लेखकांनी याची नोंद घ्यावी.

6. 'अर्थसंवाद'मधील सर्व संख्यांक (numerals) आंतरराष्ट्रीय पद्धतीने–उदा. 1, 2, 3, 4 असे–दिले जातील. लेख तयार करताना लेखकांनी याची नोंद घ्यावी आणि लेखातील संख्यांक याच पद्धतीने लिहावेत.

7. लेखकाने लेखाबरोबरच जास्तीत जास्त 200 शब्दांत लेखाचा मराठीत सारांश पाठवावा. (ही सूचना केवळ, स्वतंत्र लेख पाठविणाऱ्यांसाठी आहे. ग्रंथपरीक्षणे, टिपणे आणि चर्चा' या सदरातील लेख वा परिभाषेतील लेखांचे अनुवाद इत्यादी प्रकारच्या लेखनसाहित्यास ही सूचना लागू नाही.)

8. लेखात कोष्टके असल्यास खालील बाबींविषयी लेखकाने काटेकोर राहावे :–
   (अ) प्रत्येक कोष्टकास क्रमांक देऊन त्यातील माहितीचा संपूर्ण कल्पना देणारा मथळा द्यावा.
   (आ) कोष्टकातील स्तंभांचे मथळे असेच पूर्ण असावेत.
   (ई) कोष्टकातील माहिती कोठून घेतली याचा पूर्ण संदर्भ देणे आवश्यक आहे.

9. लेखात आकृत्या असल्यास त्या पांढऱ्या शुभ्र कागदावर काळ्या शाईने सुबकपणे आरेखित करून तसेच मजकुरातील त्यांचे नक्की स्थळ निर्देशित करून पाठवाव्यात.

10. लेखातील तळटीपा लेखाच्या अखेरीस द्याव्यात. तळटीपेचा मजकूर लिहिताना खालील तपशील क्रमशः द्यावा : (अ) ग्रंथाचा संदर्भ द्यावयाचा असल्यास, ग्रंथकर्त्याचे नाव, ग्रंथाचे नाव (अधोरेखित), प्रकाशक, प्रकाशनवर्ष आणि संदर्भाचे पृष्ठ वा पृष्ठे. (आ) लेखाचा संदर्भ द्यावयाचा असल्यास, लेखकाचे नाव, लेखाचे नाव, तो लेख प्रसिद्ध झालेले नियतकालिक अथवा पुस्तक याचे संपूर्ण नाव (अवतरण चिन्हात), प्रकाशन सप्ताह/महिना/वर्ष आणि संदर्भाचे पृष्ठ वा पृष्ठे.

11. लेखास संदर्भसूची अथवा अभ्यास वाङ्मयसूची असल्यास ती तळटीपानंतर द्यावी. सूचीतील सर्व नोंदी ग्रंथकर्ता अथवा लेखकर्ता यांचे बाबतीत अकारविल्हे दिलेल्या, सर्व आवश्यक तपशील (ग्रंथाचे वा लेखाचे नाव, प्रकाशन इ.) देणाऱ्या आणि योग्य विरामचिन्हांचा व्यवस्थित वापर करून लिहिलेल्या असाव्यात.

12. ग्रंथ-परिचय अथवा ग्रंथपरीक्षण या सदरासाठी मजकूर धाडताना ग्रंथकर्त्याचे नाव, ग्रंथाचे नाव (अधोरेखित), प्रकाशक, प्रकाशनवर्ष, एकूण पृष्ठे आणि मूल्य हा तपशील या क्रमाने सुरुवातीस द्यावा आणि लेखकाने आपले नाव लेखाच्या शेवटी द्यावे.

13. लेखातील परिभाषा महाराष्ट्र शासनाच्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोशा'नुसार वापरली जावी. तशी ती न वापरल्यास आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार प्रमुख संपादक यांस राहतील. लेखात वापराव्या लागणाऱ्या कोशातील एखाद्या मराठी प्रतिशब्दास लेखकाचा आक्षेप असल्यास त्याने आपली त्याविषयीची भूमिका स्पष्ट करणारे टिपण पाठवावे. त्यातील विवेचनाचा दर्जा 'अर्थसंवाद' मधील लेखनसाहित्याच्या किमान पातळीएवढा असल्यास ते टिपण 'अर्थ शब्दाची वाट पाहे' या सदरात प्रसिद्ध केले जाईल.

14 पाठविलेल्या मजकुराची पोच देण्यात येईल. परंतु परतीचे पुरेसे टपालहशील लावून स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफाफा मजकुरासोबत जोडलेला असल्यासच अस्वीकृत मजकूर परत पाठविला जाईल. अन्यथा नाही. मजकूर पाठविणाऱ्यांनी पाठविलेल्या मजकुराची स्थळप्रत जवळ ठेवून मग मजकूर अर्थसंवाद'कडे पाठविणे त्यांच्या दृष्टीने सोईचे होईल.

15. लेख 'अर्थसंवाद'मध्ये प्रसिद्ध झाल्यावर त्यात लेखकास मुद्रणदोष आढळल्यास ते त्याने त्वरित प्रमुख संपादक यांच्या नजरेस आणून द्यावेत. म्हणजे पुढील अंकात चुकांची दुरुस्ती करता येईल.

16. लेखनसाहित्याच्या 'अर्थसंवाद' मधील प्रकाशनाबाबत प्रमुख संपादक यांचा निर्णय अखेरचा राहील.

■ ■

आपल्या उत्कर्षाची साक्षीदार,

आणि संकटकाळातील साक्षीदारही!

# दि ठाणे जनता सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : दीनदयाळ भवन, जांभळी नाका, ठाणे ४०० ६०१.

फोन : ५०३३४९, ५०७१११

*सोईस्कर ठिकाणी, सोईस्कर कामकाजाच्या वेळेत,*
*सर्व प्रकारच्या बँकिंग सेवांनी परिपूर्ण अशा*
*आपल्या सहा शाखांसह सदैव आपल्या सेवेत*
*ठाण्यातील अग्रगण्य सहकारी बँक!*

## आम्ही परदेशस्थ भारतीयांच्या ठेवी स्वीकारतो

- मुख्य शाखा
- नौपाडा शाखा
- औद्योगिक परिसर शाखा
- राबोडी-के व्हिला शाखा
- ठाणे पूर्व शाखा
- वर्तकनगर शाखा

आणि लौकरच आपल्या सेवेत : पाचपाखाडी शाखा

| अ. दा. मराठे | वा. अ. प्रभूदेसाई | वि. कृ. केळकर |
|---|---|---|
| सर व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

Registration No. R. N. 31918/77


# शेती, शेतकरी अन् जळगांवचा जैन-उद्योग-समूह..

जळगावच्या खानदेशी मातीत रुजलेला 'जैन-उद्योगसमूह' महाराष्ट्राला आतां अपरिचित, नवखा राहिलेला नाही. गेल्या २५ वर्षांपासून मातीशी इमान राखून त्यांनी स्वतःला शेती, शेतकरी व शेतीनिष्ठ व्यवसायाला वाहून घेतलंय.

बी-बियाणं, खतं, जंतुनाशकं, ट्रॅक्टर्स, पपेन, कँडी (ड्रायफ्रुट) पी. व्ही. सी. पाईप्स आणि आता अभूतपूर्व अशा ठिबक-सिंचन तंत्रानं व क्रमानं त्यानं आपली शेतीतली बांधिलकी यापूर्वीच सिद्ध केली आहे.

म्हणूनच काळाचं भान ठेवून अतिप्रगत तंत्रज्ञान या शेतीत, या मातीत कुणी रुजवावं असा प्रश्न उपस्थित झाला तर 'जैन उद्योगसमूहाचं' नाव सर्वप्रथम येत रहातं.

पिढ्यान् पिढ्यांचा इथल्या शेतीतला दस्तुरखुद्द अनुभव त्यांच्या पाठीशी आहे ही झाली निव्वळ एकच बाजू. अन् पाश्चिमात्य देशात विकसित झालेलं अतिप्रगत तंत्रज्ञान या देशात, या मातीत, या माणसांत रुजविण्याची त्यांची जिद्द आहे, महत्त्वाकांक्षा आहे, तळमळ आहे. एवढंच नव्हे तर अशी स्वयंभारित जबाबदारीची जाणीवही आहे ती फक्त जैन उद्योगसमूहाकडे.


डॉ. रवीन्द्र स. सबनीस यांनी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या संस्थेकरिता हे त्रैमासिक महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, 915/2, शिवाजीनगर, पुणे 411 004, येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई 400 014 येथे प्रसिद्ध केले.